म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ३30

REFBK-0000249

Presented to the editor
of Maharashtra Review
for review. [illegible]
13th November
1905

[illegible]

REFBK-0000249

८०८

राष्ट्रमुखांत छापलेलें प्रकरण.

लेखक

गोविंद गोपाळ टिपणीस.

# हिंदुस्थानांतील दुष्काळ.

प्रकाशक:

बाळकृष्ण रावजी पालवणकर

संपादक—राष्ट्रमुख, महाड.

किंमत दहा आणे.

मुंबई: इंदुप्रकाश व पुणें: मनोहर छापखान्यांत छापिलें.

# प्रस्तावना.

सुमारें तीन वर्षांपूर्वी, हिंदुस्थानांतील दुष्काळ, या विषयावर सर्वोत्कृष्ठ निबंध लिहिणारास, निर्णयसागर छापखान्याच्या मालकांकडून एक बक्षीस लावण्यांत आलें होतें. त्या प्रसंगाचा लाभ घेऊन मी हा निबंध लिहिला, परंतु तो बक्षीस लावणारांनीं रेखाटलेल्या मर्यादेपेक्षां थोडा विस्तृत झाला, आणि मुदती पाठीमागून दोन दिवसांनीं त्यांच्या हातीं गेला; यामुळें तो परीक्षकांच्या नजरे खालून न जातां तसाच माझा मला परत मिळाला. नंतर श्रीशिवजयंत्युत्सवप्रसंगीं मी येथील मंडळीपुढें तो वाचून दाखविला. तेव्हां कांहीं सद्गृहस्थांनीं व त्यानंतर माझ्या कांहीं विद्वान् मित्रांनीं मला तो छापण्याविषयीं फार आग्रह केला. ही त्यांची इच्छा राष्ट्रमुखाचे संपादक रा. पालवणकर यांनीं तो आपल्या त्रैमासिकाकरितां मजपाशीं मागितल्यामुळेंच मला पूर्ण करितां आली. यामुळें मी रा. पालवणकर यांचा फार आभारी आहें.

निबंध लिहिल्यापासून आज तीन वर्षांत अनेक बाबतींत आमच्या देशाची जी प्रगति किंवा पिच्छेहाट झाली, तिचा उल्लेख, सदर निबंध कांहीं अडचणीमुळें, छापतेवेळीं माझ्या नजरेखालून न गेल्यामुळें मूळ निबंधांत करितां आला नाहीं, याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून, या प्रस्तावनेंत अगदीं संक्षिप्तरूपानें करण्याचें योजिलें आहे.

या अवधींत गुजराथ व देशावरील कांहीं जिल्हे खेरीज करून बाकी बहुतेक ठिकाणीं पर्जन्यवृष्टि समाधानकारक

होती; परंतु १९०३।१९०४ या वर्षीं विलक्षण टोळधाड आल्यामुळें मुंबई इलाख्यांतील पिकांचें फार नुकसान झालें. टोळ मारण्याचे कामीं शक्य तितके प्रयत्न सरकारांतून झाले. परंतु टोळांचा खरा नाश त्यांच्या अंडावस्थेंत जेव्हां त्यांस मारलें तेव्हांच झाला. सरकारांनीं या कामीं या वेळीं सुमारें अडीच लक्ष रुपये खर्च केले. मोठ्या टोळांचा नाश त्यांना शेवटीं समुद्रस्नान घडूनच झाला. पाटबंधाऱ्याचें कमिशन बसलें होतें व बरीच रक्कम खर्च करून कित्येक ठिकाणीं कालवे बांधण्याचा विचार कायम झाला आहे. परंतु हीं कामें पुरीं होऊन लोकांस उपयोग होऊं लागेल तेव्हां खरें ! सध्यां या कामीं खर्च झालेल्या भांडवलावर शेंकडा सात टक्के व्याज पडूं लागलें आहे. तथापि सरकारची रेल्वे वाढविण्याची हाव कमी होत नाहीं.

जिऑलॉजिकल सर्व्हेचे अधिपति मि. हॉलंड यानीं गेल्या जानेवारीचे सुमारास हिंदुस्थानच्या खनिज पदार्थांविषयीं जो पंचवार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध केला आहे, त्यावरून पाहतां, बऱ्याच नवीन खाणींचा शोध लागत असून, पुष्कळ खनिज संपत्ती बाहेर काढण्याचे शास्त्रीयपद्धतीवर बऱ्याच नेटानें प्रयत्न होत आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मध्यप्रांतांतील लोखंड काढण्याकरितां टाटा यांनीं दोन कोटींचें भांडवल उभारण्याचा विचार करून तत्संबंधीं प्रयत्न व शोध हीं मोठ्या झपाट्यानें चालविलीं आहेत. तसेंच या बाबतींत म्हैसूर सरकाराकडून होत असलेले प्रयत्न आमच्या संस्थानिकांनीं अनुकरण करण्यासारखे आहेत. धंदे शिक्षणाकडेही सरकारचें लक्ष्य लागलेलें दिसतें. या शिक्षणाकरितां परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांस दरमहा दिडदिडशें रुपयांच्या दोन

स्कॉलरशिपा प्रत्येक इलाख्यास ठेवण्यांत आल्या आहेत, हीं बऱ्याच समाधानाची गोष्ट होय.

दुष्काळाच्या प्रसंगीं अमलांत आणण्याकरितां ह्मणून जरी कांहीं गुरचरणासंबंधानें दिखाऊ सरकिलरें निघत आहेत, तरी एकंदरींत अलीकडे गायरानासंबंधाचे नियम सक्तीनें अमलांत येऊन शेतकीच्या गुरांची अधिक उपासमार होऊं लागली आहे व राबाची अधिक तूट पडूं लागली आहे. खतासंबंधानें पहातां, अमेरिकेंत एका जर्मन पंडितानें जमीन टोंचण्याचा जो प्रयोग केला, तो सफळ झाला. या पद्धतीचा उपयोग आमच्या शेतीकडे करून पहाण्यासारखा आहे. मुंबईस गेल्या दिसेंबरांत जें प्रदर्शन भरलें होतें, तें पहाणारास आमच्या आउतांत किती सुधारणा करण्यासारख्या आहेत हें कळून आलें असेल.

देशांत शेतकीचें शिक्षण वाढविण्याकरितां दरसाल वीस लक्ष रुपये खर्च करण्याचा चालू सालापासून आमच्या सरकारांनीं संकल्प केला आहे. या रकमेचा उपयोग केवळ मोठमोठाल्या इमारती आणि बड्या बड्या पगाराचे युरोपियन यांच्याकरितांच होऊन केवळ नोकरीच्या लायक माणसेंच शिकविण्यांत न येवोत ह्मणजे झालें ! प्राथमिक शिक्षणाकडेही सरकार वर्षानुवर्ष अधिक रक्कम खर्च घालीत आहे, परंतु तिचा उपयोग शिक्षणप्रसाराकडे होत आहे असें दिसत नाहीं. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करावयाचाच तर तो श्री. गायकवाड सरकार यांनीं अमरेळी तालुक्यांत जसा, सातपासून बारा वर्षेपर्यंत मुलांस शाळेंत पाठविलेंच पाहिजे, असा सक्तीचा नियम करून व फी न घेतां मुलांचा शिक्षणसंबंधीं सर्व खर्च सरकारांतून देऊन

केला आहे,तसाच केला पाहिजे.गेल्या कांग्रेसला जोडून मुंबईस जें शेतकीचें प्रदर्शन भरण्यांत आलें होतें, तें पहाण्याकरितां बऱ्याच शेतकरी लोकांस आपल्या खर्चानें नेऊन तेथें त्यांस कांहीं सप्रयोग शिक्षणहि दिलें. सरकारचें हें कृत्य अभिनंदनीय आहे, असें आम्हांस वाटतें.

जमीनमहसुलाच्या नियमांत अलीकडे कांहीं सुधारणा नाहीं. दरसाल हें उत्पन्न सारखें वाढत चाललें आहे.अमात्य दत्त साहेब यांच्या सूचनेवरून आपल्या पूर्वीच्या वहिवाटीप्रमाणें ऐन जिनशी सारा वसूल करण्याचा अनुभव जसा श्री. सयाजी महाराज आपल्या राज्यांत पहाणार आहेत, तसा प्रयत्न आमच्या सरकारानें करून पाहिल्यास वावगें नाहीं. परंतु जें सरकार 'आम्ही केवळ धारा वाढवण्याकरितांच सर्व करतों' असें ह्मणतें, त्यांच्या हातून हें कसें होणार!

कलकत्त्यास गुदस्त सालीं एक 'शास्त्रीय आणि औद्योगिक शिक्षणोत्तेजक सभा,' नांवाची मंडळी निघाली असून तिच्या फंडांतून दरसाल कांहीं विद्यार्थी युरोप, अमेरिका व जपान येथें पाठविण्यांत येणार आहेत. कांहीं जातींनींही असेच फंड उभारून परदेशीं विद्यार्थी पाठविण्याचा उपक्रम केला आहे. या गोष्टी खरोखरच फार समाधानकारक आहेत. तसेंच परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांस ह्मैसूरचे दिवाण कृष्णमूर्ति यांनीं शास्त्राधार दाखवून पावन करून घेतलें व शारदामठाधिपति श्री. जगद्गुरू शंकराचार्य यांनीं अल्पस्वल्प प्रायःश्चित्तानें असे लोक खुशाल पावन करून घ्यावे,असा निर्णय दिला आहे. यामुळें परदेशगमन करणारांविषयीं यापुढें तरी आमच्या हातून अनुदार वर्तन घडणार नाहीं,अशी आह्मी आशा करतों. अलीकडे द-

क्षिण आफ्रिकेंत आमच्या लोकांचा फार छळ होऊं लागला आहे. यासंबंधानें ता. २० मे १९०३ रोजीं सर भावनगरी यांनीं हौस ऑफ कॉमन्स सभेंत विचारलेले प्रश्न व गेल्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं आफ्रिकेंतून मुद्दाम येऊन मि. मदनजित यांनीं केलेलें भाषण लक्ष्यांत घेतलें असतां तेथें आह्मांसंबंधानें घडत असलेलीं कृत्यें इंग्रजांच्या इभ्रतीस काळिमा लावण्यासारखीं आहेत, असें ह्मणावें लागतें.

हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांचें दैन्य अंशतः दूर करण्याच्या हेतूनें १९०४ सालीं नवीन पेढ्या काढण्याविषयीं सरकारी ठराव झाला असून त्या कामीं कांहीं बिनव्याजी भांडवलही सरकार देणार आहे. शिवाय या व्यवहारास स्टँप व रेजिस्ट्रेशन आणि इनकमटॅक्स यांची सूट मिळणार आहे. या सवलतीचा लाभ घेऊन शेतकऱ्यांचे कैवारी आतां कोण पुढें सरतात तें पहाणें आहे. मिठावरील कर दोन वेळा मिळून मणीं एक रुपया कमी करण्यांत आला, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे.

बोअर युद्धाशीं आणि तिबेट मिशनशीं आमचा अर्थाअर्थीं संबंध नसतां दोन्ही लढायांच्या खर्चाकरितां आह्मी भागीदार झालों आणि तिबेटच्या शांततेच्या मिशनांत आमचे बरेच सैनिक प्राणास मुकले. आमच्या लष्करी खर्चास तर धरबंधच राहिला नाहीं; आणि आतां कमँडर इन् चीफ साहेबांस व्हाइसरॉय साहेबांवर जो विजय मिळाला, त्यामुळें तर हा खर्च कोणीकडे राहील याचा नेमच राहिला नाहीं. गुदस्त सालीं अंदाजापेक्षां एक कोट ऐशीं लक्ष रुपये अधिक खर्च झाले व यापुढें दरसाल तीन कोटी रुपये खर्च जास्त देण्यांत येण्याचें ठरलें आहे. नोकरीसंबंधानें

पाहिलें तर हल्लीं लहानसान पगारांच्या जागासुद्धां युरोपि-यन आणि युरेजियन लोक पतकरूं लागले आहेत. अशा रीतीनें आमच्या बहुजनसमाजाचें दारिद्र्य सारखें वाढतच जाईल अशीं चिन्हें दिवसेंदिवस अधिक दिसूं लागलीं आहेत. या कामीं राष्ट्रीय फंड उभारावा, ह्मणून आह्मी या निबंधांत जी सूचना केली आहे, तशा प्रकारचा फंड उभारूनच्च कलकत्त्यास शास्त्रीय व औद्योगिक शिक्षणाची संस्था गुदस्त सालीं स्थापन झाली आहे. तसेंच रा. काळे यांचा पैसा फंड व रा. गोखले यांचा रुपया फंडही याच धोरणावर आहेत. परंतु कलकत्त्याप्रमाणें इकडे त्या फंडांस यश आल्याचें अद्यापि दिसत नाहीं.

दुष्काळपीडितांस मदत करण्याकरितां ह्मणून प्रासीवर प्रथम कसा कर बसविण्यांत आला हें आमच्या वाचकांस माहितच आहे. सन १९०० सालच्या दुष्काळाच्या वेळीं लॉर्ड कर्झन साहेबांनीं याच कामाकरितां एक खाजगी फंड उभारण्यास सुरवात केली. पुढें दिल्ली दरबाराच्या तमाशांत साहेब गढून गेल्यामुळें गरीब प्रजेच्या संरक्षणाचें हें काम सहाजिकच मागें पडलें होतें; परंतु आतां तें त्यांनीं पुनः हातीं घेतलें आहे. या कामीं त्यांस यश येऊन आमच्या दुष्काळपीडित बांधवांचें संरक्षण व्हावें, असें आह्मी इच्छितों.

शेवटीं ज्या प्रभूच्या कृपेनें हा छोटासा निबंध शेवटास गेला, तोच प्रभू आह्मांस या भयंकर दारिद्र्यांतून सुटण्याचा मार्ग दाखवो, असें इच्छून ही सकारण लांबलेली प्रस्तावना पुरी करितों.

महाड—कुलाबा,
ता. २०।६।०५ } **गोविंद गोपाळ टिपणीस.**

# हिंदुस्थानांतील दुष्काळ.

ज्या काळीं लोकांमध्यें आपल्या नित्याच्या अवश्य गरजा भागविण्याइतकें ही त्राण राहत नाहीं त्या काळास दुष्काळ असें ह्मणतात. हा काळ किंवा अशा प्रकारची स्थिति कोण त्याही देशास येण्याला जीं सामान्य कारणें आहेत तीं प्रथम देऊन या निबंधांत हिंदुस्थानांतील दुष्काळाविषयींच विचार करावयाचा असल्यामुळें त्यांपैकीं कोणतीं कारणें येथें किती प्रमाणानें लागू पडतात तें पाहूं.

१ शेतकीस अवश्य असणाऱ्या पर्जन्यापेक्षां अधिक पर्जन्य लागून, उथव बुडीनें पिकाची खराबी होणें, किंवा कमी पर्जन्य लागून सुकल्यानें पीक न येणें हें एक दुष्काळ पडण्याचें सामान्य कारण होय.

२ दुसरें दुष्काळ पडण्याचें सामान्य कारण ह्मणजे टोळ धाड किंवा पाखरांची धाड हें होय. या धाडीमुळें कितीही चांगलें पीक आलें, तरी तें शेतकऱ्यांच्या पदरीं पडत नाहीं, आणि ह्मणून दुष्काळ पडतो.

३ ज्या देशाची उपजीविका लोखंड, सोनें, तांबें वगैरे खनिज धातु, दगडी कोळसे, रॉकेल वगैरे खाणींतील द्रव्यें किंवा मोतीं, पोवळीं वगैरे समुद्रांतर्गत वस्तूंवर अथवा हस्त कौशल्य आणि यंत्रसामुग्री यांनीं बनविलेल्या जिनसाच्या व्यापारावर अवलंबून नसून, बऱ्याच अंशीं शेतकीपासून उत्पन्न होणाऱ्या कच्च्या मालावरच अवलंबून असते, तेथें दुष्काळ पडण्याचा बराच संभव असतो. ह्मणून देशाचें भौतिक दारिद्र्य हें दुष्काळ पडण्याचें तिसरें कारण आहे.

यांतच देशांतील निकस ह्मणजे शेतकीस नालायक जमिनीचा अंतर्भाव करितां येईल.

४ दुष्काळ पडण्याचें चौथें कारण ह्मटलें ह्मणजे, राब, खत, आऊतें वगैरे शेतकीस लागणाऱ्या कृत्रिम साधनांची टंचाई, अभाव किंवा दुर्दशा हें होय.

५ देशांतील जमीन चांगली कसदार असली, तींत धान्य, ऊंस, कापूस वगैरे वाटेल तो जिन्नस पिकण्यासारखा असला, व पाऊसही चांगला बेताचा पडत असला तरी देखील ‘ गाढवाच्या पाठीवर साखरेच्या गोण्या,’ या न्यायानें शेतकींविषयीं, अज्ञान शेतकऱ्यांच्या हातांत अशी जमीन पडल्यानें, जमिनींत तिच्या मगदुराप्रमाणें पीक न निघून दुष्काळ पडतो; ह्मणून शेतकऱ्यांस त्यांच्या धंद्याचें ज्ञान नसणें, हें सामान्यतः दुष्काळ पडण्याचें पांचवें कारण मानण्यास हरकत नाहीं.

६ जमीन कसदार असली, पाऊसपाणी बेताचें आणि वेळच्यावेळीं लागलें, व शेतकीसंबंधीं उत्कृष्ट ज्ञान असलें, तरी देखील सरकारचे जमीन महसुलासंबंधाचे नियम अन्यायाचे आणि जुलमाचे असतील, तर शेतकऱ्यांस आपलें सर्वजान गुंडाळून दुष्काळास बळी पडावें लागेल. ह्मणून हे नियम अशा प्रकारचे अन्यायाचे व जुलमाचे असणें, हें सामान्यतः दुष्काळ पडण्याचें सहावें कारण आहे.

७ दुष्काळ पडण्याचें सातवें कारण ह्मटलें ह्मणजे, देशाच्या एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतात किंवा त्या देशांतून दुसऱ्या देशांत, गमागम ठेवण्याचीं साधनें नसणें हें होय. अशी साधनें असलीं ह्मणजे एका प्रांतांतील पिकाची बूड

ऱ्या प्रांतांतील धान्य नेऊन, किंवा परदेशचें धान्य शून भरून टाकितां येतें.

८ ज्या देशांत नित्याच्या गरजांस अवश्य लागणारे अन्नादि पदार्थ उत्पन्न होऊनहीं ते व्यापाराकरितां परदेशीं रवाना होतात, त्या देशांत दुष्काळ पडण्याचा अधिक संभव असतो; ह्मणून असले पदार्थ मागचा पुढचा विचार न करितां, परदेशीं पाठविणें हें सामान्यें करून दुष्काळ पडण्याचें आठवें कारण आहे.

९ इंग्रजादि बलाढ्य यूरोपियन राष्ट्रांच्या फाजील अधिकारतृष्णेमुळें जरी क्वचित् प्रसंगीं लढाया उत्पन्न होतात, तरी एकंदरीनें पाहिलें असतां, सध्यांचा काळ ह्मणजे शांततेचा काळ होय. तेव्हां या काळांत प्रत्येक देशांतील लोकसंख्येचें मान मोठ्या सपाट्यानें वाढत चाललें आहे; यांत कांहीं नवल नाहीं. अशा प्रसंगीं ज्या देशांतील लोक नानाप्रकारच्या युक्त्यांनीं परदेशचा पैसा आपल्या देशांत न आणितां, किंवा परक्या देशांत व्यापार वगैरे न चालवितां देशांतल्या देशांत माशा मारीत बसतील, त्या देशांत अधिक लवकर दुष्काळ पडेल. ह्मणून दुष्काळ पडण्याचें नववें कारण ह्मणजे उद्योगाचा आणि परदेशगमनास लागणाऱ्या धाडसाचा अभाव हें होय.

१० जमिनीची मशागत होऊन, तींत चांगलें पीक येण्यास शेतकऱ्याजवळ नांगरकीचीं पुष्कळ जनावरें असून तीं चांगलीं सदृढ असलीं पाहिजेत. शेतकऱ्यांस दुवक्ता चांगलें पोटभर अन्न आणि जाडें भरडें तरी आंगभर वस्त्र मिळालें पाहिजे, त्याच्या अंगांत चांगली ताकद असली पाहिजे, शेतांत पेरण्यास पुरेसें आणि चांगलें बीं मिळालें

पाहिजे. सारांश, त्याची सांपत्तिक स्थिति बऱ्या प्रकारची असली पाहिजे; असें नसेल तर शेतांत कमी उत्पन्न होऊन दुष्काळ पडेल. ह्मणून शेतकऱ्यांचें दारिद्र्य हें सामान्यतः दुष्काळ पडण्याचें दहावें कारण होय.

११ बहुजन समाज, जर श्रीमंत असेल तर आपल्या देशांत धान्यादि सामुग्री उत्पन्न झाली नसल्यास ती परदेशांतून आणून महाग सवंग विकत घेऊन आपल्या गरजा भागवील; आणि आपणांस दुष्काळ भासूं देणार नाहीं. परंतु तोच जर कां भिकार झाला असेल. तर परदेशचा माल येऊनही, त्याचा उपयोग न होतां लोक नित्याच्या अवश्य गरजा न भागल्यामुळें, दुष्काळरूपी महाराक्षसाच्या भयंकर जबड्यांत सांपडून प्राणास मुकतील, ह्मणून देशांत सामान्यतः दुष्काळ पडण्याचें अकरावें व शेवटचें कारण बहुजनसमाजाचें दारिद्र्य हें होय.

या वर दिलेल्या अकरा कारणांनीं, कोणत्याही देशांत सामान्यतः दुष्काळ पडेल; व त्यांपैकीं जेथें जितकीं अधिक कारणें एकवटतील तेथें त्याचें स्वरूप तितकें अधिक भयंकर होईल ह्मणजे पर्ज्यन्य कमजास्त होऊन पिकाची नासाडी झाली, परंतु झालेलें सर्वपीक शेतकऱ्याचे पदरीं पडलें तर जितका दुष्काळ होईल, त्यापेक्षां पर्जन्याच्या कमी अधिकपडण्यास टोळधाडीसारख्या एकाद्या धाडीचें साहाय्य मिळून, आलेलें पीकही शेतकऱ्याचे पदरीं न पडेल ह्मणजे हीं दोन कारणें एकवटतील तर अधिक दुष्काळ होईल.

एकाद्या वर्षीं पावसानें जरा ओढून धरिलें कीं, प्रत्येक धर्माचे लोक आपआपल्या समजुतीप्रमाणें, देवळांतून,

मशीदींतून, मठांतून आणि चर्चमधून ईश्वराच्या आराधनेला सुरुवात करतात. कोणी सहस्रपक्षी ग्रहमखकरून अनिष्ट ग्रहांची शांति करतात; तर कोणी चौलचे पर्ज्यन्यकुंड उघडण्याकरितां हजारों गरीब लोकांपासून मिळविलेल्या वर्गणीची त्यांत आहुति देतात; कोणी महादेवाला कोंडतात तर कोणी त्याच्यावर संततधार धरून तिच्या सांगते करितां नित्य मिष्टान्न पुष्ट भिक्षुकांस लाडू चारतात; कोणी रोजे करितात आणि फकीरांनां खिचड्या वाटतात; कोणी धर्मपुस्तकें उघडून त्यांतील भाग वाचतात; कोणी पियानोच्या सुरावर प्रभूची आणि त्याच्या आवडत्या लेंकराची, प्रार्थना करितात; असे एक कीं दोन! जो तो आपापल्या मताप्रमाणें पाऊस पाडण्याची खटपट करितो. परंतु व्यर्थ ! जी गोष्ट केवळ परमेश्वरी इच्छेवर, अर्थात् तत्प्रणीत सृष्टिनियमांवर अवलंबून असणार, ती फिरविण्याचें सामर्थ्य यःकश्चित् मनुष्यप्राण्यांत कोठून येणार ? अमुक केलें तर परमेश्वर संतुष्ट होऊन पाऊस पाडतो, असें आपण ठरवावयाचें आणि आपणच त्याप्रमाणें करावयाचें. पाऊस पडला तरी ठीक न पडला तरी ठीकच ! पूर्वींच्या काळीं म्हटल्या वेळीं पाऊस पाडणारे ऋषी असले, तरी ते पुराणांतले पुराणांत ! आज तरी त्यांचा कांहीं उपयोग नाहीं, हें एक, आणि असें सामर्थ्य जर तत्कालीन ऋषींच्या आणि मंत्रांच्या अंगीं होतें, तर राजर्षि विश्वामित्रावर एका खाटकाच्या घरांत शिरून कुत्र्याचें फरकट चोरून आणण्याचा प्रसंग कां येता हें दुसरें ! कांहीं दिवसांपूर्वीं डायनामैटच्या प्रयोगानें हवेंत आघात उत्पन्न करून पाऊस पाडण्याची कल्पना एका

पाश्चिमात्य शास्त्रविशारदानें काढल्याचें वाचण्यांत आलें हो, परंतु त्याला तरी वातावरणांत ढग असावे लागतात; तसे असूनही प्रयोग सफळ झाला तर ठीक, नाहीं तर बराच खर्च फुकट जातो, शिवाय त्यापासून पाऊस पडणार तोही कांहीं विवक्षित ठिकाणापुरताच ! कारण पर्जन्याला वाऱ्याचें साहाय्य असल्यावांचून त्याचा प्रसार व्हावयाचा नाहीं. सारांश पाऊस जास्त पडूं लागला तर तो कमी करणें किंवा अजिबात बंद करणें जसें मनुष्याच्या हातचें नाहीं; तसेंच तो पडत नसल्यास पाडणें हेंही मनुष्याच्या शक्तीबाहेरचें आहे.

इंग्रजी राज्य झाल्यापासून आमच्या इकडील जंगलाची फार तोड झाली; आणि ह्मणून पाऊस पडत नाहीं. असा अनावृष्टीसंबधानें कांहीं मंडळींचा आक्षेप आहे. परंतु त्यांत विशेष तथ्य आहे असें आह्मांस वाटत नाहीं इंग्रजी राज्य होण्यापूर्वीं जंगल किती होतें, व आज त्यापैकीं किती तुटलें, हें जरी खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं, तरी, खेड्यांचें शहरांत होणारें रूपांतर, बैलगाड्यांचे सर्व देशभर हजारों मैल पसरलेले रस्ते, लागवडजमिनीची झपाट्यानें होणारी वाढ, लोकसंख्येचें वाढतें प्रमाण, वगैरे गोष्टींचा विचार केला असतां पूर्वींचीं जंगलें तुटून आज बराच प्रदेश मोकळा झाला असावा ही गोष्ट निर्विवाद ठरते. परंतु या मानानें पावसाचें प्रमाण कमी झाल्याचें दिसत नाहीं. पर्जन्य कोणत्या वर्षी किती पडला यासंबंधाची सन १८३० सालापासून आजपर्यंतची नोंद आमचे पुढें आहे; त्या पूर्वींची माहिती इतिहासावरून जी कांहीं मिळते, त्या माहितीवरून पाहतां,

महमुदशहा बहामनीचे कारकिर्दीत पडलेला दुर्गादेवीच्या* महाभयंकर दुष्काळाइतका दीर्घकाळीं दुष्काळ हिंदुस्थानांत त्यापूर्वी व त्यानंतर आज पांचशें वर्षांत कधींच पडला नाहीं. हा दुष्काळ केवळ पावसाच्या अभावामुळें पडला होता. असें सागतात कीं, त्याप्रसंगीं कित्येक ठिकाणीं बारा वर्षांत पावसाचा एक थेंबही पडला नाहीं. यानंतर इतिहासांत नमूद असलेला दुष्काळ ह्मणजे इ. स. १६२९ चे सुमारास पडलेला. या वेळींही दोन वर्षांत बिलकूल पाऊस पडला नाहीं. या दोनच दुष्काळांकडे जरी पाहिलें तरी जंगलें असलीं ह्मणजे हवा तितका पाऊस पडतो, ह्या ह्मणण्याची निरर्थकता सिद्ध होते.

आतां आह्मां जवळ असलेल्या नोंदीकडे जरी पाहिलें तरी हीच गोष्ट सिद्ध होते. इ. स. १८३० सालीं मुंबई इलाख्यांत अवघा ७१ इंच ३६ दोकडे पाऊस पडला; परंतु लागलीच एकतीस सालीं १०१ इंच ८३ दोकडे पडला. पुढें १८४८ पर्यंत सरासरीनें दर वर्षी पाऊणशें इंचपर्यंत पाऊस पडत असतां १८४९ सालीं एकदम

---

* दुर्गादेवी हा शब्द दुर्गाडी या शब्दाचा अपभ्रंश आहे. दुर्गादेवीचे दुष्काळ दोन पडले. एक बारा वर्षांचा व दुसरा सात वर्षांचा बारा वर्षांचा दुष्काळ इ. स. १३९६ ते १४०८ पर्यंत होता. व सात वर्षांचा दुष्काळ इ. स. १४६८ ते १४७५ पर्यंत होता. इ. स १३९६ पासून १४७५ पर्यंतच्या मुदतींत वरील दोहोंशिवाय आणखी एक वर्षाचा दुष्काळ पडला. ह्मणजे एकंदर २० वर्षे अवर्षण होतें. परराज्याखालीं हिंदुस्थानामध्यें विशेषतः दक्षिण महाराष्ट्रांत दुष्काळाचा बराच अमल असतो; असें प्राचीन व सध्यांच्या अनुभवावरून सिद्ध होतें.

संपादक.

१११ इंच ८८ दोकडे पडला. पुढें १८५० सालीं ५१ इंच १५ दोकडे पडून त्याच्या पुढल्याच सालांत पर्जन्याचें मान १०६ इंचावर गेलें! आणि पुढें कमी होऊन १८७८ या वर्षीं तेंच मान १२३ इंचाच्याही पलिकडे गेलें. व १८९२ त १२६॥। इंच पाऊस पडला असून दुःखाची गोष्ट ही कीं जंगलची स्थिति तशीच असतां सन १८९९ सालीं अवघा २२ इंच २७ दोकडे पाऊस झाला. ह्मणजे एकदम १०० इंचाची तूट आली!

सर्व देशभर जंगलें पसरलीं असतां पर्जन्याच्या अभावानें मोठ मोठाले दुष्काळ पडतात, व जंगलाची स्थिति बहुतेक सारखीच असतां एकवर्षी सव्वाशें इंच व दुसऱ्या वर्षी लागलाच २९ इंच पाऊस पडतो. या दोन गोष्टींवरून जर कांहीं सिद्ध होत असेल, तर तें हेंच आहे कीं, जंगलाचा आणि पर्जन्य वृष्टीचा कार्यकारणसंबंध अनुभवाशीं जुळत नाहीं.

कोंकणपट्टींत १८९६।९७ सालीं अतिवृष्टि होऊन उथव बुडीनें शेताचें नुकसान झालें, व पिकास धोका पोंहचला. १८९७।९८ सालीं पाऊस हवा तसा लागून, जिकडे तिकडे चांगली सुबत्ता झाली. आणि १८९८।९९ सालीं अनावृष्टीनें शेतें सुकल्यामुळें पिकें आलीं नाहींत. ही लागोपाठ तीन वर्षांची फक्त कोकणपट्टीचीच हकीकत पाहिली, तरी तेवढ्यावरूनही आमच्या ह्मणण्याचें पुष्टीकरण होईल. सदर तीन वर्षांत जंगलाची स्थिति बदलली नसतां पर्जन्याच्या स्थितींत निरनिराळे तीन प्रकार झाले! पहिल्या वर्षी अतिवृष्टि, दुसऱ्या वर्षी योग्य वृष्टी. आणि तिसऱ्या वर्षी अननुभूतपूर्व अशी अनावृष्टी!

आतां घटकाभर जंगलें तुटल्यानें पाऊस कमी पडतो असें जरी आपण गृहीत धरिलें, तरी देखील इ. स. १८७८ सालीं सरकारांनीं जंगलचा कायदा पास केला व जंगलची वाढ कशी करावी वगैरे बाबतींत शिक्षण देण्याकरितां डेरा-डोन येथें एका वर्गाची स्थापना केली. तेव्हांपासून राखून ठेवलेल्या जंगलाचें मान सारखें वाढतच आहे. इ. स. १८८१।८२ सालीं अशा प्रकारचें जंगल हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांत मिळून अवघें ४६२१३ चौरस मैल होतें. तेंच पुढील दहा वर्षांच्या अखेरीस ५९७४३ मैल झालें, व हल्लीं सरकारी जंगल १३१००० चौरस मैलांवर पसरलें आहे.

या जंगल वाढीचें खूळ इतकें माजलें आहे कीं, पुष्कळ वेळां प्रजेच्या त्यापासून अनंत गैरसोई होत आहेत. परंतु या विषयींचें विवेचन दुष्काळाच्या चौथ्या कारणाचा विचार करते वेळीं होणार असल्यामुळें, सध्यां या संबंधानें येथें लिहिण्याचें कारण नाहीं. अशा प्रकारें जंगलाची वाढ होत असतां तीस न जुमानतांही पाऊस कमजास्त पडतो, असें असून जंगलें तुटलीं ह्मणून पाऊस पडत नाहीं, अशा प्रकारचें रडगाणें गात बसणें आह्मांस बरोबर दिसत नाहीं.

थोड्याच दिवसांपूर्वीं एका फ्रेंच गृहस्थानें, आपण कांहीं शास्त्रीय प्रयोग करून औरस चौरस शंभर मैलांवर पर्जन्य पाडतों, याबद्दल आपणांस एक लाख रुपये बक्षिस द्यावे, आणि पाऊस न पडला तर फांसावर चढवावें अशी जाहिरात दिल्याचें प्रसिद्ध झालें होतें; परंतु आपल्या पश्चात् आपल्या कुटुंबास अन्नवस्त्राची ददात राहूं नये, इतकाच जर या फ्रेंच पंडिताचा हेतु नसता, तर दुष्काळ कामावर

कोट्यावधि रुपये खर्च करणाऱ्या आमच्या सरकारांनीं असल्या युक्तीचा फायदा घेतल्यावांचून ठेवला नसता.

वरील सर्व विवेचनावरून दुष्काळ पडण्याचीं, आह्मीं जीं कारणें दिलीं आहेत त्यापैकीं पहिलें, ईश्वरी इच्छेवर किंवा सृष्टिनियमांवर अवलंबून असल्यामुळें, त्यापासून पडणारा दुष्काळ, किंवा तें कारण देशांतल्या एकाद्या प्रांतापुरतेंच असल्यास होणारी महागाई, सदर कारण अपरिहार्य असल्यामुळें आपणांस थोडी बहुत तरी नडल्यावांचून राहणार नाहीं.

या संबंधांत सरकारचें पहिलें कर्तव्य, म्हणजे हिंदुस्थानांत असलेल्या मोठमोठ्या नद्यांचे व नदांचे पाट बांधून शक्य असेल तितक्या लागवड जमिनीस पाण्याचा पुरवठा करणें हें होय. ही वहिवाट येथें सुमारें दोन हजार वर्षांपासून चालत आहे. अगदीं अलीकडे म्हटलें तर फिरोजशहा तघलख यानें तीन मोठमोठाले व कांहीं लहान कालवे बांधून शेतकीच्या कामास फार मदत केली. त्यानें बांधलेला एक मोठा कालवा अद्यापि चालू असून सध्यां आपल्या सरकाराकडून, त्याची दुरुस्ती होत असते. सरकारांनीं हें खातें बरेंच वाढविलें आहे. सध्यां ब्रिटिश इंडियांत असलेल्या जवळ जवळ वीस कोटी एकर लागवड जमिनींपैकीं एक कोटी एकर जमिनीस कालव्याच्या पाण्याचा पुरवठा होतो. रॉयल इंजिनिअरिंग खात्यांतील बडे कामगार व हिंदुस्थानांत कालव्याचीं कामें करण्यांत आपल्या वयाचीं पंचेचाळीस वर्षें खर्ची घातलेले, सर ऑर्थर कॉटन साहेब यांनीं सन १८६५।६६ सालच्या भयंकर दुष्काळानंतर पुढच्याच वर्षी, ईस्ट इंडिया ॲसोसिएशनपुढें " हिंदु-

स्थानांत कालवे बांधून पाण्याचा पुरवठा करणें " या विषयावर एक मोठा विस्तृत निबंध वाचला. त्यांत त्यांनीं कालव्याचा विस्तार केल्यानें हिंदुस्थानांतील दुष्काळ टळतील आणि आगगाडीचे रस्ते करण्यापेक्षां कालवे बांधावे हें चांगलें; कारण याच्या योगानें कालव्यांतून गलबतें चालवून व्यापारासही उत्तेजन देतां येईल; असा कालव्यांपासून होणारा दुहेरी फायदा दाखविला आहे. श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांनीं गेल्या सुमारें दोन वर्षांपूर्वी आपल्या राज्यांत एका कालव्याचे कामास सुरवात करते वेळीं जें उत्कृष्ट भाषण केलें, त्यांत दुष्काळाचे वेळीं लोकांचें संरक्षण करण्याकरितां सरकार जीं कामें करतें त्याचे तीन वर्ग केले आहेत. " सडका व खडी वगैरे कामांनीं लोकांचें तत्कालीन रक्षण होतें; आगगाड्यांच्या कामांनीं बाहेरून धान्याचा पुरवठा करितां येतो, परंतु पाटाचीं कामें केल्यास दुष्काळ कायमचे टाळतां येतात. " असें प्रतिपादन केलें आहे. एकावेळीं असलेल्या मुंबई प्रांतिक सभेच्या स्वागत कमेटीचे अध्यक्ष व पुणें हायस्कूलचे माजी हेडमास्तर रा. ब. विठ्ठलराव पाठक एम. ए. यांनींही सरकारास दुष्काळ निवारण्याच्या कामीं ज्या सूचना केल्या आहेत, त्यांत कालव्याच्या कामास अग्रस्थान दिलें आहे. पार्लमेंटांतील सभासद मि. सम्युअल स्मिथ, कामन्स सभेंत दुष्काळावर वादविवाद चालला असतां ह्मणाले कीं, " हिंदुस्थानांतील दुष्काळ कालवे आणि बंधारे बांधल्यावांचून कमी होणार नाहीं. आह्मीं गेल्या पन्नास वर्षांत रेलवेकडे जी रक्कम खर्च केली ती जर कालव्यांच्या कामीं खर्च केली असती तर हिंदुस्थानच्या बऱ्याच भागांतून दुष्काळानें

आपलें ठाणें कायमचें उठविलें असतें. परंतु आह्मी रेल्वेकडे तीस कोट रुपये खर्च केले, आणि पाटाकडे काय ते तीनच कोट! आतां तरी पाटांकडे लक्ष देण्याची वेळ आली आहे कीं नाहीं?

या संबंधांत अत्यंत भक्कम पुरावा ह्मटला ह्मणजे सध्यां हिंदुस्थानच्या ज्या भागांत असे कालवे आहेत, त्या भागांत अनावृष्टीनें पिकास मुळींच धोका पोंचत नाहीं हा होय.

सरकारानीं जरी कालव्याचीं कामें चालविलीं आहेत, तरी तीं यापेक्षां जास्त नेटानें चालविलीं पाहिजेत. या कामांत खर्च झालेल्या भांडवलावर अलिकडे, सहा टक्यापेक्षां अधिक व्याज पडूं लागलें आहे, तेव्हां त्यांत सरकारचा फायदाच आहे. देशांत रेल्वेचा विस्तार बराच झाला आहे. करितां ऑ. प्रो. गोखले ह्मणतात, त्याप्रमाणें रेल्वेचीं कामें जेव्हां सरकाराजवळ शिल्लक राहील, तेव्हांच करावींत. आणि इतर प्रसंगीं पाट बांधण्याचे कामीं खर्च करावा.

असो. पाऊस कमजास्त पडल्यामुळें होणारें पिकाचें नुकसान सरकारास अथवा लोकांस टाळतां येण्याचा दुसरा मार्ग ह्मटला ह्मणजे, पाऊस कमजास्त पडावयाचा असतां, हवेंत कसकसे फेरबदल होतात, याचें पांचपन्नास वर्षें चांगलें निरीक्षण करून, त्यापासून मिळणाऱ्या अनुभवावरून सिद्धांत ठरवून, खडतर सालांत निभाव लागावा ह्मणून पूर्व तजवीज करणें हें होय. याच उद्देशानें आकाशस्थ चमत्कारांचें उद्धाटन करण्याकरितां जमीनीवर व पाण्यांत एक मोठें खातें सरकारांतून काढण्यांत आलें आहे. या खात्यांतून पर्जन्य कधीं सुरू होईल, तो किती पडेल, वारा कोणत्या दिशेस किती वेगानें वाहत आहे, त्याचा परि-

णाम हवेवर कसकसा घडेल वगैरे गोष्टींची अनुमानें नेहमीं प्रसिद्ध करण्यांत येतात. परंतु या संबंधानें सिद्धांत ठरविण्याइतकी माहिती अद्यापि गोळा झाली नाहीं. या कामासाठीं आपल्या देशांत निरनिराळ्या ठिकाणीं मिळून सुमारें दोनशें निरीक्षण गृहें स्थापन करण्यांत आलीं असून, तेथील कामदारांचीं निरीक्षणें यूरोप व अमेरिका खंडांत शास्त्रज्ञ लोकांकडे पाठविण्यात येतात. या कामीं आपलें सरकार दरसाल जवळ जवळ तीन लक्ष रुपये खर्च करितें, परंतु त्याचें श्रेय पाऊस व वादळें या संबंधानें नक्की सिद्धांत ठरवून कधीं मिळेल तें खरें.

आपल्यामधील शास्त्रज्ञ पंडितही या संबंधांत अगदींच स्तब्ध नाहींत सुमारें वीस वर्षांच्या अंतरानें सूर्यावर एक प्रकारचे काळे ठिपके दिसूं लागतात. आणि ते दिसूं लागले ह्मणजे, सूर्याची उष्णता किंचित् कमी होते आणि यामुळें पृथ्वीवरील पाण्याची वाफ कमी होऊन पाऊस थोडा पडतो, अशा प्रकारचा शोध आमचे जगद्विख्यात् ज्योतिर्विद कै. प्रो. केरूनाना छत्रे, यांनीं कांहीं दिवसांपूर्वी प्रसिद्ध केला होता. परंतु अलिकडे हें तत्वही अनुभवाच्या कसोटीस चांगलेंसें न उतरल्यामुळें पंडित मंडळांत टाकाऊ ठरलें आहे.

**दुसरें कारण**—टोळांच्या व पाखरांच्या वगैरे धाडी देशावर येणें हें होय. ही गोष्टही लोकांच्या हातची नाहीं. मनूनें आपल्या स्मृतींत, देशावर येणारीं जीं सहा अरिष्टें सांगितलीं आहेत; त्यांत या टोळधाडीची गणना केली आहे. या धाडी आल्या असतां त्यापासून होणारें नुकसान लोकांस आपल्या प्रयत्नानीं, थोडें बहुत कमी करितां येण्याचा संभव आहे. इ. स. १८८२ सालीं पिकें चांगलीं तयार झालीं

आणि असंख्य टोळांच्या लाखों झुंडी महाराष्ट्रांत संचार करूं लागल्या. एवढा महाप्रतापी दैदीप्यमान सहस्ररश्मी सूर्य नारायण परंतु त्याच्याही तेजाला लोपवून या झुंडींनीं त्या वर्षी श्रीकृष्णाच्या सुदर्शन चक्राची आठवण लोकांस दिली. ह्या टोळ्या प्रवासाला निघाल्या ह्मणजे मोठा थोरला प्रचंड ढगच आकाशांत गमन करीत आहे, असें वाटतें. त्यांच्या पंखांचा शब्द ह्मणजे मोठ्या झंजावाताचा सोसाटा ! ते जेथें बसत तेथें चार सहा घटकेंत इंच दीड इंच जाडीचा लेंड्य चा थर पसरीत आणि हिरव्यागार पिकाचे कात्रे पाडून निसंतान करीत. इतकेंच नव्हे तर किती एक मैलपर्यंत मेठमोठया वृक्षांवर नुसतें पान राहूं देत नसत, कांहीं वृक्ष तर त्यांच्या भारानें जमीनदोस्त झाले होते; त्यांना मारण्याकरितां याप्रसंगीं लोकांनीं आणि सरकारानीं अगदीं जिवापाड मेहनत केली! शाळामास्तर, तलाठी, कारकून, मामलेदार, फार तर काय सरकारच्या बहुतेक सर्व खात्यांतील नोकरांस टोळ मारणाऱ्यां या सुपरवायझरा " वांचून दुसरें काम नाहीं. कचेरींत कांटा लावून रोज खंडोगणती टोळांचीं प्रेतें जोखून घेऊन टोळ मारणारांस बक्षिसें देण्याचा क्रम सुरू झाला ! परंतु व्यर्थ ! ईश्वरी करणीपुढें यःकश्चित् मानवी प्रयत्न काय टिकणार ! त्या टोळांना जेव्हां अनायासें समुद्रस्नान घडलें, तेव्हांच लोकांचें संकट टळलें.

ग्रीस देशांत अनेक वेळां टोळधाड आलेली आहे. स्वीडनच्या बाराव्या चार्लस राजाच्या सैन्यानें तर टोळांपुढें अगदीं हात टेंकले. इ. स. १७८० सालीं ट्रान्सल्व्हेनिया प्रांतात पंधराशें ल करी लोक टोळ मारण्यास लागले होते, परंतु बिचाऱ्यांचा कांहींच उपयोग झाला नाहीं. फ्रान्स

देशानें तर एक वर्षी टोळ मारण्याच्या कामीं चार लाख रुपये खर्च केले, परंतु पिकांचें नुकसान व्हावयाचें तें झालेंच!

आमचे इकडे सिंध, पंजाब, राजपुताना वगैरे प्रांतात टोळांपासून वारंवार पिकाचें नुकसान होतें. इ. स. १८८५।८६ सालीं पुनः ही धाड दक्षिणेंत आली त्यावेळीं एकट्या कोल्हापूर संस्थानांत चार महिन्यांत ५१९ मण टोळ मारण्यांत आले.

साल मजकुरीं (१९०४) तर सर्व देशभर अत्यंत भयंकर टोळधाड येऊन तिनें जबरदस्त नुकसान केलें. कोंकणांत पिकणारें उन्हाळी पीक व पावसाळीं होणारी भाताची लागवड तर त्यांनीं अगदीं फन्ना उडवून नाहींशी करून टाकिली. देशावरही त्याचप्रमाणें फार नासाडी केली. परंतु सन १८८२ सालाप्रमाणें सरकारकडून त्यांच्या प्रतीकारार्थ फारसे उपाय करण्यांत आले नाहींत; व जें कांहीं करण्यांत आलें तें "वराती पाठीमागून घोडें" या ह्मणीप्रमाणें शेतांतील पेरलेलीं रोपें खाऊन टाकल्यानंतर होय. यासालीं सरकारच्या कवडीचुंबकत्वाचाही अनुभव पुष्कळ पाहण्यास सांपडला आणि रयतेच्या निकृष्टस्थितीविषयीं व त्यांच्या होत असलेल्या दैन्यतेविषयीं सरकारचे मनांत फारच अनास्था दिसून आली. टोळसुपरिंटेंडंटला ओझींच्या ओझीं पगार देऊन शेरभर ( ८० तोळ्यांचा ) टोळ मारून आणणारास अवघ्या दोन दिडक्या सरकारनें ठेविल्या होत्या व ज्या वेळीं टोळांचा उपद्रव कमी होऊन ते तुरळक राहिले त्यावेळीं भाव वाढवून आपल्या कंजूषपणाचें प्रदर्शन खुलें केलें होतें. ही टोळधाड कमीजास्त प्रमाणानें सारखी वर्षभर असल्यानें तीच्यापासून कोट्यावधि रुपयांचें नुकसान

झालें, शेकडोंशें कुटुंबें उध्वस्त झालीं आणि लाखों लोकां-वर यमाजीपंताची करडीनजर गेली.

आतां वर सांगितल्याप्रमाणें या धाडी जरी सर्व शक्तिमान् ईश्वराच्या इच्छेवर अवलंबून असल्यामुळें मनुष्यांनीं केलेली धडपड व्यर्थ होते. तरी स्वस्थ बसतां कामा नये, प्रयत्न करण्याचें काम आपलें, आणि त्यांत यश देण्याचें काम ईश्वराचें आहे.

अशा अरिष्टाचे प्रसंगीं सरकारचें आणि लोकांचें काम ह्मटलें ह्मणजे या दुष्ट प्राण्यांचा होईल तितक्या खटपटीनें संहार करावयाचा! टोळांचा संहार त्यांची वाढ पूर्ण झाल्या-वर करण्यापेक्षां, ते अंडावस्थेंत किंवा फार तर कीटका-वस्थेंत आहेत, तोंपर्यंतच केला पाहिजे. अंड्यांचा नाश कर-ण्याचें काम अगदीं सहज होतें; रावळपिंडी जिल्ह्यांत एक सालीं एक दोन महिन्याच्या अवकाशांत सुमारें पांचशें मण अंड्यांचा नाश करण्यांत आला होता. ते कीटकावस्थेंत असतां त्यांस पंख नसतात अशा प्रसंगीं त्यांस खाड्यांत लोटून वर माती घातली कीं ते मरतात.

काव्येतिहाससंग्रहांत छापिलेल्या ‘ पत्रें यादी ’ प्रकरणा-पैकीं लेखांक ४९२ वरून पाहतां, अधिक अश्विन वद्य ४ शके १६७९ या दिवशीं महाराष्ट्रांत मोठी टोळधाड आली होती. सदर पुस्तकाच्या याच प्रकरणांतील ४९३ व्या लेखांत दुसरी टोळधाड शके १७२१ चे चैत्र वैशाखमासीं आल्याचा उल्लेख केला असून, या धाडीमुळें ‘ झाडास पान राहिलें नाहीं ’ असेंही ह्मटलें आहे. परंतु अशा प्रसंगीं सर-कारांतून कोणकोणत्या तजविजी योजण्यांत येत व लोक काय करीत या विषयींची माहिती कोठें मिळाली नाहीं.

कमजास्त पाऊस पडून पिकांचा नाश होणें किंवा टोळ वगैरेच्या धाडी येऊन पिकें हातीं न लागणें या दोन गोष्टी केवळ ईश्वरी इच्छेवर अवलंबून आहेत. त्यांचा प्रतिकार मनुष्यास कोणत्या रीतीनें कितपत करितां येईल याचें विवेचन वर करण्यांत आलेंच आहे; आणि यासच अनुसरून इंग्लंडांतील राजपक्षाची मंडळी असें प्रतिपादन करितात कीं, " हिंदुस्थानाच्या लोकांकरितां दुष्काळासारख्या प्रसंगीं आह्मांला करितां येण्यासारखी गोष्ट ह्मटली ह्मणजे, दुष्काळ कामें काढून उपाशी मरणाऱ्या लोकांचे जीव वांचवावयाचे, व सुबत्तेच्या दिवसांची वाट पहावयाची. ह्या त्यांच्या बोलण्यांत किती तथ्य आहे, याचा विचार पुढें होईलच; परंतु सध्यां इतकें सांगणें अवश्य आहे कीं, वरील दोन कारणें हीं हिंदुस्थानाच्या दुष्काळाचीं खरीं कारणें नव्हत. तर हिंदुस्थानांत जो सततचा दुष्काळ पडला आहे, तेथें जे सर चार्ल्स इलियट साहेबांच्या मताप्रमाणें शेतकऱ्यांपैकीं निम्मे लोक नेहमींची उपासमार काढीत आहेत व सर हंटरच्या मताप्रमाणें चार कोटी लोक अर्ध पोटीं राहत आहेत; त्या दुष्काळाला या दोन कारणांनीं होणारी पिकाची नासाडी त्याच्या बीजरूपांतून काढून प्रकट करते.

सर वुइल्यम वेडरबर्न, व रेव्हेन्यु कमिशनर सारख्या सरकारी बड्या अधिकारावर कित्येक वर्षें काम केलेले आणि आमच्या पंधराव्या राष्ट्रीय परिषदेचे सन्माननीय अध्यक्ष सर रोमेशचंद्रदत्त यांचें ह्मणणें तरी हेंच आहे, ते ह्मणतात:—

" The failure of crops is not the cause but only the occasion of famine. "

प्रख्यात फ्रेंच लेखक कव्हिअर ह्मणतो कीं, ' हल्लींच्या काळांत कोणत्याही देशांत दुष्काळ होणें शक्यच नाहीं." आणि हें खरें आहे. एकाद्या देशांत पावसाच्या कमी जास्त पडण्यानें किंवा धाडीनें वगैरे पिकाची नासाडी होण्याचा संभव आहे. पण त्या देशांतल्या लोकांस द्रव्यादिकांची अनुकूलता असल्यास सध्यां व्यापारांचीं साधनें अनुकूल झाल्यामुळें ते आपल्या गरजा परदेशांतून धान्य आणून भागवितील आणि तेथें दुष्काळाऐवजीं फक्त महागाईच होईल. युरोपखंडाच्या पश्चिम भागांत कित्येक वेळां पिकाची नासाडी झाली. परंतु साऱ्या एकोणिसाव्या शतकांत इ. स. १८४७ च्या आयर्लंडांतील एका साधारण दुष्काळावांचून दुसरा एकही दुष्काळ तेथें पडला नाहीं. लोकांची स्थिति साधारण बरी असली ह्मणजे आमच्या पहिल्या दोन कारणांनीं महागाईपेक्षां अधिक कांहीं होत नाहीं. याचें दुसरें उदाहरण इ. स. १८७६ सालांतील बंगालचा दुष्काळ हें होय. मि. दत्त यांनीं लंडन टाईम्स पत्रांत लिहिलें आहे कीं, " सदर प्रसंगीं लोकांनीं आपल्या मागील शिल्कीवर उपजीविका केली आणि मला पोरकीं पोरें, ह्मातारीं माणसें आणि बायका यावांचून कोणासही मदत करण्याचा प्रसंग आला नाहीं. "

या संबंधाचें तिसरें उदाहरण टाईम्स ऑफ इंडियाच्या खास बातमीदारानें, त्या पत्रास कळविलेल्या मोर्वीसंस्थानच्या स्थितीचें होय. हा बातमीदार ह्मणतो " मोर्वीसंस्थान कच्छचे रणांत असल्यामुळें तेथली जमीन अगदींच नापीक आहे. या संस्थानची लोकसंख्या अवघी एक लक्ष चौदा-

हजार आहे. इंग्रजी मुलखाप्रमाणेंच येथेंही अवर्षण होऊन दुष्काळ पडला आहे. परंतु तेथल्या हिंदुराजास आपली प्रजा सुखासमाधानांत असण्यांत मोठा अभिमान वाटत असल्यामुळें ती या दुष्काळांतही मोठ्या आनंदांत आहे." याच्या उलट चौथें उदाहरण आमच्या सुधारलेल्या इंग्रजबहाद्दराच्या अमलांतील मद्रास इलाख्याचें होय. येथें १८७७ सालच्या दुष्काळांत एकाच अनावृष्टीनें झालेल्या दुष्काळास पन्नास लक्ष लोक बळी पडले!

पाऊस कमीजास्त पडणें व टोळधाडीसारखीं अरिष्टें येणें या गोष्टी जरी मनुष्याच्या हातच्या नाहींत, तरी त्याचें निवारण थोड्या बहुत प्रमाणानें माणसांस कसें करितां येईल व यदाकदाचित् तें करितां आलें नाहीं तरी या दोन कारणांनीं, लोक जर सुखी असतील, त्यांच्यामध्यें जर कांहीं त्राण असेल, तर दुष्काळ न होतां, त्यांचें संकट मनुष्यहानीशिवाय केवळ महगाईवर कसें निभावून जाईल, या गोष्टी, वरील विवेचन व त्याच्या पुष्टीकरणार्थ दिलेलीं निरनिराळीं चार उदाहरणें, यावरून वाचकांच्या लक्षांत आल्या असतील. आतां आपण दुष्काळ पडण्याच्या तिसऱ्या कारणाकडे वळून तें आपल्या देशास कितपत लागू पडतें हें पाहूं.

तिसरें कारण—हिंदुस्थानांत प्रत्यक्ष शेतकीवर निर्वाह करणारे शेतकरी लोक, ह्मणजे जमिनीचे मालक व त्यांचीं कुळें मिळून एकंदर अजमासें अठरा कोटी ह्मणजे शेंकडा सरासरी ६० आहेत. परंतु ज्यांची उपजीविका केवळ शेतकीवर अवलंबून आहे, अशा सर्व लोकांचा

शेतकर्‍यांत अंतर्भाव केला असतां, हें प्रमाण शेंकडा पंचा-यशीच्याही वर जातें. अर्थात् पूर्वींचा व्यापारी हिंदुस्थान देश, आतां बहुतांशीं शेतकीवर अवलंबून रहाणारा झाला आहे. अशा लोकांजवळ जर कोणत्याही प्रकारची शिल्लक नसेल, तर त्यांस एका वर्षाच्या अनावृष्टीनें उपाशीं मर-ण्याची पाळी आल्यास कांहीं नवल नाहीं; परंतु ही स्थिति अनिवार्य आहे काय? हिंदुस्थानांतील लोकांस शेतकीवांचून दुसरा धंदा करण्यास जागाच नाहीं काय? जो देश शंभर दीडशें वर्षांच्या पूर्वीं केवळ सुवर्णभूमि ह्मणून जिकडे तिकडे गाजत असे आज ज्यांच्या राज्यावर सूर्य मावळत नाहीं असे इंग्रज ज्यावेळीं अंगाला रंग लावून व कातडीं पांघ-रून रानोमाळ भटकत असत, त्यावेळीं ज्या देशांतील डाक्याची मलमल, काश्मीरच्या शाली आणि दिल्लीचा किनखाप, सीझर राजाच्या दरबाराला शोभा आणीत असे, लंडनची जगाला ओळख होण्याचे पूर्वींच जेथलीं धातूंवर, हस्तिदंतावर आणि शिशाच्या व चंदनाच्या लांकडावर के-लेलीं नकशांचीं कामें, जेथलीं डोळ्यांस दिपविणारीं अत्यंत तेजस्वी रत्नें, जेथल्या चित्रविचित्र मखमाली आणि सुबक गालीचे, जेथलें पोलादी काम, मातीचीं भांडीं आणि उत्तम नौका पृथ्वीवर सर्व ठिकाणीं नामांकित ठरल्या होत्या, त्या देशांतील शेंकडा ऐंशीं नव्वद लोकांनीं एकादा दुष्काळ पड-तांच कांखावगता वर करून यमाजीभास्कराच्याच घरची वाट सुधारली पाहिजे काय तेथें उदीमव्यापारांची कांहींच सोय नाहीं काय? तेथल्या जमीनींत कांहींच कां खनिज द्रव्यें नाहींत? तेथले चतुर्दश रत्नें प्रसवणारे समुद्र, आज

काय तेथल्या लोकांप्रमाणें अगदींच निष्कांचन झाले? या प्रश्नांचीं उत्तरें आपण दिलीं, ह्मणजे आमच्या तिसऱ्या कारणामुळें येथें पडणारे दुष्काळ कांहीं दिवसांच्या प्रयत्नांनीं आपणांस कसे टाळतां येतील हें वाचकांस समजेल.

प्रथम लोखंड वगैरे खनिज धातूंसंबंधानेंच विचार करूं. दिल्ली येथें सुमारें १५०० वर्षांपूर्वी उभारलेला एक लोहस्तंभ आहे. तो पाहिला ह्मणजे सांप्रतचे परदेशस्थ कारागीर तोंडांत बोटें घालतात आणि ह्मणतात "अशा प्रकारचें लोखंडकाम करण्यासारखे कारखाने आज देखील जगांत फार थोडे सांपडतील." आसामांतील तोफा आणि शिरहद्दीच्या तरवारी तर सर्व जगांत प्रसिद्ध होत्या आणि विलायती लोक चाकू. कात्र्या बनविण्यास हिंदुस्थानी पोलाद नेत. परंतु आज ही सर्व स्थिति बदलून गेली आहे. आज यत्किंचित् टांचणी सुईपासून तों तहत गिरण्यांतील मोठमोठाल्या लोखंडी व पोलादी यंत्रांपर्यंत सर्व सामान परदेशांतून आणावें लागतें व त्याकरितां दरसाल आमचे नऊ कोट रुपये परदेशास जाऊन, आमच्या धावड, घिसाडी, लोहार वगैरे लोखंडी कामें करणाऱ्या लोकांस आपापला धंदा सोडून शेतीकडे धांव मारावी लागते.

प्राचीन काळीं हिंदुस्थानच्या जमिनींत लोखंड सांपडत असे; आणि आज त्याचा अगदींच नायनाट झाला काय? छेः असें मुळींच नाहीं. आमच्या जवळ असलेल्या माहितीवरून पाहतां हिंदुस्थानांत निरनिराळ्या बत्तीस ठिकाणीं विपुल लोखंड सांपडतें. परंतु नुसतें लोखंड सांपडून उपयोगाचें नाहीं. लोखंड गाळण्याचा कारखाना काढावयाचा

ह्मणजे तेथें सरपणाची फार अवश्यकता असते. एक टन लोखंड गाळण्यास सुमारें चौदा टन कोळसा लागतो. परंतु वरील बत्तीस ठिकाणांपैकीं सोळा ठिकाणीं असा सरपणाचा पुरवठाही आहे. मध्यप्रांतांत चांदा, बंगाल्यांत हजारी बाग, मुंबई इलाख्यांत कच्छ, वायव्य प्रांतांत कुमेआन आणि आसामांत कासिया व जुंटियाचे डोंगर येथें निर्भेळ लोखंड विपूल असून कारखान्यास अवश्य लागणाऱ्या जळणाचाही उत्कृष्ठ पुरवठा आहे. असें असूनही यूरोपीयन पद्धतीनें लोखंड गाळण्याचे मोठे कारखाने कायते दोनच आहेत. एक बंगाल इलाख्यांत ब्याकूल येथें व दुसरा अंबाल्याजवळ नाहन संस्थानांत आहे. इ. स. १८९३ सालीं वर दिल्याप्रमाणें अनुकूलावस्थेंत अवघे ३७१०२ टन ह्मणजे २३१३७१ रुपयांचें लोखंड हिंदुस्थानांत निघालें. "सांपत्तिक भूगर्भशास्त्र" या पुस्तकाचे कर्ते बॉल साहेब ह्मणतात कीं "राणीगंज येथें कोणी लोखंडाचा कारखाना काढील तर बंगाल्यांत परदेशी लोखंडाची डाळ शिजणार नाहीं," व क्याप्टन हाऊनसेंड यांचें असें मत आहे कीं, दक्षिण हिंदुस्थानांत सालेम येथें चांगल्या लोखंडाचा कारखाना विशेष फायदेशीर होईल." या गोष्टी लक्षांत ठेवण्या सारख्या आहेत.

सोनें बहुतेक सर्व देशांत सांपडतें. आमच्या जवळच्या यादींत ज्या ठिकाणीं सोनें सांपडतें अशीं ठिकाणें सरासरी चाळीस दिलीं आहेत. पैकीं ह्मैसूर, व मद्रास इलाख्यांतील वायनाड या दोन ठिकाणीं यूरोपीयन लोकांचे देखरेखीखालीं चांगल्या पद्धतशीर रीतीनें सोनें काढण्यांत येतें, ह्मैसूरांत

सन १८९२ सालीं १६३१८८ औंस ह्मणजे जवळ जवळ ९९ लक्ष रुपये किमतीचें सोनें काढिलें. परदेशांतून दर वर्षी सुमारें चार कोटी रुपये किमतीचें सोनें हिंदुस्थानांत येतें. ह्मैसूर वांचून इतर ठिकाणीं झारेकऱ्यांप्रमाणें चाळून कांहीं सोनें काढितात, परंतु तें फार थोडें असतें. तेथेंही जर अशाच उत्तम देखरेखी खालीं सुधारलेल्या पद्धतीवर काम चालू होईल, तर देशांतील लोकांस मजूरी मिळून परदेशांत जाणारा पैसा देशांतल्या देशांत राहील.

आपल्या देशाची जमीन भूगर्भशास्त्रदृष्ट्या सर्व धातु सांपडण्यासारखी आहे. परंतु रुपें, कोठें किती सांपडतें, याची माहिती कोठें मिळाली नाहीं. तथापि सरकारी टांकसाळींत चांदीचें नाणें पाडण्याचें बंद होईपर्यंत येथें दरसाल नऊ कोट रुपयांची चांदी परदेशांतून येत असे. धारवाड, मध्यप्रांत, राजपुताना, काश्मीर वगैरे ठिकाणीं पुष्कळ तांबें सांपडतें व यूरोपांतून तांबें इकडे येऊन आमच्या या धंद्यास अर्धचंद्र मिळेपर्यंत वरील सर्व ठिकाणीं तें पुष्कळ निघत असे. अलीकडे बंगाल इलाख्यांतील हजारीबाग जिल्ह्यांत बरागंडा येथें अशोधित धातुपासून शुद्ध तांबें काढण्याचे प्रयत्न यूरोपियन लोकांनीं पुष्कळ चालविले आहेत. इ० स० १८९० सालीं येथें ३०९ टन तांबें काढलें. त्याची किंमत २,३४,००० रु० झाली. दरसाल सुमारें दीड कोटी रुपयांचे तांब्याचे पत्रे आपल्या देशांत येतात.

याशिवाय कथील, शिसें, जस्त व, कॅलेमाईन, ब्लेंड, निकल, आलोमिन, म्यांगनीझ वगैरे नवीन धातूही आपलेइकडे पुष्कळ सांपडतात. नाशिक जिल्ह्यांत व इतर ठिकाणीं

तांबें व जस्त घालून पितळ करण्याचे काम बरेंच चालतें. दुसऱ्या कांहीं मिश्रधातु आपले कारागीर तयार करितात. कोणी योग्य मार्गदर्शक मिळेल तर जर्मन सिल्व्हर सारखीं मिश्रणेंही ते करूं शकतील. हिंदुस्थानांतील खनिज द्रव्यांवर रा. बर्वे यांनीं एक लहानसें पुस्तक लिहिलें असून त्यांत सुरतेनजीकच्या प्रदेशांत सिनोबार, ह्मणजे पाऱ्याची अशोधित धातु सांपडते व त्यास गुजराथी लोक "काचो पारो ह्मणतात" असें लिहिलें आहे.

हें खनिज धातुसंबंधानें झालें. आतां मीठ, सोरा, दगड, कांच, हिरे, माणकें, राकेल व दगडी कोळसे इत्यादि खनिज द्रव्यांसंबंधीं विचार करूं. पूर्वी कोणी संस्कृत कवीनें "दुर्लभं मानुषं जन्म भारते तत्र दुर्लभम्" असें ह्मटलें आहे तें अगदीं खरें आहे. आमची अवस्था मात्र कोंबडा आणि रत्न, या गोष्टींतील कोंबड्याप्रमाणें झाली आहे. असो. या खनिज द्रव्यानेंही आमची मायभूमी अगदीं पूर्ण भरली आहे. हिंदुस्थानांत अजमासें नऊ लक्ष टन मीठ उत्पन्न होतें. व साडेतीन लक्ष टन परदेशांतून येतें. फक्त पंजाबांतल्या खाणींत इ० स० १८९३ सालीं एक लक्ष टनापेक्षां जास्त टन मीठ सांपडलें. कृतीनें सोरा करण्याचा शोध परदेशांत लागल्यापासून येथील खनिज सोऱ्याच्या व्यापाराला मंदी आली आहे. हल्लीं सुमारें चार पांच लक्ष रुपयांचा सोरा बाहेरदेशीं जातो. जेड दगड ब्रह्मदेशांत सांपडतो व त्याचा खप चिनांत होतो. अशुद्ध प्रकारची कांच आपले इकडे गुजराथेंत कपडवंज वगैरे ठिकाणीं तयार होते. या शिवाय अलवार, बंगाला वगैरे ठिकाणीं ही कांच करण्याचे कार-

खाने आहेत, त्यांचें काम व्यवस्थित चालून जर कांच उत्तम रितीनें शुद्ध होईल तर जवळ जवळ ऐशीं लक्ष रुपयांचें कांच काम आपल्या देशांत येतें तें बंद होऊन आपला पैसा आपल्या देशांत राहील. छोटा नागपूर, बुंदेलखंड हैदराबाद, गोवळकोंडा वगैरे ठिकाणीं हिऱ्यांच्या खाणी आहेत; परंतु यांत पुष्कळ हिरे सांपडत नाहींत. माणकें, ब्रह्मदेशांतील सुमारें ६६ चौरस मैल प्रदेशांत सांपडतात व तीं काढण्याचें काम कंपन्यांकडून चाललें आहे. रॉकेलच्या विहिरी ब्रह्मदेश, आसाम व पंजाब प्रांतांत आहेत परंतु त्यांतून तेल निघावें तितकें निघत नाहीं; आपल्या देशांत सरासरी आठ लक्ष रुपये किंमतीचें रॉकेल निघतें आणि तेंच बाहेरून तीन कोटी पेक्षां जास्त किंमतीचें येतें. इंग्लंड देशास सुसंपन्न करणारा जो दगडी-कोळसा तोही आतां आपल्या देशांत पुष्कळ सांपडूं लागला आहे. इ. स. १८८८ सालीं सुमारें दोन कोटींचा कोळसा परदेशांतून आपल्याकडे येत असे तो १८९२ सालीं त्याचा खप अत्यंत झपाट्यानें वाढत असतां अवघा सवा कोटीचाच आला, आणि हल्लीं तर केवळ ९७।९८ लक्षांचाच येतो. आपल्या देशांत १८७५।७६ सालीं फक्त १० लक्ष टन कोळसा निघत असे तो हल्लीं सव्वीस लक्ष टन निघतो. मुंबई, मद्रास, व वायव्येकडील प्रांत हे इलाखे शिवाय करून बाकीच्या बहुतेक इलाख्यांत याच्या खाणी आहेत. यांपैकीं कांहीं मोठ्या खाणी मात्र सरकारच्या देखरेखीखालीं आहेत व बाकीच्या खासगी कंपन्यांच्या देखरेखीखालीं आहेत. आपल्या कोळशाचा बराच भाग परदेशीं रवाना

होतो. सन १८९२ सालीं वीस लक्ष टन कोळसा या प्रमाणें रवाना झाला.

मोतीं सिंव्हल द्वीपाच्या किनाऱ्यावर सांपडतात. दर साल जवळ जवळ वीस लक्षांचीं मोतीं आणि सतरा लक्षांचीं पोवळीं परदेशांतून इकडे येतात. पोंवळीं आपल्या इकडे कोठें होत नाहींत.

या तिसऱ्या मुद्याविषयीं केलेल्या विवरणावरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं, आजपर्यंत माहिती असलेल्या बहुतेक सर्व प्रकारच्या धातु आणि अत्यंत महत्वाचीं अशीं खनिजद्रव्यें हिंदुस्थानांत तेथें असलेल्या खपापेक्षांही पुष्कळ अधिक प्रमाणानें मिळूं शकतील. मात्र त्यांना भूमातेच्या उदरांतून बाहेर काढून स्वच्छ करण्याची मेहनत आह्मीं केली पाहिजे; आमचे बापदादे अमका धंदा करीत आले तो टाकून आह्मीं तमका कसा पत्करावा असल्या वेडगळ समजुती आह्मीं टाकून दिल्या पाहिजेत, आणि आह्मांपैकीं ज्यांच्या डोक्यावर लक्ष्मीचें कृपाछत्र झुलत असेल त्यांनीं छाती करून आपल्या पिशवीचे बंद ढीले केले पाहिजेत; दागिन्यांच्या चालत्याबोलत्या तावदानामधून ते या नवीन धंद्यांत खर्ची घातले पाहिजेत आणि आपल्या पुरून ठेवलेल्या हांड्यांतून रुपये काढून ते निरनिराळ्या खाणींत घालण्याचें मनावर धरलें पाहिजे. सवाई दिडीचीं व्याजें घेऊन आपल्याच गरीब गुरीब बंधु जनांच्या माना मुरगळण्याचें सोडून दिलें पाहिजे, आपण दुकानदार बनण्यापेक्षां उदमी बनण्याची हांव धरली पाहिजे आणि एकलकोंडेपणानें राहून एकमेकांस पाण्यांत पाहण्यापेक्षां एकमेकांचे भागीदार

करून समाईकीनें मोठमोठीं कामें शिरावर घेतलीं पाहिजेत.

तुह्मीं आतां दुसऱ्याच्या ओंजळीनें किती दिवस पाणी-पिणार! सर्व जगांतील लोक वायुवेगानें पुढें जात असतां तुमची ही पिपीलिकागती कधीं सुटणार? या काळांत कोणी कोणाला खांद्यावर उचलून पुढें नेणार नाहीं. ज्याची त्यानें आपली मुंडी मोठ्या नेटानें पुढें खुपसली पाहिजे. सरकारच्या मदतीवर तुह्मीं विशेष अवलंबून राहूं नका. ह्मणजे अवश्य ती मदत त्यांच्याकडून तुह्मांला मिळेल. आपलें सरकार अप्रतिबंध व्यापाराचे उत्तेजक असल्यामुळें येथील धंद्यास उत्तेजन मिळावें ह्मणून ते कधीं तुह्मांला दक्षिण ( Bounty ) लावणार नाहीं. किंवा परक्या देशां-तून येथें येणाऱ्या मालावर जकातही बसविणार नाहीं.

सरकारांनीं हे धंदे कांहीं दिवस स्वतः चालवावेत आणि ते चांगले फायदेशीर होऊं लागल्यावर फ्रेंच सरकाराप्रमाणें खर्च झालेला पैसा घेऊन खासगी कंपन्यांच्या स्वाधीन करा-वेत. किंवा लोकांस असल्या धंद्यास पैसे घालण्याचा धीर यावा ह्मणून व्याजाची हमी घेण्यास तयार व्हावें. आणि आगगाडीच्या प्रसाराचे कामीं, चहाच्या लागवडीचे संबं-धांत व चांगल्या कापसाची लागवड करण्याच्या बाबतींत सरकारनीं अशी हमी घेतली आहे. ह्मणून या कामांतही त्यांच्याकडून कांहीं हरकत येईल असें दिसत नाहीं.

अशा रीतीनें खाणींत—केवळ जमिनींत—पुरून राहिले-ल्या खनिज संपत्तीला आपण बाहेर काढली पाहिजे. ह्या संपत्तीचें पीक कांहीं पावसाच्या कमी जास्त प्रमाणावर अवलंबून नाहीं. पाऊस न पडला ह्मणजे आमची भाताचीं

किंवा गव्हांचीं वगैरे शेतें जशी सुकतात किंवा अधिक पर्ड-ल्यानें तीं जशी कुजतात तसें लोखंडादि खनिज धातूंचें किंवा दगडी कोळसे वगैरे खनिज द्रव्यांचें होत नाहीं. आह्मीं जे आज केवळ शेतकरी बनत चाललों आहों त्या आह्मांला धांवड आणि लोहार बनलें पाहिजे. ह्मणजे पहिलीं दोन कारणें उत्पन्न होऊन पेटलेल्या दुष्काळाग्निच्या ज्वाळांनीं होरपळण्याची पाळी आह्मांवर येणार नाहीं.

असो. आह्मीं खाणींत पडून राहिलेले पदार्थ आपल्या द्रव्याच्या आणि यत्नाच्या बळानें काढून त्यांना अगदीं शुद्ध केलें ह्मणजे आमचें कर्तव्य संपलें काय? छे! असें बिलकूल नाहीं. वास्तविक आपल्या कर्तव्याला येथू[illegible] च झाला; असें आपण मानिलें पाहिजे. आपणापैकीं बरेच शेतकरी धांवड आणि लोहार बनले तरी "हिंदुस्थान ह्मणजे केवळ कच्चा माल उत्पन्न करणारें राष्ट्र अशी जी सध्यां आपली अपकिर्ती झाली आहे ती कांहीं कमी होणार नाहीं. ती कमी करावयाची ह्मणजे आपणांस याच्या वरच्या पायरीवर गेलें पाहिजे. आपण पक्का माल उत्पन्न करण्याच्या व तो परदेशीं पाठविण्याच्या तजविजीस लागलें पाहिजे. जवस भुईमुग, तीळ वगैरे परदेशीं पाठवावयाचे सोडून, त्यांचीं तेलें गाळून तीं तिकडे रवाना केलीं पाहिजेत, रंगाच्या वनस्पती न पाठवितां त्यांचे रंग करून पाठविले पाहिजेत; गव्हा ऐवजीं बिस्किटें बनवून तीं रवाना केलीं पाहिजेत; गुळाबद्दल साखर नेली पाहिजे; कापूस, लोंकर. रेशीम, ताग वगैरे वस्तूंच्या ऐवजीं कापड, शाली, रेशमी व तागी वस्त्रें तिकडे नेलीं पाहिजेत. नुसती कातडीं न पाठवितां तीं कमा-

वून त्यांच्या निरनिराळ्या वस्तू बनवून त्या पाठविल्या पाहि-
जेत, चिंध्यांच्या ऐवजीं कागद धाडिले पाहिजेत. अशीं एक कीं दोन शेंकडों उदाहरणें देतां येतील.

पक्का माल किंवा ज्याला आपण प्रस्तुत तिसऱ्या कारणांत हस्त कौशल्य आणि यंत्रसाह्य यांच्या योगानें तयार केलेला माल असें ह्मटलें आहे; त्या मालाचीं बहुतेक मूल-द्रव्यें आपल्या देशांत उत्पन्न होत असून व कांहीं उत्पन्न होण्यासारखी असून आपण तीं तशींच परकीय देशांत पाठवितो व त्याचा वरील प्रकारचा बनविलेला माल आपल्या देशांत आणितों या घातक प्रकारानें आपलें फार नुकसान होत आहे.

आपल्याकडे हस्तकौशल्य चांगले होतें; या विषयींची साक्ष रामायणादि ग्रंथावरून पटेल. अबुलफाजलच्या ऐनेअकबरी ग्रंथांत या विषयींची बरीच माहिती दिली आहे. आणि पुष्कळ जुन्या ग्रंथांच्या व लेखांच्या आधारानें सर जार्ज बर्डवुड यांनीं "हिंदुस्थानांतील कलाकौशल्य" ह्मणून जें एक पुस्तक लिहिलें आहे त्यांत व हंटर साहेबांच्या "इंडियनएम्पायर" नामक ग्रथांत या विषयीं पुष्कळच माहिती दिली आहे पाश्चिमात्य लोकांनीं अग्नि, विद्युत् वगैरे सृष्टशक्तिस आपल्या दासी बनविल्यापासून, हिंदुस्थानाच्या पदार्थांस आपला बाजार अगदीं सक्तीनें बंद केल्यापासून, कलाकौशल्याच्या जिनसांच्या उपभोक्त्या एतद्देशीय संस्थानिकांचा दलहौसी साहेबांच्या भयंकर जबड्यांत स्वाहाकार झाल्यापासून आणि अमेरिकन लढाईचे प्रसंगीं कापसाच्या वगैरे झालेल्या महर्गतेपासून आमच्या बिचाऱ्या कारागिरांनीं हात टेंकले.

साळी, सुतार, कुंभार लोहार, चांभार सर्वांनीं आपआपली हत्यारें टाकून नांगराकडे धांव मारली; आणि शेतकीच्या धंद्याचे क्षेत्रांत गर्दी उडून या बिचाऱ्यांवर अन्नावांचून मरण्याची पाळी आली.

असो. आमच्या लोकांचें लक्ष्य आतां सृष्टशक्तीच्या उपयोगानें पक्का माल बनविण्याकडे लागण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. इ. स. १८५१ सालीं मुंबईस पहिली कापडाची गिरणी "रणछोडलाल छोटालाल" यांच्या प्रयत्नानें स्थापन झाली. तेव्हांपासून आजपर्यंत आपल्या देशांत कापडांच्या गिरण्यांची संख्या सुमारें दीडशें झाली आहे. याशिवाय सर्व देशभर तागाच्या, रेशमाच्या, लोंकरीच्या, कागदाच्या वगैरे बऱ्याच गिरण्या निघाल्या असून शिवाय कातडीं कमाविण्याचे, दारू गाळण्याचे, साबण करण्याचे, दोऱ्यांचे, साखरेचे, पिठाचे, हाडेंचुरण्याचे, तेल काढण्याचे, चिरुट करण्याचे, लोखंडी व पितळी सामानाचे, कुंभार कामाचे वगैरे लहान लहान कारखाने बरेच अस्तित्वांत येत आहेत; तथापि या कारखान्यांत बरेच युरोपियन भांडवल असल्यामुळें त्यां पैकीं फारच थोड्यांच्या शिवाय आह्मी बहुतेक मजुरीचेच धनी आहोंत. आणि अद्यापि परकीदेशांचा माल दरसाल जवळ जवळ एक अब्ज रुपयांचा आपल्या देशांत खपत आहे. या गोष्टीवरून आह्मांला या कामीं किती प्रयत्न करावयास पाहिजे आहेत हें वाचकांच्या लक्ष्यांत येईल.'

या बाबतींत सुधारणा करण्याचें काम सरकाराचें आहे. त्यांनीं निदान प्रत्येक जिल्ह्यांत एक तरी धंदेशिक्षणाची

शाळा स्थापन केली पाहिजे. सध्यां सर्व हिंदुस्थानांत असल्या शाळा सुमारें सत्तर आहेत. या संबंधांत आज मुंबई इलाख्याचें पाऊल पुढें आहे. सरकारी रिपोर्टावरून पहातां इ. स. १८९८।९९ सालीं या इलाख्यांत धंदे शिक्षणाच्या शाळा सोळा, पैकीं १५ खासगी व एक सरकारी, त्यांत शिकणारे विद्यार्थी १३४३ व त्या कामाकरितां एकंदर खर्च १८९९६८ रुपये इतका होत होता. बाकीच्या इलाख्याची स्थिति तर याहीपेक्षां फारच वाईट आहे. इ. स. १८९३।९४ सालीं या बाबतींत लोकांची कागाळी सरकारच्या कानावर गेली व नंतर स्थानिक सरकारचे अभिप्राय मागवून स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं एक ठराव प्रसिद्ध केला. त्यांत ते ह्मणतात कीं "धंदे शिक्षणाच्या शाळांचें स्वरूप बदललें पाहिजे. या संस्थांत असा बदल करावा कीं, त्यांत मिळणाऱ्या शिक्षणापासून लोकांस उपजीविकेची साधनें सुधारतां येतील." परंतु गोड गोड असून केवळ कागदोपत्रीं राहणाऱ्या ठरावांपैकींच हा एक होता. त्याची अंमल बाजवणी होण्याचें दूरच राहिलें; उलट सदर सालीं या शाळा अठरा पैकीं सोळा खासगी व दोन सरकारी होत्या, त्यांत १४०४ विद्यार्थी शिकत होते आणि याकरितां २००५६५ रुपये खर्च होत होता; तें सर्व मान फिरून त्याचा वर लिहिल्याप्रमाणें ऱ्हास झाला. सध्यां असलेल्या शाळांपैकीं इ. स. १८८८।८९ सालीं स्थापन झालेले मुंबईचें व्हिक्टोरिया 'ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूशन आणि सिंध प्रांतांतील करीदादखान यांची शाळा, मद्रास व कलकत्ता आर्टस स्कूल या मात्र आपलें

कडील प्रांतांत एका एकरास ११४० पौंड गहूं उत्पन्न होत, ते आतां अवघे ८४० पौंड होतात. जमीन तीच, शेतकऱ्यांची अक्कल तीच, आणि आउतांची स्थिति तीच; तर मग दर एकरीं ३०० पौंड उत्पन्न कमी कां? अर्थात् जमिनीमध्यें पडावा तितका राब पडत नाहीं व गुरांच्या कमतरतेमुळें आणि अशक्ततेमुळें तिची मेहेनतमशागत व्हावी तशी होत नाहीं. असें ह्मणावें लागतें.

सर वुईल्यम हंटर यांनीं आपल्या इंडियन एम्पायर नामक पुस्तकांत ह्मटलें आहे कीं " देशांतील जगलें तुटलीं, इतकेंच नाहीं, तर पुष्कळ ठिकाणच्या लोकांनीं कुरणांत लागवड केल्यामुळें फाजील जमीन लागवडीस येऊन गुरांस गवत मिळेनासें झालें. " हें त्यांचें ह्मणणें अगदीं खरें आहे. परंतु लोकांचीं खासगत जंगलें तुटलीं आहेत. सरकारी जंगलाचा विस्तार सारखा वाढतच आहे. हें आह्मी पहिल्या कारणाचा विचार करीत असतां दिलेल्या आंकड्याकडे पाहून वाचकांच्या ताबडतोब लक्ष्यांत येईल. इ. स. १८७८ सालीं जेव्हां जंगलाचा कायदा पास केला; तेव्हां सरकारांतून " हा कायदा आह्मी उत्पन्नासाठीं करीत नसून केवळ तुमच्या फायद्याकरितां करीत आहों, जंगल राखलें असतां हिंदुस्थानांत वारंवार पडणारे दुष्काळ थोड्या अंशानें तरी कमी करितां येतील असें आह्मांस वाटतें; आह्मी उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न मुळींच करणार नाहीं असें स्पष्ट सांगण्यांत आलें. परंतु सरकारचें हें सांगणें केवळ तितक्या पुरतेंच होतें. ईस्ट इंडिया कंपनीनें केलेल्या

कित्येक ठरावांस बाजूला सारून लोकांच्या मालकी-च्या जमिनी बळकाविण्याचा आणि जंगलें राखून उत्पन्न वाढविण्याचा क्रम त्यांनीं मोठ्या झपाट्यानें चालविला. इ. स. १८७७ सालीं फक्त मद्रास इलाख्याचें जंगलचें उत्पन्न साडेचार लक्ष होतें; तें इ. स. १८८९ सालीं तेरा लाख झालें! ही फक्त मद्रास इलाख्याची गोष्ट! सर्व हिंदुस्थानाचेंही असेंच झालें. इ. स. १८८१-८२ सालीं सर्व हिंदुस्थानचें जंगलउत्पन्न जवळ जवळ साडे-सत्त्यायशीं लक्ष होतें; तें इ. स. १८९४-९५ सालीं जवळ जवळ एक कोटी पांसष्ट लक्षांवर आलें. लोकांचीं जंगलें तुटलीं; कांहीं सरकारांत बळकावलीं; आणि सरकारची दृष्टी जंगलचें उत्पन्न वाढविण्याकडे लागली, यामुळें जंगल रक्षणाचे नियम अत्यंत कडक झाले; व चाऱ्याच्या टंचाई-मुळें लोकांचीं गुरें पटापट प्राण सोडूं लागलीं. इ. स. १८९१ सालीं सातव्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं वीर राघवा-चार्य ह्मणाले, "गेल्या वर्षीं दोन तीन जिल्ह्यांत मिळून ८१ हजारांहूनही अधिक गुरें मेलीं. याचें कारण केवळ जंगल कायद्याचा कडकपणाच होय. कांहीं जिल्ह्यांच्या कलेक्टरांनीं तर हा कडकपणा कमी करण्याविषयीं सरकारांत रीपो-र्टेही केले आहेत." एक मोठा ग्रंथकार हिंदुस्थाना-विषयीं लिहितांना, ह्मणतो कीं, "या देशांत शेत-कीस पुरेसा जनावरांचा संग्रह नाहीं व तीं चाऱ्यां-च्या कमताईमुळें चांगलीं पुष्ट नसतात." विलायतें-तील कृषिकर्मोत्तेजक सभेचे मसलतगार डॉ० व्होएलकर ह्मणतात, "जनावरांस हिंदुस्थानांत हवा तितका चारा न

मिळाल्यामुळें व तीं उत्पन्न करण्यासंबंधानें योग्य काळजी न घेतल्यामुळें तेथलीं गुरें फार अशक्त आहेत," आधींच चाऱ्याची टंचाई आणि त्यांत पावसाच्या अभावानें गवत कमी झालें ह्मणजे सरकारचीं जंगलें नजरेपुढें असतां बिचाऱ्या शेतकऱ्यांस लेंकरापेक्षां आवडत्या अशा आपल्या गुरांस, कीं, ज्यांच्यावर त्यांची सर्व मदार त्यांस, प्राण सोडतांना पाहून किती क्लेश होत असतील बरें! गेल्या दुष्काळांत सरकारांतून कांहीं जंगलें खुलीं करण्यांत आलीं होतीं; तरी देखील एकट्या गुजराथेंत सरासरी दहा लक्ष गुरें मेलीं! केवळ वैरण नाहीं ह्मणून पंजाबांत शंभर रुपये किंमतीचे घोडे दहा पंधरा रुपयांस विकले आणि कांहींनीं तर त्यांची उपासमार पाहवेना ह्मणून त्यांस गोळ्या घालून ठार केलें. पन्नास पन्नास रुपये किंमतीचीं गुरें रुपया दोन रुपयास—अगदीं त्यांच्या कातड्यापेक्षांही हलक्या किंमतीस—देशावर विकलेलीं आमच्या वाचकांपैकीं कित्येकांनीं पाहिलीं असतील. केवढा हा अनर्थ! दुष्काळाची गोष्ट एकीकडे ठेविली तरी एकंदर दरसाल सरासरीनें दहा लाख गुरांचा संहार होत आहे! मि० मॅकनाक्टन यांनीं संस्थानिक व आमचें सार्वभौम सरकार यांच्या राज्यपद्धतीची तुलना केली आहे. त्यांत ते ह्मणतात:—"संस्थानिक आपलीं बहुतेक कुरणें प्रजेस गुरें चारण्याकरितां देतात आणि आम्हीं तीं विकतों. ते आपली पड जमीन गायरान ह्मणून लोकांनां फुकट देतात किंवा उगाच नांवाला त्यांजपासून कांहीं पैसे घेतात, आणि आम्हीं अशा जमिनींतील चाऱ्याचे जास्त पैसे यावे ह्मणून लिलांव करितों."

सरकारी रिपोर्टावरून पाहतां पांच एकर लागवड जमिनीस फक्त दोन नांगरांचीं ढोरें असें प्रमाण आहे. हें सध्यांच्या स्थितींत अगदीं अपुरें आहे. यावरून देशांतील शेतकीस अवश्य लागणारीं जीं गुरें तीं पुष्ट होण्याकरितां सरकारांनीं आपले जंगल रखवालीचे नियम जास्त सवलतीचे करणें, लोकांस अधिक गायरानें मोकळीं ठेवणें व पडजमिनी गुरें चारण्याला थोडक्या पैशांत देणें किती अवश्य आहे हें वाचकांच्या लक्ष्यांत येईल.

या संबंधांत सरकारास आणखी एक सूचना अशी आहे कीं, सध्यां प्रदर्शनें करून उत्तम जनावरें तयार करणारांस बक्षिसें देणें वगैरे जे उपाय त्यांनीं चालू केले आहेत, त्यांचें प्रमाण वाढवून दर तालुक्याचे ठिकाणीं एक 'बलिवर्दालय' व दर जिल्ह्यास निदान दोन सालांनीं एकादें पशूचें व शेतकीचें प्रदर्शन केलें पाहिजे.

आमच्या मधील मृताच्या बाराव्या दिवशीं वृषोत्सर्ग करण्याची वहिवाट आतां बहुतेक मोडतच आली आहे. अशा रीतीनें सोडलेल्या पोळांस कधीं दावें लागत नसे. आणि त्यानें कोणाची कितीही नासाडी केली, तरी त्यास कोणी कोंडवाड्यांत नेत नसे. त्याला नांगराला धरावयाचा नाहीं किंवा गाडीस जुंपावयाचा नाहीं! असें असल्यामुळें हे पोळ गुरांच्या सदृढ संततीस उपयोगी पडत. आमचे नंदकरी व आमचा बेंदराचा सण किंवा वसुबारस यांचा, वरील गुरांच्या सदृढ संततीस उत्पन्न करण्याच्या कामीं व सध्यांच्या प्रदर्शनांच्या ऐवजीं पूर्वी बराच उपयोग होत

असावा असें दिसतें. या संस्थांचें योग्य सुधारणांसह पुनरुज्जीवन होईल तर तें अत्यंत इष्ट आहे.

असो. ठिकाठिकाणच्या गोरक्षक मंडळ्यांस या संबंधांत आमची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं खाटकाच्या हातचीं गुरें सोडविण्यापेक्षां देशांतील जनावरें बळकट कशीं करितां येतील या गोष्टीकडे विशेष लक्ष्य पुरवावें ह्मणजे त्यांचा हेतु जास्त सफल होईल. जमिनीवरचा सारा वाढल्यामुळें वैरण महाग झाली आणि ह्मणून गुरें रोडावलीं, असें मि. मॅकनाक्टन ह्मणतात, याचाही विचार सरकारांत झाला पाहिजे. हा धान्याचा प्रश्न आम्हीं सहाव्या कारणाच्या वेळीं विचारांत घेणार असल्यामुळें येथें त्याविषयीं विस्तारानें लिहिण्याचें कारण दिसत नाहीं.

गुरासंबंधानें वर आलेंच आहे. आतां राबासंबंधानें पाहूं गेलें तरी जंगलचे नियमच आड येतात. झाडांचा विस्तार किंवा रानांतील कवळकाठी याच्याकडे नुसत्या वांकड्या नजरेनें पाहिलें कीं, आलेच तपकिरी रंगाचे गार्ड धांवत! या जंगलच्यासंबंधीं गुन्ह्याचें मान कसें वाढत चाललें आहे, तें पाहिलें ह्मणजे बिचाऱ्या शेतकऱ्यांची स्थिति किती भयंकर झाली आहे, हें वाचकांच्या ध्यानांत येईल! इ. स. १८८१–८२ सालीं या कायद्याखालीं दोन हजार गुन्हे पकडले होते. ते पुढील दहा वर्षांच्या अखेरीस साडेचार हजार पकडण्यांत आले! "आई जेवूं घालीना व बाप भिक्षा मागूं देईना!" असा प्रकार आमच्या शेतकरी वर्गाचा झाला आहे. राबावांचून जमीनींत पीक निघत नाहीं आणि राब आणावा तर सरकारी शिपाई कोठडी दाखविल्यावांचून

रहात नाहींत. ह्मणून अवश्य असेल तर शेतकऱ्यावर ओझ्या-मागें पै दोन पै कर ठेवून जंगलांतून राब आणण्याची परवानगी सरकारांनीं त्यांस दिली पाहिजे.

आतां शेतकीचें तिसरें कृत्रिम साधन जें खत त्याचा विचार करूं. आपण जमिनींतून धान्यादिकरून जें पीक काढितों, त्यामुळें ती निःसत्व होते. एकाद्या मनुष्याची शक्ति मानसिक व शारीरिक श्रमानें क्षीण झाली असतां चांगलें पौष्टिक अन्न आणि व्यायाम यांनीं जशी ती भरून काढावी लागते; तशी पिकें वाढल्यामुळें क्षीण झालेली जमिनीची उत्पादक शक्ति खतानें भरून काढावी लागते. एकाद्या पिशवींत पुष्कळ जरी द्रव्य असलें तरी त्यांत भर न पडतां नित्य त्याचा खर्च झाला तर तें जसें नष्ट होईल, तसें जमीन जात्या कितीही सुपीक असली, तरी, तींत सुपीक द्रव्यांची भर न घालतां तीं द्रव्यें आपण त्या जमीनींतून पिकाच्या रूपानें काढूनच घेऊं लागलों, तर ती नापीक बनेल यांत कांहीं नवल नाहीं.

कांहीं ठिकाणीं खतानें जमीन जळते असा समज अस-ल्यामुळें शेतकरी त्याचा उपयोग मुळींच करीत नाहींत; आणि जेथें उपयोग करितात, तेथें त्यांस खत कसें ठेवावें हें माहित नसल्यांमुळें हजार पौंड खतापैकीं फक्त अकरा पौंड खत जेमतेम त्यांच्या उपयोगीं पडतें. बाकीचें उघड्या हवेंत राहिल्यामुळें निःसत्व होऊन जातें. शेतकऱ्यानें दर-साल कांहीं तरी झाडांची लागवड केली पाहिजे; ह्मणजे त्यांपासून शेतास राब आणि जळण्यास लांकडें तरी उत्पन्न होतील आणि मग शेणाचा उपयोग हल्लीं जो गोवऱ्या

वळण्यांत होतो तो न होतां तें खताच्या कामीं लागेल. गुरें व मेंढरें यांच्या मूत्राचा खताच्या कामीं अत्यंत उपयोग होतो. परंतु आमच्या इकडील शेतकरी तें अगदींच फुकट घालवितात. सोनखताचा उपयोग शेतकीच्या कामीं चांगला होतो हें शेतकऱ्यांस मान्य आहे; परंतु धर्माच्या वगैरे अडाणी समाजामुळें त्यांचें मन या गोष्टीकडे जितकें लागावें तितकें लागलेलें दिसत नाहीं. या सोनखताविषयीं रा. रा. गणेश व्यंकटेश जोशी यांनीं आपला स्वतःचा अनुभव औद्योगिक सभेपुढें निबंध रूपानें मांडला आहे. त्यांत ते लिहितात, "मी शंभर छकडे सोनखत पांच एकर जमिनीवर पसरून त्यांत व दुसऱ्या खत न घातलेल्या जमिनींत ज्वारीचा पेरा केला. तेव्हां खत घातलेल्या जमिनीस एकरास २०४८ पौंड व खत न घातलेलीस एकरी ९०० पौंड पीक आलें। शिवाय खत घातलेल्या जमिनींत कडबा व भूस वगैरेंचाही जास्त फायदा झाला.

मद्रास शेतकी कॉलेजचे प्रिन्सिपाल मेहरबान राबर्ट्सन वगैरे सारख्या शेतकीच्या कामांत नाणावलेल्या विद्वानांचा असा अभिप्राय आहे कीं, हाडांचें खत सर्व खतांत चांगलें. जोशी ह्मणतात कीं, तें "ज्वारीचे पिकास फार चांगलें उपयोगी पडतें." परंतु इंग्लंड, जर्मनी, बेलज्यम व फ्रान्स वगैरे देशांत तें येथून मोठ्या झपाट्यानें रवाना होत असतें. इ. स. १८९०।९१ पासून इ. स. १८९७।९८ अखेरच्या आठ वर्षांत १७५११० टन हाडें फक्त मुंबईहून परदेशीं रवाना झालीं. असले शेतकीच्या उपयोगी पडणारे पदार्थ परदेशीं नेण्याची कायद्यानें बंदी झाली पाहिजे.

एका शेतांत तेंच पीक सतत कांहीं वर्षें केल्यास जमीन निकस होऊन पीक कमी निघतें. रा. जोशी ह्मणतात, "मी सतत सात वर्षें एका शेतांत ज्वारी पेरली आणि सातव्या वर्षीं शेंकडा वीस या मानानें कमी पीक आलें" असें आहे ह्मणून पीक फेरपाळीनें केलें पाहिजे; आणि मध्येंच एखाद्या वर्षीं जमीन ओसाड टाकली पाहिजे. इ. स. १८७९ सालच्या फॅमिन कमिशनचे रिपोर्टांत सर जेम्स केअर्ड साहेब ह्मणतात "जमिनीस विश्रांति न देतां हिंदुस्थानां-तील शेतकरी पिकामागून पीक काढतात; यामुळें हिंदुस्था-नाची शेतकी ह्मणजे एक जमीन निकस करण्याची पद्धतीच झाली आहे." परंतु हा सर्व सरकारच्या धाऱ्याच्या पद्धतीचा परिणाम आहे. हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे.

इंग्लंडांत सरासरीनें दर एकरास १७०० पौंड गहूं उत्पन्न होतो आणि हिंदुस्थानांत तो अवघा सातशें पौंड उत्पन्न होतो. अमेरिकेंत दर एकरीं दोनशें पौंड कापूस येतो तर येथें फक्त साठ पासून सत्तर पौंड पर्यंत येतो. बव्हेरियांत तांदूळ एका एकरास पंचवीसशें पौंड तर येथें आठशें पौंड. अशा प्रकारें आमची जमीन सध्यां अगदीं निकस झाली आहे. परंतु हा निकसपणा स्वाभाविक नसून तो कारणांनीं आलेला आहे. सरकार द्रव्य दृष्टीस फांटा देऊन जनावरांस चारा आणि शेतकीस राब मिळण्याकरितां जंगलचे नियम जरा सवलतीचे करील, हाडें आदिकरून शेतकीस लागणारीं खतें बाहेर देशीं रवाना होतात तीं कायद्यानें अगदीं बंद करील, आणि ओसाड जमिनीवर पूर्वींच्या आमच्या राज्यपद्धतीप्रमाणें मुळींच कर

न घेईल ( ज० रानडे यांनीं रॉयल ए० सोसायटी पुढें ता० ३० जून १९०० रोजीं वाचलेला निबंध ) किंवा हल्लींच्या आमच्या कांहीं संस्थानिकांप्रमाणें लागवड जमिनीच्या फक्त $\frac{1}{6}$ इतकाच ओसाड जमीनीवर धारा घेईल तर यूरोपांतील जमिनीपेक्षां आमच्या इंडियांतील जमीनींत अधिक पीक निघेल, ही गोष्ट अकबराच्या वेळचें पिकाचें मान व रा० जोशी यांचा वर दिलेला अनुभव यावरून सहज समजण्यासारखी आहे.

यूरोपांतील कित्येक देशांत शेतकीचीं आऊतें चालविण्याच्या कामीं देखील तीन राक्षसांपैकीं बाष्पाची योजना करण्यांत आली आहे. परंतु आम्हीं आपल्या जागेवरून एक अंगुळभरही पुढें सरत नाहीं. आमची प्रगतीच्या ऐवजीं अधोगती झालेली मात्र प्रत्यहीं दृष्टीस पडते. हें ठीक नाहीं. जमिनीच्या मऊपणाप्रमाणें किंवा कठिणपणाप्रमाणें आह्मी आपल्या आउतांच्या रचनेंत फेरफार केला पाहिजे. हल्लींच्या कुदळीनें किंवा पाभरीनें केलेली पेरणी दाट होऊन तिच्या योगानें पिकास धोका पोंहचतो. प्रचलित नांगरांमुळें जमीन सारखी नांगरली जात नाहीं. यामुळें कित्येक वेळां सारखेपणा येण्याकरितां तीन तीन चार चार तासें करावीं लागतात, व त्याला बैलांचाही मोठा खर्च असतो. जमीनींतील पूर्वीच्या पिकाचे बुडखे किंवा नव्या पिकांत मधून मधून रुजलेलें गवत काढण्याकरितां कुळव नांवाचें एक आऊत असतें. सध्यां त्यांस दोन बैल लावतात; ते असलेल्या पिकाची अधिक नासाडी करितात व एका बैलाच्या फाजील खर्चाचा बोजा शेतकऱ्यांवर विना-

कारण बसतो. ओलावा जास्त दिवस टिकण्याकरितां जमीन दाबण्यासाठीं **फेसाटी** नांवाचें एक आऊत तयार करितात, परंतु त्यापासूनही इष्ट कार्य व्हावें तसें होत नाहीं. करितां या सर्व आऊतांत सुधारणा झाली पाहिजे. रा. जोशी यांनीं त्यांना ज्या इष्ट वाटल्या त्या सुधारणा आऊतांत केल्या आणि त्यामुळें त्यांचा पुष्कळ फायदा झाला, असें त्यांच्या निबंधावरून दिसतें.

**पांचवें कारण**—शेतकीच्या जनावरांची जोपासना कशी करावी, कोणत्या जमिनींत कोणतें खत किती प्रमाणानें घातलें असतां ती कोणत्या पिकांस पात्र होईल, थोड्या वेळांत आणि कमी खर्चांत जमिनीची मशागत करण्याकरितां सध्यांच्या आऊतांत काय फेरबदल केला पाहिजे वगैरे गोष्टी आमच्या शेतकऱ्यांस जर चांगल्या समजल्या, तर जमिनीच्या उत्पन्नांत बराच इष्ट बदल होऊन आमची दुष्काळसंबंधीं भीति थोडी तरी कमी होईल. परंतु तसें होण्यास शेतकऱ्यांस त्यांच्या धंद्याचें शिक्षण मिळालें पाहिजे. सध्यांच्या आमच्या शेतकऱ्यांस ' पिच्छेसे आई' या पंचाक्षरी मंत्रावांचून दुसरें कांहीं समजत नाहीं. वडिलांनीं जसें खत ठेविलें असेल तसें चिरंजीव ठेवणार, त्यांनीं जसा नांगर धरला असेल तसा हे धरणार, आणि त्यांनीं शेतांत जसें बीं पेरलें असेल तसें हे पेरणार, असा प्रकार सर्वत्र दृष्टीस पडतो!

तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी वगैरे खाण्याचीं धान्यें,

जवस, तीळ, भुईमूग, करडी वगैरे गळिताचीं धान्यें, कापूस, ताग,वगैरे धाग्याचे जिन्नस, चहा,कॉफी वगैरे पेयें करण्याचे पदार्थ, आणि तंबाखु, गांजा, अफू वगैरे अमली द्रव्यें, अशीं सर्व प्रकारचीं पिकें आपल्या देशाच्या निरनिराळ्या भागांत उत्पन्न होतात. यावरून आपली जमीन किती उत्तम आहे बरें? परंतु या जमिनींतून पाऊस हवा तसा लागला, तरी योग्य पीक निघत नाहीं, याचें कारण शेतकऱ्यांस शेतकीचें शिक्षण योग्य प्रकारें नसणें हेंच होय.

हें शिक्षण देण्याचा विचार सरकारचे मनांत येऊन आज तीस पस्तीस वर्षें झालीं. इ. स. १८६५ सालीं मद्रास इलाख्यापैकीं **सैदापेठ** येथें कृषिविद्येची पाठशाळा स्थापन करून सरकारांनीं या कामाचा पाया घातला.तेव्हां-पासून लहान लहान वर्ग, शाळा, पाठशाळा यांची आप-ल्या देशांत बरीच संख्या झाली आहे. परंतु यांत शिकणारे विद्यार्थी केवळ सरकारी नोकरीच्या कामीं उपयोगी पडतात. शेत कसणाऱ्या कुणब्यास यांपैकीं एकाही संस्थेचा लाभ अद्यापि मिळूं लागला नाहीं. बंगाल सरकारचे सेक्रेटरी नामदार नोलन म्हणतात कीं, " या देशांत शेतकऱ्यांना शिक्षण नाहीं. व त्यांचीं मुलें अज्ञानांत बुडून गेलीं आहेत. जे शिकतात ते इतके थोडे शिकतात कीं, त्यापासून शेत-कीला कांहींच उपयोग होत नाहीं म्हटलें, तरी चालेल."

शेतकऱ्यांस कृषिकर्मविद्येची माहिती करून द्यावयाची म्हणजे त्यांच्यांत आधीं प्राथमिक शिक्षणाचा प्रसार झाला

पाहिजे. त्यांना लिहिणें, वाचणें, हिशेब करणें हीं आमचीं शिक्षणाचीं मुख्य तीन अंगें चांगलीं अवगत झाल्यावांचून इष्टकार्य होणार नाहीं.

इ. स. १८९७ पासून १९०२ पर्यंतच्या पांच वर्षांचा हिंदुस्थानांतील शिक्षणखात्याचा रिपोर्ट पाहतां आह्मी शिक्षणांत फारच मागसलेले आहोंत, असें दिसून येईल. एकंदर लोकसंख्येंत शेंकडा पंधरा शाळेंत जाण्यालायक असून अवघे दोनही शाळेंत जात नाहींत. ही एकंदर समाजाचीं तुलना झाली. शेतकरी वर्गाशीं ही तुलना केली ह्मणजे प्रमाण फार कमी येईल, हें सांगावयास नको. प्रथम या शिक्षणाचा प्रसार करून नंतर वरिष्ट शिक्षण मिळविलेल्या लोकांकडून शेतकऱ्यांस त्यांच्या धंद्याचें प्रत्यक्ष शिक्षण देवविलें पाहिजे. या संबंधांत तिसऱ्या औद्योगिक सभेंपुढें जोशी यांनीं दुसरा एक निबंध वाचला असून त्यांत सरकारास पुष्कळ सूचना केल्या आहेत. परंतु आजपर्यंत तिकडे सरकारांनीं विशेष लक्ष्य दिल्याचें दिसत नाहीं.

**सहावें कारण**—आपल्या देशांतील जमीन अत्यंत सुपीक असून तींत हवें तें पीक होण्यासारखें आहे, असें असतां सर चार्लेस इलियट सेटलमेंट रिपोर्टांत म्हणतात त्याप्रमाणें येथें सात कोटींपेक्षां अधिक लोक अर्धपोटीं रहातात. याचें कारण जॉन ब्राईटच्या मतें आमच्या राज्य व्यवस्थेंतच कांहीं चुका असल्या पाहिजेत असें आहे. आतां या सहाव्या कारणाचा विचार करतांना आपणांस सरकारच्या मागें दाखविलेल्या

व पुढें दाखविण्यांत येणार आहेत त्या इतर चुकांकडे न पाहतां फक्त त्यांचे जमीनमहसुलासंबंधाचे नियम अन्यायाचे व जुलमाचे असून त्यांमुळें लाखों प्रजाजनांस दुष्काळास बळी पडण्याची वेळ येतेकीं काय, एवढेंच पहावयाचें आहे.

एक संस्कृत कवि ह्मणतो कीं, "दिव्याविषयीं नुसत्या गप्पा ठोकून कधीं अंधार नाहींसा होत नाहीं." अंधार नाहींसा करण्याला प्रत्यक्ष दिवाच लावला पाहिजे. सरकारी अधिकारी हिंदुस्थानांत एकादी नवी पद्धत सुरू करते वेळीं आम्हीं ती केवळ प्रजेच्या हितासाठीं करितों, असें जरी बोलतात, तरी ती घातक असल्यास नुसत्या हिताच्या गोष्टी बोलून घातापासून प्रजेचें रक्षण होत नाहीं.

पूर्वीं साळी, रंगारी, मणेर, कुंभार, लोहार वगैरे अनेक प्रकारचे कारागीर खेड्यापाड्यांनिहाय राहून आपापल्या धंद्यावर उपजीविका करीत. परंतु आमच्या कल्याणाकरितां ह्मणून अप्रतिबद्ध व्यापाराचें तत्त्व दयाळू सरकारांनीं जेव्हां आमच्या देशास लागूं केलें, तेव्हां यंत्रसाह्यानें परमुलखीं तयार झालेल्या जिनसा इकडे येऊन, या शेतकामाविषयीं अडाणी असलेल्या आमच्या कारागिरांस आपलीं हत्यारें फेंकून देऊन नांगर हांकावे लागले. याचा परिणाम असा झाला कीं, शेतकऱ्यांची संख्या शेंकडा ९६ पर्यंत वाढली. आणि खडकाळ माळांवरसुद्धां लागतील तितके चोथे लावण्याकडे त्यांची प्रवृत्ति झाली. व पिकास नालायक जमीनसुद्धां लायक होऊन लागवड जमिनीचें प्रमाण दुपटीवर गेलें.

अशा प्रकारें सर्वस्वी शेतकरी बनलेल्या देशांत जमीन महसुलाचे नियम जितके सवलतीचे असतील, तितकें चांगलें. तेथील प्रजेची सर्व संपदा कायती जमीन. तिच्यावरच नजर ठेवून सरकार जर आपली तुंबडी भरण्याचा प्रयत्न करील, तर लॉर्ड सॅलिस्बरी साहेबांचीं प्रजेचें रक्त शोषून घेण्याची राज्यपद्धतीच अमलांत आली ह्मणावयाची.

सरकारच्या एकंदर जमेकडे जर थोडी नजर फेंकली, तर असें आढळून येईल कीं, एकंदर ९५ कोटीजमेपैकीं पंचवीस कोटींपेक्षां अधिक रक्कम जमीन बाबीचें उत्पन्न आहे. रिव्हिजन सर्व्हेपूर्वीं तें फक्त २१ कोटींचें होतें.

ही वाढ होण्यापूर्वींच सर आक्लंड कॉल्व्हिन, सर थिओडर होप, मद्रास सरकारच्या कौंसिलचे सभासद मि. फुलर्टन वगैरे बड्या बड्या इंग्रज अधिकाऱ्यांनींदेखील "जमीनबाबीचें उत्पन्न जरा वाढलें आहे आणि यापुळेंच शेतकरी लोक अगदीं दरिद्री होत चालले आहेत." अशा आशयाचे रिपोर्ट सरकारांत वारंवार केले आहेत. आमच्या पूर्वींच्या राजांची पद्धत ह्मटली ह्मणजे उत्पन्नाचा सहावा हिस्सा जमिनीचा कर ह्मणून घ्यावयाचा अशी होती. बादशाही मंडळींत शिरशहा सूर यानें जमीनधारा अगदीं बेताचा ठेविला होता; परंतु या खात्याची खरी व्यवस्था अकबराच्या कारकिर्दींत राजा तोडरमल्लानें लाविली. त्यानें सर्व जमिनीची मोजदाद व पहाणी करून तिच्या तीन प्रती केल्या; व पिकाची एकोणीस वर्षांची सरासरी काढून उत्पन्नाचा $\frac{1}{3}$

सरकारांत घेण्याचें ठरविलें; आणि जमीन महसूलवांचून बाकीचे सर्व कर मोडून टाकिले, हीच धाऱ्याची पद्धत पुढें मलिकंबरानें महाराष्ट्रांत चालू केली. रोकड आकार घेणें झालें, तर त्या वेळच्या बाजारभावाप्रमाणें घेत असत. मराठी राज्यांत जमीनमहसुलाच्या कमाल आकारांचें प्रमाण बहुतेक असेंच असे. परंतु या कमाल आकाराप्रमाणें नेहमींच वसूल करण्यांत येत नसे. वसूल करण्याच्या जमाबंदीस तनखा म्हणत व तो कायम करते वेळीं प्रजेच्या तक्रारींचा योग्य विचार होई. ओसाड जमिनीवर हल्लींप्रमाणें कराची आकारणी होत नसे. व दुष्काळांत लोकांस पुष्कळ सूट देण्यांत येई.

बंगाल्यांत लॉर्ड कॉर्नवालिस यानें कायम धाऱ्याची पद्धत सुरू केल्यास शंभरावर वर्षें होऊन गेलीं, तथापि त्याच्या त्या पुण्य कृत्याबद्दल सर्व देशांतील लोक अजून त्याचें नांव काढीत आहेत. व तीच पद्धत आमचे इकडे सुरू करा, ह्मणून आमची राष्ट्रीय सभा दरवर्षीं सरकारास आग्रहाची विनवणी करीत आहे. बंगाल्यानंतर लौकरच वायव्येकडील प्रांतांपैकीं बनारस जिल्ह्यांत व मद्रास इलाख्याच्या कांहीं भागांत ही पद्धत सुरू करण्यांत आली.

कायम धाऱ्याच्या पद्धतीपासून जे फायदे आहेत, त्यांचा विचार करण्यापूर्वीं बंगाल्यांत कायम व आमच्या इकडे सध्यांपुरत्या झालेल्या जमीनसाऱ्याच्या आकारणींत काय अंतर आहे तें पाहूं.

बंगाल इलाख्यांतील कुळांनां आपल्या जमीनदारांस आमच्या प्राचीन पद्धतीप्रमाणें जमिनींतील पिकाचा $\frac{१}{६}$ भाग किंबहुना कांहीं कांहीं प्रांतांत तर त्याहूनही कमी भाग द्यावा लागतो. व ही साऱ्याची पद्धती कायमची असल्यामुळें आतां तिकडील कुळांवर अधिक बोजा बसण्याचा संभव नाहीं. सर वुइल्यम हंटर यांनीं "स्टॅटेस्टिकल अकौंट ऑफ बेंगाल" नांवाच्या पुस्तकाचे वीस भाग लिहिले आहेत. त्यांत बंगालच्या निरनिराळ्या भागांतील दर एकरी पिकाची किंमत व त्यावरील देणें यांचे आंकडे दिले आहेत. त्यांवरून बहुतेक ठिकाणीं हें मान $\frac{१}{६}$ पेक्षां कमी असून नौखंडी परगण्याचें $\frac{१}{७}$ पेक्षांही कमी, गयेचें $\frac{१}{८}$, आणि मिदनापूर व जसोर परगण्याचें तर $\frac{१}{८}$ पेक्षांही कमी आहे. अशा रीतीनें बंगालच्या शेतकऱ्यांस कमी आकार भरावा लागल्यामुळें तेथील शेतकऱ्यांची स्थिति समाधानकारक आहे. त्यांना चांगलीं पिकें आलीं म्हणजे शिल्लक टाकतां येते व तिचा उपयोग त्यांस दुष्काळाच्या सालांत होतो. या मुळेंच इ. स. १८७४ सालाच्या व त्यानंतर १८९७ च्या दुष्काळांत बंगाल्यांत अन्नावांचून एकही मनुष्य मेला नाहीं. तीच मद्रास आणि मध्यप्रांताची स्थिति पहा! मद्रास इलाख्यांत १८७७ च्या दुष्काळांत मागें एके ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें पन्नास लाख लोक मेले. आणि मध्यप्रांतांत १८९७ सालीं याहीपेक्षां अधिक लोकांनीं अन्न अन्न करून प्राण सोडले. सन १८९९ सालीं तर सर्वत्रच

भयंकर हाहाःकार उडाला होता. व सालमजकुरींही तसाच संभव दिसत आहे.

ओरिसा प्रांतांत ही साऱ्याची पद्धत नाहीं; म्हणून तेथें पिकानें गोता दिला कीं, आमच्या इकडच्या प्रमाणेंच लोकांचा चुराडा उडतो. इ. स. १८६५।६६ सालच्या दुष्काळांत या प्रांतांत लाखो लोक दुष्काळाला बळी पडले.

वायव्येकडील प्रांताची स्थिति याच्या खालोखाल आहे. तेथें शेतकऱ्यांस जमिनीच्या उत्पन्नाचा $\frac{1}{2}$ जमीनदारांना द्यावा लागतो. परंतु तेथें दर तीस वर्षांनीं हें मान वाढत चाललें आहे. त्यामुळें कांहीं दिवसांनीं तिकडील शेतकरीही दुष्काळाला टक्कर देण्यास असमर्थ बनण्याची भीति वाटते. सन १८९९ च्या दुष्काळाचें तेथें अगदीं सौम्य स्वरूप पसरण्याचें कारण तरी हेंच आहे.

सर थॉमस मनरो यांनीं मद्रास इलाख्यांत रयतवारी पद्धत सुरू केल्यामुळें तेथें सरकारचा व शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष संबंध येतो. इ. स. १८५७ सालीं मद्रासच्या रेव्हेन्यु बोर्डानें आपल्या रिपोर्टांत लिहिलें आहे कीं, "यापुढें जमिनीचा सारा वाढविला नाहीं तरच मद्रासच्या शेतकऱ्यांस जमिनी राखतां येतील." परंतु या रिपोर्टास न जुमानतां तेथें दर एक नव्या सर्व्हेच्या वेळीं धारा झपाट्यानें वाढूं लागला आणि त्यामुळें इ. स. १८७७ सालीं उडालेली भयंकर कत्तल पाहून, इ. स. १८८२ सालीं आमच्या लोकप्रिय गव्हर्नर जनरल साहेबांनीं ( लार्ड रिपन ) मद्रास

इलाख्याची सर्व्हे पुनः होऊं नये, आणि योग्य कारण असल्यावांचून कोणत्याही ठिकाणचा सध्यां असलेला सारा वाढवूं नये, अशी सूचना लंडनच्या इंडिया ऑफिसला केली. परंतु अवश्यकता नसतां हिंदुस्थानांतील फौजदारी कायद्याची दुरुस्ती आणि कलकत्ता म्युनिसिपल बिल पास करणाऱ्या स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं ती जागच्याजागीं हाणून पाडली. सध्यां तेथले शेतकरी उत्पन्नाच्या शेंकड्यावर चाळीस टक्के सरकारास देऊन आपण उपासमार काढीत आहेत. मद्रास रेव्हिन्युबोर्डानें ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांकडून माहिती मागवून नुकत्याच केलेल्या दुसऱ्या एका रिपोर्टांत म्हटलें आहे कीं "चांगल्या पिकाच्या वर्षीसुद्धां मद्रास इलाख्याच्या दोन कोटी ऐशीं लक्ष लोकसंख्येपैकीं पन्नास लक्ष लोकांजवळ अन्न नसतें" ही सुकाळाची स्थिति, मग दुष्काळांत बिचाऱ्यांची काय अवस्था होत असेल!

पंजाबांत वायव्येकडील प्रांताप्रमाणेंच मुदतीनें सारे ठरविण्याची पद्धत चालू आहे. आणि त्यामुळें दिवसेंदिवस शेतकऱ्यांची दैना होत आहे. त्यांची सुधारणा करावी ह्मणून "पंजाब ॲलिनिएशन बिलाची" वाटाघाट चालून तें त्यास लागू केलें आहे. हें बिल म्हणजे बहुतेक आपल्या मुंबई इलाख्यापैकीं पुणें, सातारा, नगर आणि सोलापूर या चार जिल्ह्यांस जो शेतकी ॲक्ट चालू केला आहे, त्याच पद्धतीवर आहे; परंतु जमीनबाबीच्या उत्पन्नाची वाढ सारखी चालू असतां असल्या बिलांचा कांहीं

एक उपयोग होणार नाहीं, असें सर रोमेशचंद्र दत्तांचें मत आहे.

मुंबई इलाख्याचीं जमीनमहसुलपद्धति अशीच दोषपूर्ण आहे. इ. स. १८६५।६६ सालीं जी सर्व्हे झाली, ती मध्येंच लोकांवर फार कडक सारे बसल्याबद्दलचे सर्व्हे कमिशनरांचें व कांहीं जिल्ह्यांच्या त्या वेळच्या कलेक्टरांचें मत असतां, इ. स. १८९४।९५ च्या नवीन सर्व्हेंत कित्येक ठिकाणीं धाऱ्याची वाढ शेंकडा ७५ या प्रमाणांत झाली आहे. असो, आतां इ. स. १८९७ च्या व इ. स. १८९९ च्या दुष्काळाचा चिमटा जेथें जास्त जोरानें बसला आहे, त्या मध्यप्रांताकडे वळूं.

हिंदु प्रजाजनांची अत्यंत कळकळ बाळगणाऱ्या लॉर्ड-डलहौसी साहेबांनीं हिंदु अमलांत प्रजेला फार त्रास होतो ह्मणून आपल्या कारकिर्दींत जे प्रदेश ब्रिटिश राज्यव्यवस्थेखालीं आणले, त्यांपैकींच नागपूरच्या भोसल्यांचें राज्य होय. हें इ. स. १८५३ सालीं आमच्या सुखदुःखाचे वांटेकरी झालें. पहिली सुधारणा म्हणून लॉर्ड कॅनिंग साहेबांनीं येथें आपली रेव्हिन्युपद्धत सुरू केली. आणि इ. स. १८६२ सालीं भोसल्यांच्या प्रजेच्या दैवदुर्विलासाच्या नाटकाचा ड्रापसीन उघडला, व लॉर्ड साहेबांनीं जरी निव्वळ उत्पन्नाच्या निम्मेपेक्षां अधिक सारा घेऊं नये,असा निर्बंध ठरविला होता, तरी तो बाजूला ठेवून सर्व्हे खात्यानीं निव्वळ उत्पन्नाच्या जवळ जवळ पाऊणपट आकारणी केली !

पुढें तीस वर्षांनंतर तरी आपलें हें नाटक आनंदपर्यवसायी होईल, असें विचाऱ्यांस वाटत होतें; तों मध्यप्रांतांतील रायपूर आणि विलासपूर परगण्यांत त्याचा दुसरा अंक सुरू झाला. आणि सदर नाटकाचे एक एक दुःखपर्यवसायी देखावे नजरेपुढें येऊं लागले. रायपुरांत पहिल्या साऱ्यावर शेंकडा ७४ वाढ झाली. आणि विलासपुरांत, मोठ्या खेदाची गोष्ट कीं, ती वाढ शेंकडा नव्वद झाली. आणि लोकांनीं सभा केल्या, अर्ज केले, कमिशनर साहेबांपुढें येऊन आपलीं गाऱ्हाणीं गाईलीं, सर्व कांहीं केलें, परंतु व्यर्थ! आमच्या स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं दिलेल्या माहितीवरून असें कळतें कीं, इ. स. १८८३।८४ सालीं या प्रांताचा जमीनधारा ६२ लक्ष होता तो इ. स. १८९६ सालीं ७६$\frac{3}{2}$ लक्ष झाला; व ही वाढ लौकरच शेंकडा ५० होईल असा अदमास आहे.

सन १८९९ च्या दुष्काळानें अत्यंत पिडलेला दुसरा प्रांत गुजराथ. धाऱ्याच्या संबंधानें तेथील स्थितिही अशीच भयंकर आहे. एकवेळ असलेल्या मुंबई प्रांतिक सभेचे अध्यक्ष नामदार पारख यांनीं आपल्या भाषणांत या प्रांतांत धाऱ्याच्या वाढीमुळें झालेल्या अनर्थांचें वर्णन फारच हृदयद्रावक रीतीनें केलें आहे. अमदाबाद, केरा व भडोच ह्या तीन जिल्ह्यांमध्यें अनुक्रमें रु. २ आ. ११ पै १, रु. ५ आ. ० पै. ७, रु. ५ आ. १ पै ६ दर एकरास धारा आहे; आणि माणशीं या धाऱ्याचें प्रमाण अनुक्रमें रु. ३ आ. ७ पै ८,

रु. ३ आ. १२ पै ६, आणि रु. ८ आ. १ पै २ असें आहे, म्हणून सांगितलें. हें प्रमाण खरोखरच अत्यंत जबर आहे, असें कोणाही विचारी मनुष्यास वाटल्यावांचून राहणार नाहीं. इ. स. १८७५ पासून १८९५ पर्यंत वीस वर्षांची स्थिति पाहिली, तर बंगाल्यांत जमीनदारांनीं शेंकडा सला टक्के कुळावर जास्त आकारणी केली आहे, या आकारणीचें मान दर सात वर्षांस शेकडा सहा पडतें. तेंच पंजाबांत १२, मध्यप्रांतांत १५ आणि वायव्येकडील प्रांतांत ४८ याप्रमाणें पडतें.

बाबू वैकुंठनाथ सेन यांनीं थोड्या दिवसांमागें प्रसिद्ध केलेल्या आंकड्यांवरून असें दिसतें कीं, बंगाल्यांतील शंभर लोकांस ५५ रुपये धारा आहे, पंजाबांत १०९ वायव्येकडील प्रांतांत १२९, मद्रासेंत १३४ आणि मुंबई इलाख्यांत शंभर लोकांस २३४ रुपये जमीनधारा दरसाल भरावा लागतो.

असो. याप्रमाणें ज्या ठिकाणीं कायम धाऱ्याची पद्धत नाहीं, त्या ठिकाणीं सारे वाढण्याची दिवसेंदिवस अगदीं कमाल होऊन गेली आहे. बहुतेक प्रांतांतून निव्वळ उत्पन्नाचा निम्मे धारा घेण्याचा ठराव आहे. परंतु चूक एकंदर उत्पन्नांतून खर्च वजा करितांनाच होते. हा खर्च दर एकरास सरासरीनें सहा धरतात. याचें कारण कर आकारणारांस जमिनीची लागवड करण्यास येणाऱ्या खर्चाचा अंदाज नसतो, आणि लोकांच्या अडचणी पाहण्यापेक्षां सरकारचें

उत्पन्न वाढविण्याकडेसच त्यांचें विशेष लक्ष्य असतें, हें होय-या लोकांनीं रेव्हिन्यू खात्याचे जनक सर वुइंगेट साहेब यांचा बोध लक्ष्यांत ठेवल्यास पुष्कळ फायदा होईल. हे साहेब ह्मणतात: "चुकून सारा जरी अतिशय कमी बसला तरी देशाचें नुकसान होत नाहीं; परंतु दुसरे दिशेस जर चूक झाली व सारा जरब बसला, तर मात्र देशाची धूळधाण होते." एकदां लॉर्ड कार्नवालिस साहेब एका सर्व्हे कामगारास म्हणाले: "हें पहा, धान्याची आकारणी कमी कर, नाहीं तर मी तुझा शत्रू होईन." ही गोष्ट जमीन बाब वाढविणारांनीं चांगली लक्ष्यांत वागवावी.

सर बार्टल फ्रियर यांनीं मुंबईइलाख्यांतील धान्यासंबधानें जमीनीचे वर्ग (१) मनास वाटेल तो धारा बसविलेली जमीन, (२) ज्या जमीनीचा धारा दिल्यावर शेतकऱ्यास फक्त त्याच्या भांडवलाचें व्याज आणि मजुरीच राहते अशी जमीन, व(३)ज्या जमीनींत जेमतेम धान्यापुरतें उत्पन्न निघतें अशी जमीन, असे तीन वर्ग केले. सर लुइ मॅलेटनें आणखी ज्या जमिनींत कसेंतरी खर्चापुरतें उत्पन्न निघतें, असा चौथा वर्ग केला व त्यास सर वुइल्यम वेडरबर्न साहेबांनीं "ज्या जमीनीच्या पिकानें लागवडीचा खर्च भागत नाहीं; आणि म्हणून तिचा धारा दुसरीकडे मिळविलेल्या मजुरीवर किंवा सावकाराकडून काढलेल्या कर्जावर भागविला जातो, अशी जमीन" हा पांचवा वर्ग जोडून हें वर्गीकरणाचें काम पुरें केलें. अशा प्रकारें धारा भरल्या-

वर जेथले शेतकरी अगदींच भुके बंगाल बनतात, तेथें दुष्काळांची वाण कोठून असणार ?

असो. साऱ्याच्या या विलक्षण वाढीचा परिणाम असा झाला आहे कीं, बंगाल्याशिवाय बाकीच्या सर्व प्रांतांतील अन्नास मोताद झालेले शेतकरी, ओसाड जमीनीवरही भर आकार द्यावा लागल्यामुळें दरसाल जमीनींत ज्याची बाजारांत जास्त किंमत येईल असें पीक करूं लागले; आणि ह्मणून त्यांची जमीन निःसत्व बनत चालली. धारा भरण्याचें सामर्थ्य नाहीं, ह्मणून कित्येकांच्या जमिनींचा लिलांव झाला आणि धारा फाजील म्हणून कित्येकांनीं आपण होऊनच जमिनी सरकारच्या स्वाधीन केल्या.

इ. स. १८७२ च्या औंध रेव्हेन्युरिपोर्टांत ह्मटलें आहे कीं, " लहानसहान खेड्यांपैकीं असें एकही खेडें नाहीं कीं, जेथल्या जमीनदारांला कर्ज नाहीं. आणि अशी एकही जमीन नाहीं कीं, जिच्यावर सावकाराचा बोजा नाहीं; आणि मी असें खात्रीपूर्वक सांगतों कीं, या लोकांपैकीं प्रत्येकाचें कर्ज—निदान त्याचा कांहीं अंश तरी—धारा लावण्याकरितां काढलेलें आहे. "

इ. स. १८७९ सालीं दक्षिणेंतील शेतकऱ्यांस ऋणमुक्त करण्याचा कायदा पास झाला. पुढें त्याचा परिणाम कसा काय झाला आहे, याची चौकशी करण्याकरितां इ. स. १८९२ सालीं एक कमिशन नेमलें. त्यानें असा रिपोर्ट केला कीं, " जरी या कायद्यानें शेतकऱ्यांची स्थिति सुधारेल

अशी आशा वाटते, तरी पुष्कळ जमिनी शेतकऱ्यांकडून निघून सावकारांच्या घरांत चालल्या आहेत." स्टेट सेक्रेटरी साहेब म्हणतातः "फक्त मद्रास इलाख्यांत १८८७ पासून १८९४ पर्यंतच्या सात वर्षांत सरकार देण्याबद्दल ५६,६४८ लोकांची जमीन विकली; आणि ५५,७७२ लोकांची जंगम मिळकत विकली. यापुढील दोन वर्षांत वरील कारणांकरितांच १४४११ लोकांची जमिन आणि ६७१७ लोकांचा जंगम माल विकण्यांत आला. हाच प्रकार मध्य प्रांत, वायव्येकडील प्रांत वगैरे बंगाल्यावांचून सर्व ठिकाणीं दिसण्यांत येतो. गुजराथेसंबंधानें ना० पारख यांनीं आपल्या सातारा येथील भाषणांत दिलेले आंकडे याच मासल्याचे आहेत. इ. स. १८९६।९७ पासूनच्या तीन वर्षांत तीन जिल्ह्यांत ६३,६०१ एकर जमीन लोकांनीं धारा सोसेना ह्मणून सरकारच्या स्वाधीन केली.

कांहीं जिराइत जमिनी बागाइत व कांहीं वरकस जमिनी खरीपी होण्यासारख्या आहेत व कांहीं शेतकी खात्याचे सेक्रेटरी ह्यूमसाहेब ह्मणतात त्याप्रमाणें खत वगैरे घातल्यास पुष्कळ अधिक पीक येण्यासारख्या आहेत. परंतु सरकार धारा वाढवील आणि मग तो आपल्याच्यानें देववणार नाहीं या भीतीनें कोणी तसें करीत नाहीं. बंगाल्यांतील प्रकार याच्या अगदीं उलट आहे. हलीं तेथें पीक होण्यासारख्या जमिनीचा $\frac{1}{3}$ भागही शेतें पाडल्यावांचून राहिलेला नाहीं.

या सर्व विवेचनावरून सरकारचे जमीन महसुलाचे नियम किती अन्यायाचे व जुलमाचे आहेत, आणि त्यामुळें प्रत्येक सर्व्हे ह्मणजे चरकाचा एक फेरा होऊन त्या फेऱ्यांत रयत कशी पिळून निघत आहे, हें वाचकांच्या लक्ष्यांत येईलच. आतां अशा पिळून निघालेल्या रयतेचें सर्वस्व ह्मणजे जें जमिनींतील पीक, त्याला दगा पोंहचला ह्मणजे ती भया भया करते, अन्नासाठीं दशदिशा फिरते आणि शेवटीं ' किती अंतपाहशी देवा ' असें ह्मणून आकाशाकडे नजर देऊन प्राण सोडते. हा या फाजील साऱ्याच्या पद्धतीचा भयंकर परिणाम आहे. शेंकडा ऐंशीं लोकांचें उत्पन्न काय तें जमिनींतील पीक होय. त्याला जर धक्का पोंहोचला, आणि जें थोडें बहुत पदरांत पडावयाचें तें घरांतील माल मिळकतीसह सरकार साऱ्याकरितां सरकारच्या भरीला घातलें, तर मग या लोकांनीं काय करावें ! त्यांनीं दुष्काळाला आपले प्राण बळी द्यावे, नाहीं तर काय करावें ?

असो. याप्रमाणें आमच्या हिंदुस्थानांत दुष्काळ पडण्याला ही फाजील धाऱ्याची पद्धत कशी कारण होते, हें आह्मीं दाखविलें. पंधराव्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष सर रोमेशचंद्र दत्त यांनीं आपल्या पहिल्या दिवशींच्या भाषणांत हीच गोष्ट सांगितली आहे.

या कारणाच्या निवारणाचे सर्व उपाय राज्यकर्त्यांनीं करावयाचे आहेत. इ. स. १८८५ सालांपासून आज पावेतों प्रत्येक राष्ट्रीय सभेच्या द्वारें सरकारास आपलें गाऱ्हाणें

सांगून आणि सर्व हिंदुस्थानभर बंगाल्याप्रमाणें कायमः धाऱ्याची पद्धति सुरू करा, असें त्यांस विनवून प्रजा आपलें या संबंधाचें कर्तव्य करीतच आहे.

ऐन जिनसी सारा घेण्याची पद्धत मोडल्यामुळें प्रजेचें फार नुकसान झालें आहे. पूर्वीचा पिकाचा अमका हिस्सा सरकारांत द्यावयाचा असा ठराव असल्यामुळें ज्या वर्षीं पीक चांगलें येई, त्या वर्षीं सरकारास पुष्कळ गल्ला मिळे, आणि जेव्हां पीक वाईट येई, तेव्हां प्रजेला कमी सारा भरावा लागे, तो प्रकार मोडला आणि आपत्तीच्या वर्षींदेखील प्रजेवर जबर सरकार बोजा. बसला ही पद्धत अमलांत येणें शक्य नसेल, तर या संबंधांत सरकारचें कर्तव्य ह्मणजे, ना. पारख म्हणतात त्याप्रमाणें एक कमिशन नेमून, फाजील झालेला सारा कमी करून, त्याचें मान एकंदर उत्पन्नाच्या $\frac{1}{6}$ वर आणून बसवावें. आणि मग हे दर सर्व हिंदुस्थानाकरितां कायमचे करावे. एकवार तीस वर्षांची मुदत दिली असतां त्याच्या पूर्वींच पाहणी करून सारे वाढविणें ह्मणजे अगदीं अन्याय आहे! जमीन ओसाड राहील तर आपली खाली करून घेऊन तेवढा आकार कमी घ्यावा, हें न्यायाचें आहे. उत्पन्नाचा $\frac{1}{6}$ धारा घ्यावयाचें ठरवून कायम धाऱ्याची पद्धत सुरू केल्यानें, ओसाड जमिनीवर आकार न घेतल्यानें, काळीच्या वसुलांत थोडी तूट येईल खरी, तथापि "प्रजेचें हित तेंच आपलें हित' असें मानणाऱ्या सरकारांनीं त्याबद्दल खेद करण्याचें कांहीं कारण नाहीं. प्रजा सुखी

झाल्यास पार्लमेंटचे पहिले हिंदु ( हिंदुस्थानांत राहणारे ) सभासद ना. दादाभाई ह्मणतात त्याप्रमाणें इंग्लंडचा सर्व जगाशीं होणारा व्यापार एकट्या हिंदुस्थानाशीं होऊं लागेल, आणि सरकारच्या इतर करांपासून होणाऱ्या उत्पन्नांत पुष्कळ भर पडेल.

**सातवें कारण**—ज्या देशांत, देशाच्या कांहीं भागांत उत्पन्न झालेलें, अथवा देशांत उत्पन्न झालें नसेल तर परदेशांतलें, धान्य विकत घेण्यास लोकांजवळ पैसा असतो परंतु तें आणण्याचीं साधनें नसतात, त्या देशांत दुष्काळ पडतो, असें आह्मीं सातव्या कारणांत सांगितलें आहे. परंतु आमच्या देशाची स्थिति याच्या अगदीं उलट आहे. येथें देशांतल्या निरनिराळ्या प्रांतांशीं व बाहेरच्या देशांशीं दळणवळण ठेवण्याचीं अनेक साधनें प्रचलित असून, त्यांची वाढ मोठ्या झपाट्यानें होत आहे. इ. स. १८५३ सालीं दलहौसी साहेबांच्या कारकिर्दींत आगगाडीचा रस्ता प्रथम मुंबईपासून ठाण्यापर्यंत तयार झाला. आणि आज अर्धशतकांत तो तेवीस हजार मैलांवर पसरला आहे. व्यापाराचें दुसरें साधन ज्या आगबोटी त्या चालविणाऱ्या कंपन्यांची संख्याही वाढत असून, पूर्वीचा एका वर्षाचा प्रवास आतां एका महिन्यावर आला आहे. लंडनचें टपाल सध्यां आह्मांला दोन आठवड्यांत मिळतें. व्यापाराचें तिसरें साधन तारायंत्र, याचें हिंदुस्थानांतील उत्पादकत्वही दलहौसी साहेबांकडेच आहे. गेल्या पन्नास वर्षांत अजमासें दीड लक्ष मै-

लावर तार पसरली असून मुंबई आणि कलकत्ता येथील व्यापारी एका चौदाशें मैल लांबीच्या विस्तीर्ण दिवाणखान्यांत बसून एकमेकांशीं बोलूं लागले आहेत. मुंबईला तांदूळ कमी असले तर ते रंगूनहून सातव्या आठव्या दिवशीं येऊन पोंहचतात. अमेरिकेंतून ते येण्यास फार तर एक महिना लागतो. गेल्या दुष्काळांत अमेरिका आणि रशिया देशांतून अशा प्रकारानें धान्य आल्याचें वाचकांस आठवतच असेल. अमेरिकन मिशनरी लोकांच्या खटपटीनें दुष्काळग्रस्तांस मदत ह्मणून एक धान्याची बोट सन १८९९ सालीहीं आली होती. रंगूनच्या गोणांनीं त्या वेळीं आमचें केवढें कार्य केलें हें कोणालाही सांगितलें पाहिजे असें नाहीं.

सारांश, आमच्या देशांत दळणवळणाच्या साधनाची पंचाईत नाहीं. खंडो गणती माल आठचार दिवसांच्या अवधींत देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकाकडे नेतां येतो. इ. स. १८९८ च्या फ्यामिन कमिशनच्या रिपोर्टांत दुष्काळाच्या कामाला जरूर तितका आगगाडीचा रस्ता तयार आहे, असें स्पष्ट ह्मटलें आहे. इ. स. १८७७ सालच्या दुष्काळापासून आजपर्यंत दहा हजार मैल आगगाडीचा रस्ता जास्त झाला. परंतु सन १८९९ च्या दुष्काळाचें स्वरूप आणि विस्तार सदर दुष्काळापेक्षां किंचितूही लहान नसून उलट अत्यंत अवाढव्यच आहे. ह्या एका गोष्टी वरूनच पाहतां असें ठरतें कीं, जरी पीक आलेल्या प्रदेशांतून दुष्काळ पीडित भागांत धान्य नेलें, तरी लोकांमध्यें तें ख-

रेदी करण्याचें सामर्थ्य नसल्यानें दुष्काळाची पीडा होणारच. आमचा दुष्काळ सध्यां या स्वरूपाचा आहे.

एकंदर प्रजा सुखी झाल्यानें दुष्काळ टळतीलच; परंतु सध्यांच्या कारणांपुरतांच विचार करितां, सरकारांस एक सूचना करावीशी वाटते. देशांतील ज्या भागांत धान्य उत्पन्न होतें त्या भागावर, धान्याच्या खरेदीकरितां दुष्काळ पीडित प्रदेशांतील सर्व व्यापारी लोकांच्या उड्या पडतात. यामुळें त्यांची मूळ खरेदी महागाईची होते आणि त्या किंमतीवर भाडेंखर्च व व्यापाऱ्यांचा नफा वगैरे बसून तें धान्य दुष्काळग्रस्त जाग्यावर अत्यंत महाग दरानें विकलें जातें. आधींच जवळ पैसा नसतो, आणि त्यांत अशी महागाई. त्यामुळें गरीब बिचारे लोक अर्धपोटीं राहतात, किंवा उपासानें मरतात. याकरितां अशा भयंकर सालांत व्यापारी लोकांस आगगाड्या, आगबोटी वगैरे दळणवळणाच्या साधनांचा उपयोग धान्य नेण्याआणण्याकरितां फुकट करूं द्यावा. ह्मणजे तितकें स्वस्त धान्य विकण्यास त्यांना सवड होईल. सध्यां एकामागून एक रेलवे कंपन्यांची मालकी सरकारांकडे येत आहे, तेव्हां हें करणें त्यांस फारसें जड जाणार नाहीं.

या संबधांत आमच्यापैकीं पैसेवाल्या लोकांसही एक सूचना करण्यासारखी दिसते. ती अशी कीं, त्यांनीं वर्गणी करून प्रत्येक दुष्काळपीडित शहरांत एक तरी स्वस्त दरानें धान्य विकण्याचें दुकान काढावें; आणि तेथें फक्त

गरीबांसच माल द्यावा. असें केल्यानें या आगगाड्यादी व्या-पारसाधनांचा दुष्काळपीडितांस इच्छित उपयोग होईल.

**आठवें कारण**--सर जेम्स केअर्ड यांनीं ता. ३१ आक्टोबर स. १८७९ रोजीं स्टेट सेक्रेटरी साहेबांकडे जो आपल्या कामाचा सरकारी रिपोर्ट पाठविला, त्यांत ते ह्मणतात:

" सामान्य वर्षांतलें जरी उत्पन्न घेतलें तरी तें हिंदु-स्थानांतील सांप्रतच्या लोकसंख्येस पुरण्यासारखें नाहीं. मग शिलकेची गोष्ट कशाला? यामुळेंच अलीकडे महागाई होतांच दुष्काळ पडूं लागले आहेत. "

हा लेख त्यांनीं वीस वर्षांपूर्वीं लिहिला होता. या वीस वर्षांत आमच्या लोकसंख्येंत पांच कोटींची भर पडली आहे. अलीकडचे आंकडे घेऊन इ. स. १८९६ सालीं चॅम्पियनकारांनीं हिंदुस्थानची लोकसंख्या आणि जमिनीचें उत्पन्न याची तुलना केली आहे. ते ह्मणतात:—" ब्रिटिश हिंदुस्थानची लोकसंख्या २२ कोटी आहे. आतां दर माण-शीं सरासरीनें दररोज दीड पौंड धान्य लागतें, असें मान-ल्यास इतक्या लोकांस ५.८० कोटी टन धान्य पाहिजे. आतां दर एकरास सरासरी उत्पन्न ६९४ पौंड होतें. या हिशेबानें पाहतां धान्याच्या लागवडीस असलेल्या १८.६० कोटी एकर जमिनींत ५.७६ कोटी टन धान्य होईल, ह्मणजे आपल्या देशांत चांगला पाऊस असला तरी दरसाल चार लक्ष टन धान्य खपापेक्षां कमी उत्पन्न होईल. असें असून आपण वीस लक्ष टन परदेशीं रवाना करितों. ह्मणजे आह्मांस

अवश्य लागणाऱ्या धान्यांतसुद्धां सुबत्तेच्या वर्षी २९ लक्ष टनाची तूट असते. अर्थात् आमच्या एक कोट लों-कांस पाऊसपाणी पडून चांगलें पीक आलें तरी देशांत मुळींच धान्य राहत नाहीं. ही फार शोचनीय स्थिति आहे!

पाऊस पाणी बरें लागलें, तरी एक कोटी लोकांस धान्याचा तोटा येतो. मग सन १८९९ सारख्या आपत्तीच्या सालांत काय अवस्था होत असेल? अशा सालांत धान्य बाहेर जा-ऊन शिवाय कित्येक जमीनी अगदीं ओसाड राहतात, आणि लागवड जमीनींत पीक नेहमीपेक्षां फार कमी येते. गव्हाच्या पिकासंबंधानें फक्त मुंबई इलाख्याचीच स्थिति पाहिली, तर सन १८९९ चा सरकारी अंदाज १२९०० टन गहूं येतील असा होता. ही संख्या सव १८९८ सालच्या $\frac{१}{१०}$ आणि मुंबई इलाख्याच्या उत्पन्नाच्या सरासरीच्या $\frac{१}{८}$ आहे. फक्त अलि-बाग तालुक्यांत इ. स. १८९६।९७ च्या काळांत $\frac{१}{१०}$ खारें भात पिकणारी जमीन ओसाड राहिल्याचें प्रसिद्ध झालें होतें. असाच प्रकार दुष्काळग्रस्त प्रांतांत असावयाचा.

यावर अशी शंका निघेल कीं, लागवड जमीनीची वाढ जर झपाट्यानें होत आहे, तर तीस लाख टन उत्पन्न तें काय? तें तेव्हांच भरून निघेल. एकादे समयीं जमीन ओसाड राहिली म्हणून काय झालें? शंका बरोबर आहे. परंतु लाग-वड जमीनींत दोन भेद आहेत. एक धान्य उत्पन्न होणारी जमीन आणि दुसरी कापूस, ताग, नीळ, अफू, तंबाखू, चहा, कॉफी वगैरे धान्येतर जिन्नस उत्पन्न होणारी जमीन. प-

हिल्या प्रकारच्या जमीनीची वाढ शेंकडा बाराप्रमाणें होत असून दुसरीची वाढ शेंकडा ८१ पेक्षां अधिक होत आहे. यावरून शेतकऱ्याचें लक्ष्य धान्यापेक्षां धान्येतर जिन्नस उत्पन्न करण्याकडे विशेष लागलें आहे असें दिसतें. याचें कारण परदेशचे व्यापारी अशा मालास चांगली किंमत देतात हेंच होय. असो. आमच्या इकडे दुष्काळाच्या इतर कांहीं कारणांचा अभाव असतां, जीं कारणें प्रजेच्या व सरकारच्या हयगईमुळें उत्पन्न होऊन देशांवर वारंवार दुष्काळाचे हल्ले होत आहेत, तीं कारणें उभयतांच्या प्रयत्नांनीं जर नाहींशीं झालीं असतीं, तर देशांत यापेक्षां कमी धान्य उत्पन्न झालें असतें, देशांतून यापेक्षां जास्त धान्य परदेशीं व्यापाराकरितां रवाना झालें असतें, आणि धान्येतर जिन्नस उत्पन्न करण्याकडे लोकांनीं आपलें लक्ष्य यापेक्षांही जास्त लावलें असतें, तरी आम्हांला भिण्याचें कारण नव्हतें. इंग्लंड देशांत चांगलें पीक आलें, तरी स्थानिक धान्याचा पुरवठा चार महिन्या पुरताही नसतो, असें असून तेथें दुष्काळ कधीं पडत नाहीं. अमेरिका, हिंदुस्थान वगैरे ठिकाणांहून गेलेल्या धान्यावर त्यांचे आठ महिने लोटतात.

परंतु इतर कारणें नाहींशीं होण्याची व्यवस्था होण्यास बराच काळ लागेल, ह्मणून चालू कारणांपुरताच विचार करितां असें वाटतें कीं, लोक जर सध्यांसारख्या खडतर प्रसंगीं आपला अन्नसंग्रह बाहेर देशीं पाठविण्याचें बंद करणार नाहींत, तर सरकारांनीं निदान अशा भयंकर वेळेपुरतें

तरी आपलें अप्रतिबद्ध व्यापाऱ्याचें तत्त्व थोडें बाजूला सारून, मनुष्यांचें आणि जनावरांचें अन्न बाहेर पाठविण्याची सक्तीनें मनाई करावी. मुंबईच्या लोकांनीं सन १८९९ च्या आक्टोबर महिन्यांत इंडिया सरकाराकडे पाठविलेल्या अर्जांत ज्या मागण्या केल्या आहेत, त्यांत या आशयाची एक मागणी असून ती अगदीं योग्य आहे असें आह्मांला वाटतें.

**नववें कारण**—पावसानें दगा दिला ह्मणून दुष्काळ पडतो हें म्हणणें जसें वर वर पाहणारास खरें दिसतें, तसेंच तो लोकसंख्येच्या वाढीनें पडतो, हें म्हणणेंही सकृद्दर्शनीं खरें भासतें. पाऊस आणि टोळांच्या वगैरे धाडी हीं जशीं अनिवार्य कारणें आहेत, तीं जशीं टाळतां येणें आपल्या हातचें नाहीं, तशी लोकसंख्येची वृद्धिही पण बहुतेक अनिवार्यच आहे. एखाद्या वर्षाच्या पावसाच्या दग्यानें किंवा तशाच एखाद्या टोळधाडीसारख्या अरिष्टानें ज्या देशाला आपला निभाव काढतां येत नाहीं त्या देशाच्या अंतर्व्यवस्थेंत कांहींतरी घोंटाळा असला पाहिजे असा सिद्धांत काढण्यास जशी हरकत नाहीं, तशीच लोकसंख्येची वाढ बेताची असतां ज्या देशास आपला निभाव लावतां नाहीं. त्या देशाची अंतर्व्यवस्थाही बिघडलेलीच असली पाहिजे, असा सिद्धांत काढण्यासही पण हरकत नाहीं. असें आम्हांस वाटतें.

गेल्या खानेसुमारीवरील मुख्य अधिकारी मि. बेन्स यांनीं आपल्या रिपोर्टाच्या ७३ व्या पानावर जगांतील पुष्कळ

देशांच्या लोकसंख्येच्या वाढीची हिंदुस्थानांतील लोकसंख्येच्या वाढीशीं तुलना केली आहे—ती वरून पाहतां हिंदुस्थानाचा नंबर विसावा लागतो. अमेरिका व यूरोपखंडांतील निरनिराळे एकोणीस देश आमच्यावरती आहेत. या सर्व देशांची सांपत्तिक स्थिति आमच्या देशा-पेक्षां अनेकपट चांगली आहे; या सर्व देशांस आपआपल्या संततीचा भार वाहण्याचें सामर्थ्य असून आम्हींच ज्या अर्थीं असमर्थ बनलों आहोंत, या देशांतील लोकसंख्येची वाढ आमच्यापेक्षां अधिक झपाट्यानें होत असतां यांना कधीं दुष्काळाची पीडा होत नाहीं, आमच्या मात्र ती जर अगदीं तिसऱ्याच वर्षीं येऊन बोकांडीच बसते. तर त्यांतलें इंगित कांहीं निराळेंच असलें पाहिजे. लोकसंख्येची वाढ हें जर दुष्काळाचें कारण असतें, तर अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत, खुद्द इंग्लंडांत किंवा बाकी राहिलेल्या आणखी १७ देशांत पाऊस पाण्यांत थोडी चलबिचल होतांच आमच्या येथल्या पेक्षां दुष्काळ वारंवार आले असते. परंतु असें होत नाहीं.

देशाच्या विस्ताराशीं लोकसंख्येचें प्रमाण पाहिलें तरी-ही असेंच आहे. तसा इंग्लंडचा पहिला नंबर येतो. इंग्लंडास दर मैली ४९.८ वस्ती आणि हिंदुस्थानांत २३० ह्मणजे येथल्या दुप्पट गर्दी करून इंग्लंडांतील लोकांस रहावें लाग-तें. सरासरीनें आमच्या इकडच्या प्रत्येक माणसास इंग्लं डांतील प्रत्येक मनुष्याच्या दुप्पट जागा मिळते, तथापि दु-ष्काळाचे बळी आम्हींच !

एकंदर सर्व ठिकाणच्या सांपत्तिक स्थितीच्या व लोकवस्तीच्या अवलोकनानें मैलीं ६४० पर्यंत लोकवस्ती झाल्यास चिंता नाहीं. अधिक झाली तर मात्र निभाव लागणार नाहीं, असें मान काढण्यांत आलें आहे. परंतु हिंदुस्थानांत पहावें तों मैली २३० लोकांचेही हाल होऊं लागले आहेत.

या सर्व गोष्टींचा विचार करितां हिंदुस्थानांतील लोकसंख्येच्या वाढीचें प्रमाण इतर देशाच्या मानानें फारच कमी आहे; व तें योग्य मर्यादेबाहेर जाण्यासही अजून बराच अवकाश आहे, असें आढळून येईल. तेव्हां आतां असा प्रश्न उद्भवतो कीं, अशी स्थिति असतां आह्मांला वारंवार उपाशीं मरण्याची पाळी कां येते ? याचें कारण आमच्या मतें आम्हीं सर्व शेतकीकडे धांव मारतों हेंच आहे.

आमच्यामधील शंभर लोक घेतले तर त्यांपैकीं शेंकडा ८६ शेतकीवर अवलंबून असतात; ६·८ सरकारी व खाजगी नोकरीवर निर्वाह करितात; आणि बाकी राहिलेले ७·२ मात्र व्यापार व किरकोळ हुन्नरावर उपजीविका चालवितात.

हें प्रमाण, इतर आज सुखी असलेल्या, सृष्टिप्रकोप होऊन पावसानें दगा दिला तरी मोठ्या हिमतीनें आनंदांत दिवस काढणाऱ्या सर्व जगाचा व्यापार आक्रमून बसलेल्या इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांत अगदीं उलट आहे. या देशांतील शास्त्रज्ञ पंडित परमेश्वराच्या अष्टधा प्रकृतींची पूर्णपणें ओळख करून घेऊन त्यापासून जीव मात्राच्या

सुखांत कशी भर घालतां येईल या विचारांत गुंतले असून आमच्या इकडील शास्त्राचे धनी ( एम, ए. ) आपल्यावरचा प्रोफेसर मरून त्यांची जागा आपणास कधीं मिळेल या किंवा याच योग्यतेच्या दुसऱ्या विचारांत गुंतलेले आहेत. याचीं कारणें काहींहि असतीऽ परंतु ही वस्तुस्थिती आहे, व ती पार बदलली पाहिजे.

नवीन नवीन वस्तु परक्या लोकांनीं शोधून काढाव्या, आणि त्या आह्मीं विकत घ्याव्या, उद्योग करून शोध लावून कारखाने घालून कोट्यावधि रुपये मिळविण्याचें काम परक्या देशांतील लोकांचें आणि आळसानें पडून आपल्याच शेजाऱ्याचा गळा कापून आली वस्तू विकत घेऊन देशांतल्या संपत्तीचा व्यय करण्याचें काम आमचें. हिंदुस्थान म्हणजे जगांतल्या देशाचा बाजार, सगळ्यांची उतार पेठ ! नुसती पोरांचीं खेळणीं वीस लक्ष रुपयांची खपतात ! इतकी विद्या वाढली, इतकी शांतता मिळाली, इतकी परदेश गमनाचीं साधनें सुगम झालीं, सर्व कांहीं झालें. अगदीं वाघ्याचा पाग्या झाला. पण आज शें दीडशें वर्षांत जो कांहीं एककोट मागें लागला आहे. तो कांहीं सुटत नाहीं. मग काय आमची कायमची तळई उचलणार आहे कीं काय, कोणाला ठाऊक ! आम्हीं उन्हाळा पावसाळा मिळून वर्षास दोन छत्र्या फाडतो आणि विड्या फुंकण्यांत दररोज एक काड्याची पेटी खपवतो. घड्याळ तर आमच्या जांवई बापूंच्या देणगींतली एक अवश्य देणगीच होऊन बसली

आहे. पण या वस्तु कशा बनविल्या असतील असा मनाशींच प्रश्न करून तो सोडविण्याचा प्रयत्न आह्मीं कधीं केला आहे काय? केला असता तर आज पन्नास लाख रुपयांच्या छत्र्या, अडतीस लाखांच्या आगपेट्या आणि पंधरा लाखांचीं घड्याळें येथें कशाला आलीं असतीं? आम्हीं १ अब्ज १७ कोटींचा माल परदेशीं पाठवितों परंतु त्यांत १२ कोटींचा देखील तयार केलेला नसतो. बहुतेक कच्चा! आणि त्या कच्च्या मालामध्यें सुद्धां १५ कोटींचा चहा काफी, नीळ वगैरे परक्या देशच्या व्यापाऱ्याच्या कारखान्यांत परकी भांडवलानें उत्पन्न झालेला! आयात व्यापार, चहा,सोनें,रुपें वजा जातां परदेशांतून ब्यायशीं कोटींचा माल येतो. परंतु त्यांत कच्चा माल कायतो सरासरी पांच कोटींचा. अर्थात् जें प्रमाण उद्योगांत तेंच संपत्तींत असणार! हें रास्त नाहीं. आम्ही सर्वांनीं उद्योगाची कांस धरली पाहिजे. हे ब्रह्मदेव बनण्याचे दिवस नाहींत, विश्वकर्मा होण्याचे आहेत, हें तत्त्व आमच्यापैकीं प्रत्येकानें लक्षांत बाळगलें पाहिजे. हें लक्ष्यांत वागवून आह्मीं उद्योगास लागलों, इ० स १८८० सालच्या रिपोर्टांत फ्यामिन कमिशननें सुचाविल्याप्रमाणें आम्हांमध्यें उद्यमवैचित्र्याचा प्रादुर्भाव झाला, आणि आम्हीं घरकोंबडेपणा सोडून औद्योगिक आणि यांत्रिक शिक्षणाकरितां परदेशगमन करूं लागलों, ह्मणजे आमची लोकसंख्या याच्या दुप्पट वेगानें जरीं वाढली, तरी चिंता नाहीं. ज्या देशांत लोक उद्योगी असतात आणि हर प्रयत्न

करून नाना प्रकारच्या युक्तयांनीं आपल्या देशाची संपत्ति वाढविण्याकरितां झटतात, त्या देशांत लोकसंख्येची वृद्धि नाशास कारण न होतां उलट परिणामीं हितच होतें.

आमच्या देशांतील लोकांची परदेशगमनाकडे थोडथोडी प्रवृत्ति झाली आहे, परंतु ह्या विदेशगमनी लोकांपैकीं बहुतेक सर्व केवळ मजूर असतात, ही मोठीशी समाधानाची गोष्ट नाहीं. लाखों मजूर दूरदेशीं जातात आणि खर्चवेंच भागवून दहापांच वर्षांनीं त्यांपैकीं प्रत्येक हजार दोन हजार रुपये घेऊन परत येतो, यांत कांहीं विशेष नाहीं. मॉरिशस बेटांत उंसाचीं शेतें आणि साखरेचे कारखाने यांमध्यें काम करण्याकरितां तीन लाख हिंदुस्थानांतले लोक आहेत. पण त्यांपैकीं तिघांनीं तरी येथें येऊन त्या प्रकारच्या उंसाची लागवड केली आहे काय? त्यांतल्या एकानें तरी येथल्या साखरेच्या कारखान्यांत राहून त्याला तिकडलें वळण दिलें आहे काय? सध्यां मॉरिशस, नेटल, ट्रिनिडाड, सैन्ट ल्यूशिया, ग्रॅनडा, सेंट व्हिन्सेंट, सेंट कीट्झ, ब्रिटिश, फ्रेंच, आणि डच ग्वायना, मार्टीनीक, माडागास्कर, ग्वाडेलुक, रीयुनियन, काईक्स बेट, मंबासा वगैरे अनेक ठिकाणीं आमचे लोक जातात, परंतु त्यांपैकीं शेंकडा नव्याण्णव मजूर! हें ठीक नाहीं. व्यापाराकरितां, धंदे शिकण्याकरितां आणि कलाकौशल्य शिकण्याकरितां परमुलखांत गेलें पाहिजे.

शिकलेले कांहीं लोक परमुलखांत अधिक शिक्षणाकरि-

तां जातात, पण त्यांपैकीं बरेचसे ब्यारिस्टर आणि कांहीं डाक्टर होऊन येतात. कारागीर एकदेखील नाहीं.

सदर विवेचनावरून आमच्या येथें जे दुष्काळ पडतात ते लोकसंख्येच्या वाढीनें पडत नाहींत. तर सर्वच लोक शेतकीच्या क्षेत्रांत घुसतात, उद्योगधंदे करून देशांत कलाकौशल्याची आणि त्याच्या योगानें बनविलेल्या वस्तूंची वाढ करीत नाहींत; एकंदरींत त्यांना उद्योगाची आवड नसते; ते देशांत उद्योग करीत नाहींत किंवा परदेशीं जाऊन तो कसा करावा हें शिकूनही येत नाहींत, यामुळें ते पडतात, हें वाचकांच्या लक्ष्यांत आलेंच असेल. ही देशस्थिति बदलली पाहिजे. रसायनादि शास्त्रांचा अभ्यास करून पदव्या मिळविलेल्या लोकांनीं स्वस्थ न बसतां प्रो. बोस, प्रो. गज्जर आणि प्रो. शंकरराव भिसे यांच्याप्रमाणें त्यांनीं कांहीं नवीन कल्पना काढल्या पाहिजेत, आणि आम्हीं अशा सद्गृहस्थांस द्रव्यद्वारा मदत करून आमच्या देशाच्या दुष्काळरूपी शत्रूस दूर झिडकारून लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आमचें दुसरें कर्तव्य म्हणजे परदेशगमन करून परत येणाऱ्या लोकांवर धर्माच्या नांवाखालीं आम्हीं जो जुलूम करितां तो बंद करणें. कालदेशवर्तमानाकडे लक्ष्य देऊन लोकांचें सुख वाढविण्याकरितां चालीरीतींत अवश्य तितके फेरफार केलेच पाहिजेत. असे फेरफार पूर्वीं झाले आहेत आणि पुढेंही झाले पाहिजेत. जे गृहस्थ आपल्या

पदराला खार लावून आपल्या कुटुंबाचे सर्व प्रकारचे पाश बाजूला सारून, आणि दूर प्रवासाचा त्रास सोसून केवळ आपलें व आपल्या देशाचें कल्याण करण्याच्या सद्धेतूनें परदेशगमन करतील, त्यांना परत येतांच जर आम्हीं हिडिस् फिडिस् करूं लागलों, त्यांचीं जेवणाचीं पानें आपणापासून दूर अंतरावर मांडूं लागलों, त्यांच्या हातचे अन्नपानादि व्यवहार आपण बंद केले, तर आपण किती कृतघ्न ठरूं? ज्यांनीं सत्कार्यें करावींत त्यांच्या मिशा भादरण्याला आम्हीं आपले वस्तरे पाजवावेत हा मोठा नीचपणा आहे. हें मोठें अज्ञान आहे. याकरितां असे लोक परदेशांतून परत येतांच त्यांच्या मिशा भादरण्याची तयारी न करितां आम्हीं त्यांस सन्मान देण्याची तयारी केली पाहिजे.

हें लोकांचें कर्तव्य झालें. आतां सरकार, तें तर समर्थच आहे. एवढासा जपान देश, त्यानें सरकारी प्रयत्नानें फक्त वीस वर्षांत केवढी प्रगति केली? काय व्यापार वाढविला? मी मी म्हणणाऱ्या फ्रान्स, इंग्लंड, जर्मनीसारख्या देशांसही त्यानें कसें आश्चर्यचकित केलें? अशी सरकारची गोष्ट असते. त्यांच्या शक्ति मोठ्या असतात. हिंदुस्थान सरकार मनांत आणील तर आमची पक्की खात्री आहे कीं, दहावीस वर्षांतच आम्ही शेतकऱ्याचे कारागीर बनूं. परंतु इतकी मोठी गोष्ट त्यांच्या मनांत येण्यास अवधीही मोठाच लागेल. म्हणून सध्यां आमची त्यांस इतकीच सूचना आहे कीं, येथून परक्या देशांत निदान तुमच्या

वसाहतींत, जाणाऱ्या आमच्या केवळ मजूरी किंवा फार तर हलीचा धंदा करणाऱ्या गरीब लोकांस आज जो तुमच्या भलभलत्या नियमांपासून त्रास होत आहे, त्यांना तुमच्या अगदीं हाडामांसाच्या गोऱ्या कातडीच्या सुधारलेल्या लोकांकडून अगदीं एकाद्या पशूंप्रमाणें जें वागविण्यांत येत आहे, त्यांची कांहीं दाद लावा. आमचे दरबानांत असलेले ब्यारिस्टर गांधी दक्षिण आफ्रिकेंतील हिंदूलोकांविषयीं काय गाऱ्हाणें गात आहेत ते पहा, आणि धंदेशिक्षणाकरितां मागें तिसऱ्या कारणाचा विचार करीत असतां सूचविल्याप्रमाणें कांहीं स्कालरशिपा ठेवा. सर मंगळदास नथूभांईनीं हें करून आपलें नांव अजरामर करून ठेवलेंच आहे. त्यांतच तुमची भर पडूं द्या ह्मणजे झालें. या दोन गोष्टी जरी तुह्मीं आज केल्यात, तरी पुरें आहे!

**दहावें कारण**—आतांपर्यंतच्या एकंदर विवेचनावरून हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची सध्यां फार दैना झाली आहे. त्यांना सुकाळांत सुद्धां अर्धपोटीं राहावें लागतें; वगैरे गोष्टी बऱ्याच स्पष्ट रीतीनें वाचकांपुढें आल्या आहेत. ई. स. १८५८ सालीं ब्राईट साहेब पार्लमेंट सभेंत ह्मणाले: "हिंदुस्थानांत मुख्य भरणा म्हटला ह्मणजे शेतकऱ्यांचा. त्यांची स्थिति फार वाईट आहे. ते अत्यंत दरिद्री, अगदीं हताश आणि फार कष्टी झाले आहेत." परवां नुकतेंच लार्ड कर्झन साहेबांनींही हेंच बोलून दाखविलें. ते ह्मणाले: "पंजाबचे शेतकरी ह्मणजे हिंदुस्थानच्या लोकसंख्येचें भूषण

आणि आमच्या नेटिव्ह सैन्याचे आधारस्तंभ आहेत. त्यांचां होत असलेला ऱ्हास आणि त्यांना आलेलें दारिद्र्य आमच्याच्यानें आतां पाहवत नाहीं. ” परंतु या शेतकऱ्यांच्या दारिद्र्याबद्दल लोक काय ह्मणतात, तें पाहून आह्मीं कल्पना करावयाची ह्मणजे हातांतलें कंकण पहाण्यास आरशाचें साहाय्य घेण्यासारखेंच वेडेपणाचें आहे. ज्याला हिंदुस्थानचे शेतकरी अत्यंत दरिद्री झाले आहेत, हें आमचें विधान खोटें वाटेल त्यानें आपलें शहर सोडून थोडें खेड्यांत जाऊन पहावें. ह्मणजे त्याची खात्री होईल.

अवश्य तितकींच लांकडें असलेलें, पेंढ्या पाकळीनें शिवलेलें आणि कुडाला शेंकडों भोंकें पडलेलें तें घर, तो मडक्यागाडग्यांचा संसार, ती अन्न न मिळाल्यामुळें हातापायाच्या काड्या आणि पोटाचा नगारा झालेलीं “बाबा बाबा ! बय बय !” करून भाकरीच्या एका तुकड्यासाठीं एकमेकांशीं भांडणारीं त्याचीं पोरें, तें वैरणीवांचून उठवणीस आलेलें एकादुसरें ढोर, वगैरे पाहून या बिचाऱ्याची अशी भयंकर स्थिति कां झाली असावी, असा प्रश्न सहाजिकच उत्पन्न होतो.

कांहीं लोक असें ह्मणतात कीं, शेतकरी फार उधळपट्टी करितात, लग्नें आणि दिवस यांस त्यांचा फार खर्च होतो, ह्मणून ते दरिद्री झाले. परंतु डेक्कन रयत कमिशनाचा अभिप्राय याहून फार निराळा आहे. ते ह्मणतातः “ लग्नकार्याच्या खर्चानें शेतकरी कर्जबाजारी झाले असें ह्मणून उगाच या खर्चाला महत्व दिलें आहे. ” हिंदुस्थानच्या

खर्चाची चौकशी करण्याकरितां विलायतेंत जें कमिशन बसलें होतें, त्यापुढें साक्ष देतांनां सर डेव्हिड बार्बर साहेब ह्मणाले: " हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांस कोठें खर्च करावा, कोठें नाहीं, हें चांगलें समजत असून ते फार काटकसरीनें वागतात." सर रोमेशचंद्र दत्त, नामदार पारख, व रावबहादूर फाटक यांचेंही पुष्कळ निरीक्षण व अभ्यासाच्या अंतीं असेंच मत झालें आहे.

शेतकऱ्यांच्या बहुतेक जातींत लग्नामध्यें मुलीच्या बापास मुळींच खर्च करावा लागत नाहीं. सर्व खर्च बहुधा मुलाच्या बापासच करावा लागतो. व तो बहुतेक करून ज्यांचें लग्न करावयाचें त्या मुलास, रकमेच्या मानानें कांहीं वर्षांच्या करारानें एकाद्या मनुष्याकडे नोकर ठेवून खर्चा-करितां रक्कम काढतो. नोकराची धडीपगडी, खाणेंपिणें वगैरे सर्व खर्च यजमानाच्या अंगावर असल्यामुळें या युक्तीनें त्याला कोणतेही प्रकारें व्याज वगैरे भरावें न लागतां त्याचें काम होतें व मुलगाही चांगल्या ठिकाणीं वागून संसाराला उपयोगी झाला ह्मणजे चाकरीची मुदत सरतांच घरीं परत येतो.

दिवसासंबंधानें किंवा मर्तिकाच्या खर्चासंबंधें पाहूं जातां-ही त्यांच्यावर कर्जाचा बोजा बसण्याचें विशेष कारण नसतें. जातीचे लोक ज्याच्या घरीं मर्तिक झालें असेल त्याच्या घरीं त्याची स्थिति पाहूनच जात असतात. आणि पंगत बसल्यावर एकदां यजमानानें " पाणी द्या "

असें ह्मटलें ह्मणजे याच्या जवळची पुंजी संपली असें समजून खुशाल उठतात. आणि त्याचा मीठभात गोड करून आपआपल्या घरीं जातात.

या दोन्ही प्रसंगांचे भोजनसमारंभ पाहणाराची त्यांच्या काटकसरीपणाबद्दल—अथवा त्यांच्या दारिद्र्याबद्दल म्हटलें तर अधिक शोभेल—खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं. एक ढक्कूभातावांचून दुसरें कांहीं नाहीं! याला काय उधळपट्टी ह्मणावयाची, कीं काटकसर म्हणावयाची ? मला वाटतें याला दारिद्य म्हणणेंच जास्त शोभेल.

शेतकऱ्यांच्या कर्ज बाजारीपणाची मूळउत्पत्ति, गल्ल्या ऐवजीं नक्तींत सारे घेण्याच्या आणि तेही पुष्कळ प्रांतातून पिकें तयार होण्याच्या पूर्वीं आणि सर्वत्र अत्यंत जबर घेण्याच्या पद्धतींतच आहे, असें अनेक देशी व विदेशी विद्वानांचें मत आहे.

इ. स. १८७४ सालीं दक्षिणेंतील शेतकरी लोकांनीं सरकारच्या फाजील वाढलेल्या जमीनधाऱ्याच्या नेटाच्या मागणीनें आणि सावकारांच्या जांचानें त्रासून दंगा केला, आणि सावकार लोकांचीं कोणाचीं नाकें कापलीं, कोणाला भाजलें, कोणाला मारिलें, कोणावर दरोडे घालून जें हातीं लागलें तें लांबविलें, आणि बहुतेकांचे जमाखर्चाचे कागद आणि खतेंपत्रें यांचा नाश केला. तेव्हां सरकारच्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून या दंग्याच्या कारणांचा शोध करण्याकरितां एक कमिशन नेमण्यांत आलें. या कमिशन

मध्यें सरकारची "रेव्हेन्युपद्धत" हें या दंग्याचें एक कारण आहे, असा बहुमतानें ठराव झाला. या संबंधांत मिस्तर— आतां सर—आकलंड कोल्व्हिन व मि. कार्पेंटर यांचे ठराव वाचण्यासारखे आहेत.

कांहीं सरकारी कामदारांस वाटतें कीं, सावकार हे शेतकरी लोकांच्या कर्जबाजारीपणास कारण आहेत. परंतु हें खोटें आहे. सावकार कांहीं कुणब्याकडे तूं माझें कर्ज घे ह्मणून ह्मणण्यास जात नाहीं, आणि यदाकदाचित् कोणी गेलाच, तरी जरूर नसतां सवाईचें किंवा कित्येक प्रसंगीं दिढीचें व्याज कबूल करून त्याचे पैसे व्याजी घेण्याइतके कांहीं आमचे कुणबी मूर्ख नाहींत. 'ज्याचे पोटांत दुखेल तोच औषध मागेल,' या न्यायानें ज्याला खायला नसेल किंवा ज्यांच्यापाशीं सरकारी धारा भरावयाला पैसा नसेल, तोच सावकाराची पायरी चढून आपल्या गरजेप्रमाणें कमीजास्त व्याज कबूल करून रक्कम घेईल. नोटीसफी, जप्तीखर्च आणि धान्याच्या चौथाई दंड भरावयास पडूं नये, वाडवडिलांपासून कित्येक पिढ्या ज्या जमीनीच्या तुकड्यावर पोट भरलें, तो तुकडा बाहेर लोकांच्या घरांत जाऊं नये, वसूल न दिला तर खालच्या दर्जाच्या सरकारी नोकरांकडून ज्या ज्या विटंबना होतात, जीं अपमानाचीं बोलणीं सोसावीं लागतात आणि जो आईमाईचा उद्धार होतो तो होऊं नये, असें ज्यांस वाटतें तेच जवळ पैसा नसल्यामुळें सावकाराचें तोंड पाहतात.

कुळाच्या पदरांत पैसा पडण्यापूर्वीं स्टँप घेऊन आणि मग तो रोखा रजिस्टर कचेरींत नोंदून त्याला बरेच पैसे प्रथम सरकारच्या पदरांत टाकावे लागतात.

शेतकऱ्याची पैदास्त कायती शेतांतलें उत्पन्न. त्यांतूनच त्याला सरकारच्या विलक्षण करामुळें तीसपट जास्त महाग झालेलें मीठ घ्यावें लागतें. रुपया धाऱ्यावर एक आणाप्रमाणें लोकलफंड भरावा लागतो. आपलीं गुरें चारण्याबद्दल फी द्यावी लागते. तो म्युन्सिपल हद्दींत रहात असेल तर त्याला घरपट्टी वगैरे म्युन्सिपालिटीच्या पट्या भराव्या लागतात. शिवाय त्याच्या खपाच्या दुसऱ्या किरकोळ जिनसांवर सरकारी किंवा म्युनिसिपालीटीचे जे जे कर असतील तेही अप्रत्यक्ष रीतीनें त्याच्याच डोक्यावर बसतात. अशा कचाट्यांतून त्याचा निभाव कसा लागावा ?

साऱ्याच्या वसूलीसंबंधानें नियमच पाहूं गेलें, तर ते कांहीं सवलतीचे आहेत, व दुष्काळासारख्या प्रसंगीं तर त्यांत शेतकऱ्यांस बऱ्याच सवलतीही दिल्या आहेत. परंतु नियम करणें निराळें आणि त्याप्रमाणें वागणें निराळें. माणसाची परीक्षा त्यानें आपल्या टेबलापुढें लावून ठेवलेल्या गोडगोड नियमांवरून न करितां ती त्याच्या वर्तनावरूनच केली पाहिजे. एकाद्या वेळीं आमचें सरकार नियम चांगले करितें, परंतु त्यांची अंमलबजावणी मात्र होत नाहीं. इतकेंच नव्हे, तर अंमलबजावणी होऊं नये, असाच सरकारच्या राज्यपद्धतीचा कटाक्ष दिसतो. मि. आलफ्रेड नंदी

यांनीं हिंदुस्थानचें दारिद्र्य नावांचा एक लेख लिहिलेला असून त्यांत इ. स. १८७९ सालीं वायव्येकडील प्रांतापैकीं एका जिल्ह्याच्या कलेक्टराची हकीगत दिली आहे. या कलेक्टरानें सरकारच्या हेतूप्रमाणें मुद्दाम डोळेझांक करावयाची सोडून आपल्या जिल्ह्यांत अन्नावांचून लोक मरत आहेत असा रिपोर्ट केला, व हजारों गरिबांचे प्राण वांचविले. परंतु याचा शेवट असा झाला कीं, त्याच्या नांवावर काळी रेघ पडली आणि त्याला मध्यप्रांतांत बदललें. शेवटीं आपले हक्क विनाकारण बुडविले, आतां आपल्या खालच्या लोकांस वढती मिळून आपणांस कुचमत राहवें लागणार, असें पाहून बिचाऱ्यानें त्रासून नोकरीचा राजीनामा दिला. अशा अनेक गोष्टी घडत असतील. असें होतें म्हणून खालपासून वरपर्यंत बहुतेक सर्व अधिकारी आपआपल्या शिफारसीकरितां शेतकऱ्यांस पिळून काढितात आणि ते कर्ज बाजारी झाल्याच्या दोषांचें खापर सावकारांच्या माथीं फोडून त्यांची स्थिति सुधारण्याकरितां पंजाब लँडएलिनिएशन किंवा खोतीबिलासारखें एकादें बिल पुढें आणितात, आणि आपल्या चुकीनें होणाऱ्या घाताबद्दल दुसऱ्यांस शिक्षा करूं इच्छितात.

असो. कारणांबद्दल मतभेद जरी असला, तरी हिंदुस्थानांतील शेतकरी आज अत्यंत दरिद्री झाले आहेत, ही गोष्ट खाजगी लोकांप्रमाणें सरकारी अंमलदारांनाही कबूल आहे. त्यांना सुकाळाच्या वर्षींदेखील आषाढ आणि श्रावण हे

दोन महिने कर्ज आणूनही अर्धपोटीं राहिल्यावांचून काढणें आतां अशक्य झालें आहे. आदल्या वर्षी कर्जीदाणे किंवा दाणे देण्याच्या करारानें रुपये काढावयाचे आणि पीक तयार होतांच प्रथम सावकाराची आणि मग सरकारची भर करून आठ महिने मोलमजूरीवर कसा तरी गुजारा करावयाचा, असा प्रकार झाला आहे. गांवांत जें धान्य तीन पायली भावानें आज मिळतें, तें नऊ पायली घेण्याच्या करारानें आमचे सावकार किंवा रॅलि ब्रदर्ससारख्या जगद्विख्यात कंपनीचे एजंट शेतकऱ्यांना पैसे देतात आणि केव्हां केव्हां तर त्यांचीं उभीं पिकेंच एकदम ठराव करून त्यांजपासून घेतात व शेतकरीही गरजू असल्यामुळें या लोकांच्या सर्व अटी कबूल करून आलेले दिवस काढितात. यामुळें आमच्या शेतकऱ्यांस आतां नेहमींचाच दुष्काळ आला आहे. ते फक्त धान्य पिकविण्याचे मालक. फायद्याचे मालक व्यापारी.

अशी शेतकऱ्यांची दुर्दशा उडाल्यामुळें सदर कारणांत सांगितल्याप्रमाणें शेतकीची अनास्था होऊन आमच्या दुष्काळांस साहाय्य होत आहे.

ही स्थिति सुधारण्याकरितां कितीही बिलें पुढें आलीं आणि डेक्कन अग्रिकलचरिस्टस ॲक्टाप्रमाणें शेतकऱ्यांस कर्जबाजारांतून मुक्त करणारे कितीही कायदे पास झाले तरी त्यांपासून विशेष उपयोग होणार नाहीं. ती सुधारण्याचा खरा मार्ग ह्मटला म्हणजे पार्लमेंट सभेस सर वुइल्य-

म वेडरबर्न साहेबांनीं सुचविल्याप्रमाणें " व्हिलेज इन्कायरी " ( खेडयांतील लोकांच्या स्थितीची चौकशी ) करण्याकरितां एक कमिटी नेमून तिच्या सूचनेप्रमाणें तजविजी करणें हाच होय. हा उपाय सदर साहेब इ.स. १८९७ च्या दुष्काळापासून सुचवित आहेत. परंतु परकीय लोकांच्या पार्लमेंटमध्यें आमच्या कळवळ्याचीं माणसें कितीशीं मिळणार ? ता. ३ एप्रिल रोजीं ८३ लोकांचें मताधिक्य होऊन ही सूचना नापसंत झाली. तथापि या सभेंत सदर प्रसंगीं असलेल्या २२७ सभासदांपैकीं ७२ या सूचनेस अनुकूल होते. यावरून सदर सूचनेची अवश्यकता व महत्व वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

शेतकऱ्यांची आणि त्यांच्या द्वारें शेतकीची स्थिति सुधारण्याकरितां, अर्थात् दुष्काळाला प्रतिबंध करण्याकरितां सरकारास करावयाची दुसरी सूचना ह्मणजे त्यांनीं जिल्हानिहाय शेतकरी लोकांस कर्ज देण्याकरितां पेढ्या स्थापन केल्या पाहिजेत. सावकार लोकांचा दोष जर कांहीं असेल तर तो हाच आहे कीं, दिवसेंदिवस त्यांच्या दारीं कर्ज मागणारांची गर्दी उडाल्यामुळें ते ज्यास्त व्याज घेतात किंवा क्वचित् प्रसंगीं त्यांच्या जमीनी आपल्या घरांत शिराव्या म्हणून कांहीं सावकार खोटेनाटे हिशेब करतात. परंतु हें टाळावयाचें म्हणजे शेतकऱ्यांचीं जुनीं कर्जे फेडून त्यांस सावकाराकडे जाण्याचा प्रसंगच येऊं द्यावयाचा नाहीं. याच करितां सरकारांतून पेढ्या स्थापण्यांत आल्या पाहि-

जेत. वेडरबर्न साहेबांनीं मुंबई सरकारास ही सूचना केली व ती त्यांस मंजूर होऊन त्यांनीं इंडिया सरकाराकडे पाठविली, त्या वेळीं लॉर्ड रिपन साहेब गव्हर्नर जनरल होते. त्यांनाही ती योग्य वाटली, आणि त्यांनीं आपल्या अनुकूल अभिप्रायासह ती पुढें स्टेट सेक्रेटरी साहेबांच्या मंजुरी-करितां विलायतेस रवाना केली. इंग्लंडांत ती सर्वांस फार पसंत वाटली. जॉन ब्राईट साहेबांनीं भाषणद्वारा जिकडे तिकडे तिचा गौरव केला. विलायतेंतल्या दैनिक पत्रांतून तिची शिफारस होऊं लागली. म्यांचेस्टर चेंबर ऑफ कॉमर्स-सारख्या मोठमोठ्या वजनदार सभांनीं ती मंजूर व्हावी अशाबद्दल स्टेट सेक्रेटरीकडे अर्ज पाठविले; आणि त्या वेळचे फडणीस सर एव्हलिन बेअरिंग यांनीं या कामा-करितां तूर्त अनुभव पाहण्यासाठीं म्हणून पांच लाख रुप-यांची मंजुरीहि दिली. झालें, आटोपला इतिहास ! पुढें पुढें इंडिया आफिसांत जो तिचा ठावठिकाणा नाहींसा झाला तो अद्यापपर्यंत. मध्यंतरीं साम्युअल स्मिथ साहेबांनीं एकदां चौकशी केली त्या वेळीं " ही सूचना अमलांत आणण्या-सारखी नाहीं असें वाटल्यावरून निकालांत काढली आहे, " असा जबाब त्यांस मिळाला. अशा पेढ्या असणें हाच शेत-कऱ्यांस सावकारांच्या तडाक्यांतून वांचविण्याचा व त्यांची स्थिति सुधारण्याचा एक मार्ग आहे, असें सर्व यूरोपाचें मत असतां व एकट्या जर्मनींत सध्यां अशा दोन हजार पेढ्या चालू असतां ही सूचना अमलांत आणण्यासारखी नाहीं

असें ह्मणणें, ह्मणजे हिंदुस्थानचें कांहींही होवो, आह्मांला त्याचा विचार कर्तव्य नाहीं, असें ह्मणण्यासारखेंच आहे.

दाक्षिणेंतील चार जिल्ह्यास लागू केलेला शेतकी ॲक्ट मुंबई इलाख्यांतील बाकींच्या जिल्ह्यांस लागू करावा किंवा नाहीं, या प्रश्नाचा विचार करण्याकरितां थोडद्या दि-वसांपूर्वीं एक कमिशन नेमण्यांत आलें होतें; त्या वेळीं "शेतकऱ्यांच्या पेढ्या काढिल्यावांचून सदर ॲक्टापासून शेतकऱ्यांस विशेष फायदा होणार नाहीं." असा कै० न्यायमूर्ति रानडे यांनीं आपला अभिप्राय दिला होता. नामदार पारख यांनीं आपल्या सातारच्या भाषणांत सरकारास दुष्काळ निवारण्याकरितां सुचविलेल्या उपायांत या सूचनेचा अंतर्भाव केला आहे, यावरून दुसरी सूचनादेखील फार महत्वाची आहे, ही गोष्ट कोणास नाकबूल करितां येणार नाहीं.

शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यासंबंधानें लोकांचें कर्तव्य काय आहे, हें रावसाहेब गोपाळ अनंत भट, बी.ए. सब जज्ज कुमठा, यांनीं कांहीं दिवसांपूर्वीं जितक्या स्पष्ट रीतीनें लोकांपुढें मां-डलें होतें, तितकें तें दुसऱ्या कोणीही आजवर मांडलेलें नाहीं. थोड्या दिवसांपूर्वीं टाइम्समध्यें रावसाहेब भटां-च्या तत्त्वांवरच वेहरे नांवाच्या कोणी सद्गृहस्थांनीं कांहीं सूचना केल्या होत्या. परंतु दोहोंचाही इत्यर्थ एकच आहे. प्रत्येक खेड्याला एक देवाचें कोठार काढावयाचें आणि त्या गावांत राहणाऱ्या सर्व शेतकऱ्यांनीं मळण्या होतांच आपआपल्या मगदुराप्रमाणें कोणी दोन मण, कोणी मण,

कोणी सवा पायली, याप्रमाणें गल्ला आणून त्यांत ठेवावयाचा. या गल्लयाची सर्व व्यवस्था गांवचा पाटील आणि पंच यांनीं राखावयाची. पुढें पावसाळ्यांत जेव्हां जरूर लागते तेव्हां ज्यानें जितकें धान्य दिलें असेल तितकें त्यांस देवाचें म्हणून मणास एक पायली व्याजानें कर्जी घालावयाचें. मराठे लोकांत अद्यापि देवाविषयीं फार श्रद्धा असल्यामुळें आपलें हित समजून लोक हें धान्य ते बुडविणार नाहींत. जातीचींही बरींच बंधनें अद्यापि त्यांच्यांत आहेत. म्हणून जो हें धान्य बुडवील, त्याचें हुक्कापाणी बंद करावयाचें, असा निर्बंध केल्यास धान्य बुडण्याची मुळींच भीति राहणार नाहीं. आणि जो तो शेतकरी नेलेलें धान्य व्याजासुद्धां परत आणून देईल. मागच्या सालीं झालेला खर्च किंवा आलेली बूड व्याजाच्या गल्लयांतून कापून घेऊन बाकीचें धान्य देवाच्या कोठारांत ठेवावयाचें व नवें धान्य मागच्या सालाप्रमाणेंच गोळा करावयाचें. असा क्रम कांहीं वर्षें चालल्यास शेतकरी कर्जमुक्त होण्याची बरीच आशा आहे.

आतां ही क्लृप्ति जरी योग्य असली तरी शेतकऱ्यांच्या मनांत ती भरावी कशी? हें मनांत भरवून देण्याचें काम सुशिक्षित लोकांचें आहे. त्यांनीं आपल्या महात्म्या ऋषीचा—आमच्या नवव्या परिषदेचे अध्यक्ष मि. दादाभाई यांचा—त्या वेळचा उपदेश लक्षांत वागवून हें काम केलें पाहिजे. ते म्हणाले: “ आह्मां सुशिक्षित लोकांपुढें असा एक प्रश्न आहे कीं, आम्ही आपलें देशबांधवांसंबंधाचें कर्तव्य कसें

करावें ? आपण आपलें तन मन धन खर्ची घातल्याशिवाय आपल्या हातून कोणतेंही महत्कार्य व्हावयाचें नाहीं, ही गोष्ट आज कोणाला शिकविली पाहिजे असें नाहीं. नुसत्या पोपटी बडबडीनें आम्हांला इंग्रजांची बरोबरी कधींच करितां येणार नाहीं. आपण आपल्या कळकळीनें आणि आत्मीयज्ञानानें आपणांस हातीं घेतलेल्या कामाची योग्यता पूर्णपणें कळली आहे, असें दाखविलें पाहिजे.

ह्या देवाच्या कोठाराचें महत्व शेतकऱ्यांच्या मनांत भरवून देते वेळीं आमच्या सुशिक्षित लोकांनीं आणखी दुसरें एक काम केलें पाहिजे, तें हें कीं, सध्यां न्यायाच्या कोर्टांत गेल्यानें स्टँप वगैरेच्या रूपानें त्यांचें किती नुकसान होतें, हें त्यांस समजावून देऊन 'होईल तितकें करून सावकारावर कोर्टांत जाण्याची पाळी आणूं नका. सावकार कोर्टांत गेले तरी खर्चाचा बोजा तुह्मांवरच बसणार आणि मग तो तुमचें घरदार विकून आपलें कर्ज उगवून घेणार. करितां तो कोर्टांत जाण्यापूर्वींच त्याचा निकाल लावा,' असें त्यांस सांगावें, व सावकारांस लवादमार्फत निवाडा करून त्याची कायदेशीर बजावणी करितां यावी ह्मणून फक्त तो दिवाणी कोर्टांत नोंदून घेण्याविषयीं बोध करावा. म्हणजे शेतकरी बऱ्याच खर्चाच्या बोजांतून सुटून त्याचा फायदा होईल. या कामाकरितां दर तालुक्यास सावकार व कुळें यांच्या प्रतिनिधींची एक पंचकमिटी असावी व त्यांनीं या किरकोळ फिर्यादीचे निकाल करीत जावे. हा एक स्वावलंबनाचा धडा या दृष्टीनेंही या व्यवस्थेपासून बराच फायदा होईल.

असो. अशा रीतीनें सुशिक्षित लोक, शेतकरी आणि सावकार जर आपआपलीं कर्तव्यें बजावतील तर आज दिसत असलेली दैना नाहींशी होऊन शेतकरी सुखानें नांदूं लागतील, आणि आमच्यामध्यें पूर्वापार चालत आलेली ह्मण 'उत्तम शेती,' ती खरी ठरेल.

**अकरावें कारण**–हिंदुस्थानचा बहुजनसमाज म्हणजे शेतकरी लोक, आणि त्यांच्या दारिद्र्याचें मुख्य कारण ह्मणजे दरसाल तीस लक्ष रुपयांनीं वाढत असलेला जमीनीचा सारा होय, हें पूर्वीं सांगण्यांत आलेंच आहे. आतां या शेतकऱ्यांवांचून बाकी राहिलेले तरी लोक चांगले धनाढ्य आहेत काय? या प्रश्नाचेंही उत्तर दुर्दैवानें 'नाहींत,' असेंच द्यावें लागतें. मि. टाटा, पेटिट आणि सर मंगलदास यांच्यासारख्या लक्ष्मीपुत्रांची गोष्ट वेगळी; परंतु रोज चांगलें सुग्रास अन्न, मनासारखें वस्त्र आणि आनंददायक घर, तरी किती लोकांस रहावयास मिळतें! हजारांत एकालाही नाहीं, असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. अॅडम स्मिथ साहेबांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे: "ज्या समाजांत पुष्कळ लोक भिकारी आणि दुःखी असतात, त्या समाजाला कधींही ऊर्जित दशा येत नाहीं, व तो समाज कधींही सुखी असत नाहीं. हिंदुस्थानची स्थिति सध्यां अशीच झाली आहे. सर्व युरोप खंडांत अत्यंत दरिद्री तुर्कस्थान देश, तोही आमच्यापेक्षां तिप्पट श्रीमंत आहे; आणि इंग्लंड आमच्या बेवीसपट श्रीमंत आहे. इंग्लंडांत सरासरीनें दर-

माणसीं ६१५ रुपये उत्पन्न असून, हिंदुस्थानांत अगदीं सरकारी रीतीनें प्रसिद्ध झालेला आंकडा घेतला तरी तें अवघें २७ रुपये आहे. कराचें मान मात्र याच्या उलट! इंग्लंडांत उत्पन्नावर शेंकडा सहा या मानानें कर असून येथें तो शेंकडा १६½ आहे. हिंदुस्थान देश अत्यंत दरिद्री असून त्यावर विलक्षण कराचा बोजा बसल्यामुळें त्याचें दारिद्र्य दिवसेंदिवस अधिक वाढत चाललें आहे. जेथें संपत्ति आहे, कर देण्याचें सामर्थ्य आहे, तेथें तो अधिकआगळा बसविला तरी शोभतो, व सोसतो; परंतु जेथें त्राण नाहीं, तेथें तो बसविणें म्हणजे कर भरणारांस जाणून बुजून धुळीला मिळविण्याचा प्रयत्न करणेंच आहे.

तत्कालिन् कोणत्याही यूरोपियन राजांस आपल्या राज्यव्यवस्थेंत मागें सारणारा हिंदुस्थानचा मोंगल बादशहा अकबर, यानें आपल्या प्रजेवर बसविलेल्या करांचें मान यापेक्षांही जबर होतें, हें दाखविण्याचा हंटर साहेबांनीं फार मोठा प्रयत्न केला आहे. परंतु त्या वेळच्या लोकांची सांपत्तिक स्थिति सध्यांच्या हजारपट चांगली होती, असें त्या वेळीं व त्यानंतर इकडे आलेल्या यूरोपियन प्रवाशांनीं दिलेल्या हकीकतीवरून स्पष्ट होतें. लोकस्थिति चांगली असल्यावर कराचें प्रमाण मोठें होतें ही गोष्ट यदाकदाचित् सिद्ध झाली, तरी त्यांत राज्यकर्त्यांवर कसा दोष येतो व प्रजेचें काय नुकसान होतें, हें समजत नाहीं. ज्याप्रमाणें उन्हाळ्यामध्यें सूर्यकिरणांनीं पाण्याची वाफ होऊन आ-

काशांत जाते व तळीं, विहिरी वगैरे जलाशय कोरडे पड-तात, परंतु पावसाळ्यांत पहिल्या पेक्षांही अधिक पाणी पडून पुनः तीं पाण्यानें डबडबतात, त्याप्रमाणेंच कराच्या रूपानें जरी क्षणभर रयतेजवळचा पैसा देशी राजांच्या खजी-न्यांत गेला, तरी तो पुनः नानारूपांनीं प्रजेमध्येंच परत येतो. अकबरादि देशी बादशहांच्या कारकीर्दींत असाच प्रकार होत असे. त्यांनीं कराच्या रूपानें घेतलेला पैसा पुनः रयतेकडे येई, आणि त्यामुळें ती चांगली सुखी असे. जहांगीर आणि औरंगजेब यांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांत प्रवास करण्या-करितां बर्निअर नांवाचा एक प्रवासी आला होता. तो ह्मणतोः " पुष्कळ लोकांचा समज आहे त्याप्रमाणें मोंगल बाद-शाहांच्या खजिन्यांत कधीं विशेष शिल्लक राहत नसे. जसें त्यांचें उत्पन्न मोठें होतें, तसा त्यांचा खर्चही पण दांडगाच होता. खजीनदार जसा एका हातानें पैसे जमा करितो, व लगेच दुसऱ्या हातानें ते खर्च करितो त्याप्रमाणेंच या बा-दशहांची स्थिति होती." यावर कोणी म्हणेल कीं, इंग्रजांज-वळ कोठें शिल्लक आहे ? हिंदुस्थान सरकाराला तर जवळ जवळ दोन अब्ज रुपये कर्ज आहे. गोष्ट खरी आहे. आमचें सांप्रतचें सरकार मोंगल सरकारापेक्षां फार खर्चिक आहे, इतकेंच नव्हे, तर त्यांचा खर्चिकपणा आमच्या अवसाना-च्याही बाहेर आहे.

रे. टेरी नांवाचा प्रवासी इ. स. १६१५ पासून इ. स १६१८ पर्यंत हिंदुस्थानांत होता. तो ह्मणतोः " देशांत

पैसा येण्याचीं अनेक द्वारें सतत वहात असून येथील पैसा बाहेर नेणें हा मोठा गुन्हा समजला जात असे. हिंदुस्थानांत व ब्रह्मदेशांत त्या वेळीं ह्या गुन्ह्याबद्दल सक्तीचे कायदे होते. " (मुसलमानी रियासत पा. ६१२ ). याप्रमाणें देशांतला पैसा बाहेर न जाऊं देण्याबद्दल खबरदारी घेतली असली ह्मणजे प्रजेवर कराचा बोजा जरी थोडा जास्त असला, तरी तो सोसण्याचें तिच्या आंगीं सामर्थ्य असतें. यालाच उद्देशून सुप्रसिद्ध वक्ते आणि राजपक्षाचे पूर्ण अभिमानी एडमंड बर्क साहेब पार्लमेंट सभेंत एकदां ह्मणाले: "The Tartar invasion was mischievous but it is our protection which destroys India" ( " तार्तरी लोकांची स्वारी घातक होती खरी, तरी आमचें कृपाछत्रच हिंदुस्थानचा सत्यनाश उडवीत आहे. " )

सध्यांचा प्रकार अकबरादि मोंगल बादशहांच्या व्यवस्थेच्या अगदीं उलट आहे. सध्यां देशांतील संपत्ति बाहेर जाण्याचीं द्वारें पूर्णपणें खुलीं असून ती देशांत येण्याच्या मार्गांस मात्र ठिकठिकाणीं दट्टे मारिले आहेत. एकंदर सर्व कर मिळून उत्पन्न होणाऱ्या पंचाण्णव कोटी रुपयांपैकीं मि. हिंडमन म्हणतात त्याप्रमाणें तीन कोटी पौंड ह्मणजे हल्लींच्या भावानें पंचेचाळीस कोटी रुपये, कर्जाचें व्याज, इंडिया ऑफिसचा खर्च, होम चार्जेस, पेन्शन फंड वगैरेंच्या रूपानें दरसाल देशांतून बाहेर चालले आहेत. याशि-

वाय दरसाल हजार रुपये किंवा त्यांपेक्षां अधिक पगाराचे कामगार सर्व हिंदुस्थानांत ३९००० असून त्यापैकीं अकरा हजार नेटिव्ह आणि २८००० यूरोपिअन आहेत. या नेटिवांचा एकंदर पगार साडेचार कोटी असून गोऱ्या लोकांचा साडे बावीस कोटी रुपये आहे. याशिवाय रेलवेकडे मोठ्या पगारावर सव्वीसशें यूरोपिअन असून त्यांचा सालिना पगार एक कोटी वीस लक्ष रुपये आहे, तो निराळाच. रेलवे खात्यांत साधारण टिकिटें गोळा करण्याचें कामसुद्धां काळ्या कातडीच्या मनुष्यांस साधत नाहीं, असा समज असल्यामुळें, बारीकसारीक नोकरीवरही गोऱ्या लोकांचा सुळसुळाट झाला आहे. या सर्व लहानमोठ्या यूरोपियन नोकरांच्या शिलकी त्यांच्या बरोबर त्यांच्या देशांत जावयाच्या, मागें हिंदुस्थानांत एक पैही रहावयाची नाहीं. पूर्वींच्या मोंगल बादशाहींत हिंदु लोकांस मोठमोठीं कामें मिळत असत. अकबराचा मुख्य प्रधान हिंदु असून त्याच्या सैन्यांत मोठमोठाले हिंदु कामदार होते. आणि जे मुसलमान होते ते हिंदुस्थानचे कायमचे रहिवाशी झालेले होते. चाकरीची मुदत संपतांच चंबुगवाळें आटपून ते हिमालय उलटून पलीकडे जात नसत. ह्यामुळें त्यांच्या शिलकेचा पुष्कळ भाग आम्हांमध्यें अनेकरूपानें पुनः परत येत असे.

अशाप्रकारें आर्यसंपत्तीचा प्रचंड ओघ पश्चिमेकडे मोठ्या झपाट्यानें वाहत असतां, आर्यभूमीच्या क्षीण हृदयाचें रक्त अत्यंत वेगानें आंग्लभूमीच्या पुष्टीकडे

खर्च होत असतां, तिचीं लेंकरें उपाशीं मेलीं तर यांत काय आश्चर्य आहे! प्रत्येक नवा येणारा दुष्काळ मागल्याला बरा ह्मणवित आहे, आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, इ. स. १८७६।७७ च्या दुष्काळापेक्षां इ.स. १८९६। ९७ चा दुष्काळ जास्त भयंकर आहे, ही गोष्ट सर्व अधिकाऱ्यांस कबूल असतां पहिल्या सालापेक्षां धान्याची सूट दुसऱ्या सालाला कमी! सन १८९९ चा दुष्काळही इ.स. १८९६।९७ च्या दुष्काळापेक्षां भयंकर आहे, ही गोष्ट तशीच कबूल असतां, सुटीचें प्रमाण वरील प्रमाणेंच रहातें कीं काय, हें पहाणें आहे. सुटीचें प्रमाण दुष्काळाच्या विस्तारावर आणि भयंकरपणावर अवलंबून असलें पाहिजे, ही गोष्ट अगदीं लहान मूलही सांगूं शकेल. परंतु सुधारलेल्या पाश्चिमात्य पद्धतीस याचा व्युत्क्रमच करणें बरें दिसत असावें, असें वाटतें. असो. अशा रीतीनें दुष्काळाचा भयंकरपणा दिवसेंदिवस वाढत जाण्यास कारण तरी वरील संपत्तीचा अवाढव्य ओघच आहे.

लोकांस यासंबंधांत सुचविण्याची गोष्ट म्हणजे लोकांनीं आपल्या तक्रारी त्यांत अणुरेणु इतकीही अतिशयोक्ति न न करितां भक्कम पुराव्यासह वारंवार सरकारच्या कानावर घालाव्या. यासंबंधांत सर्वत्र औदासिन्य दिसून येतें. असल्या प्रयत्नाला थोडक्या मुदतींत यश मिळण्याचा संभव नसतो. यश मिळत नाहीं, म्हणून निराश होऊन प्रयत्न सोडतां कामा नये. राष्ट्रीय

सभा व ब्रिटिश कमिटी यांस लागेल ती मदत करण्यास तयार झालें पाहिजे. आज आह्मांला मूक हिंदुजनांची दाद सरकाराजवळ लावण्यास हींच काय तीं दोन साधनें आहेत. या सभा हींच आमचीं तोंडें, हेच आमचे वकील आहेत. या करितां त्यांची हेळसांड उपयोगाची नाहीं.

असो. आमचें दुसरें कर्तव्य असें आहे कीं, राष्ट्रीय सभा काय किंवा ब्रिटिश कमेटी काय, दार ठोठावून सरकारास जागें करण्याचा प्रयत्न करणार. परंतु सरकार जागें झालें नाहीं किंवा जागें होऊन त्यांनीं झोंपेचें सोंग घेतलें, तर दार ठोठावणारांची दाद लागण्यास बराच अवधी लागेल या करितां दार ठोठावण्याचा हा प्रयत्न चालूच ठेवून आम्हीं सध्यांच्या स्थितींत आपल्या स्वतःची सुधारणा आपणास कितपत करितां येईल, हें पाहिलें पाहिजे. आम्हांस तर ती होण्याला बरेंच दिवसांपूर्वीं ज्ञानप्रकाश, सुधारक वगैरे पत्रांत ज्याची विशेष चर्चा चालू होती, त्या "राष्ट्रीय फंडा" वांचून दुसरा मार्ग दिसत नाहीं. यासंबंधांत रा. रा. गोपाळ अनंत भट यांनीं एक निरपेक्ष भांडवल नांवाचें लहानसें पुस्तक लिहिलें असून त्यांत केलेल्या सूचना फार महत्वाच्या आहेत. हें पुस्तक महाड येथील सद्वर्तनोत्तेजक सभेनें छापिलें असून, केवळ टपाल हंशील भरल्यास सदर सभेकडून तें कोणासही फुकट मिळतें. तें सर्वांनीं वाचावें आणि त्यांत सुचविल्याप्रमाणें "निरपेक्ष भांडवल" जमविण्याचा प्रयत्न करावा. प्रथम असा प्रयत्न

होऊन ही युक्ति शेवटास जाणें जरा अशक्य दिसतें; परंतु कै. न्या. रानड्यांसारखीं थोर माणसें जर त्यांत मन घालतील तर ती अशक्य असली तरी सुद्धां शक्य होईल, अशी आमची खात्री आहे.

असो. सरकारास यासंबंधांत करण्यासारखी सूचना म्हणजे न्युझीलंड, अबिसीनिया, अफगाण, इजिप्त, सौडन, स्वाकीन वगैरेसारख्या ज्या लढायांशीं आमचा अर्थाअर्थीं संबंध नसतो, त्यांचा खर्च आह्मांवर कधींच लादण्यांत येऊं नये. आणि ज्या लढायांत आमचा संबंध असेल, त्यांत सुद्धां आह्मीं ब्रिटिश प्रजा असल्यामुळें इंग्लंडानें आमच्या बरोबर खर्चाचे भागीदार व्हावें. सध्यां जो सैन्याचा खर्च वाढत आहे, तो कमी करावा. कारण, या सैन्यापैकीं आठ हजार युरोपियन सैन्य जर ट्रॅन्सवालला पाठवितां येतें व बारा हजार नेटिव्ह सैन्य जर चिनांत पाठविण्याचें ठरतें, तर आह्मांला येथें त्याची अवश्यकता नाहीं, हें उघड आहे. करितां ज्याची अवश्यकता नाहीं, नितकें सैन्य कमी करावें. नेटिव्ह लोकांस सर्व प्रकारचीं खातीं मोकळीं ठेवून त्यामध्यें वरिष्ठ अधिकाऱ्याचें काम चालविण्यास जे योग्य असतील, त्यांस तीं कामें द्यावींत. विशेष पाल्हाळ न करितां सांगावयाचें ह्मणजे, हिंदुस्थानांतील बहुजनसमाज सुखी व्हावा, त्यावर येणाऱ्या दुष्काळाच्या धाडी कमी व्हाव्यात, अशी इच्छा असेल, तर सरकारांनीं नुकताच दादाभाई, वेडरबर्न व केन यांच्या सहीनें प्रसिद्ध झालेला

रॉयल कमिशनचा रिपोर्ट वाचून त्यांत सुचविलेल्या गोष्टी अमलांत आणण्याचा प्रयत्न करावा.

---

## उपसंहार.

आतांपर्यंत आमच्या देशांत दुष्काळ पडण्याचीं कारणें काय व त्या प्रत्येकाच्या निवारणार्थ सरकारचीं व लोकांचीं कर्तव्यें कोणतीं, यांचें विवेचन बऱ्याच विस्तारानें करण्याचा प्रयत्न केला. सध्यां आमच्या देशांत बरींच गमागमाचीं साधनें अनुकूल असल्यामुळें, येथें जर लोकांजवळ धान्य किंवा संपत्ति यांचा संग्रह असता, तर अशा एकाद दुसऱ्या अवर्षणानें आमच्यावर सध्यांसारखा माणसास माणसानें खाण्याचा, आईनें मुलासह जीव देण्याचा, बापानें हाल पाहवत नाहींत म्हणून जिवंतपणींच मुलांस मातीआड करण्याचा आणि जिवंत माणसांस कोल्ह्याकुत्र्यांनीं खाण्याचा भयंकर प्रसंग कधींही आला नसता. पूर्वीं इ. स. १३९६ पासून बारा वर्षें महाराष्ट्रांत ज्या वेळीं दुर्गादेवीचा दुष्काळ पडला, त्या वेळीं आगगाड्या आगबोटींसारखीं साधनें नव्हतीं, तरी लोकांमध्यें कांहीं त्राण होतें. सगळेच लोक शेतकरी बनले नव्हते. त्यांच्यामध्यें उद्यमवैचित्र्य होतें. त्यांचीं धान्याचीं पेवें भरलेलीं असत, आणि सरकार धारे गल्ल्यामध्यें असल्यामुळें, शेतकऱ्यांस चांगली सवड मिळून सरकाराजवळही पुष्कळ गल्ला शिलकी असे.

व्यापारांचीं साधनें कमीं होतीं ह्मणून जेथलें धान्य तेथें शिल्की राही, आणि प्रसंग आला असतां लोकांच्या उपयोगीं पडे. त्यांच्या संपत्तीचा झरा बाहेर वाहत नव्हता, आणि रानांवर सरकारी कटाक्ष नसल्यामुळें त्यांच्या जनावरांस चाऱ्याची किंवा जमीनीस राबाची कधीं पंचाईत पडत नव्हती. यामुळें बारा बारा वर्षांच्या अवर्षणास टक्कर देऊन ते निभाव काढीत. राजे लोक अशा प्रसंगीं स्वस्थ बसत नव्हते, दुष्काळाचे हल्ले येऊं नयेत ह्मणून आपली राज्यव्यवस्था जितकी सुखावह होईल तितकी करूनही ध्यानीं मनीं नसणारें असें एकादें संकट जर प्रजेवर गुजरलेंच, ईश्वरी क्षोभ होऊन सतत बारा वर्षें अवर्षण पडलेंच, तर प्रजेचा निभाव लागावा, विशेष प्राणहानि होऊं नये, ह्मणून ते त्या वेळच्या लोकस्थितीप्रमाणें शक्य त्या उपायांची योजना करीत. दुर्गादेवीचा दुष्काळ पडला तेव्हां महंमदशहा बहामनीनें "माळवा व गुजराथ" येथून धान्य आणण्याकरितां दहा हजार बैल ठेवून धान्य आणविलें आणि तें धान्य लोकांस स्वस्त दरानें विकलें. कल्बुर्गा, बेदर, कंदाहार, एलिचपूर, दौलताबाद, चौल, दाभोळ वगैरे ठिकाणीं आणि दुसऱ्या कांहीं शहरीं अनाथांकरितां भिक्षागृहें स्थापिलीं आणि तीं सतत चालावीं ह्मणून त्यांस मोठ्या नेमणुका करून दिल्या." (मोडककृत दक्षिणेंतील मुसलमानी राज्याचा इतिहास, पान ६९.). याशिवाय सरकार धान्याचीं मोठमोठीं कोठारें असत त्यांचाही प्रजेला चांगला उपयोग होई. इ. स. १६२९ सालीं

"दोन वर्षे सारखें अवर्षण पडलें त्यामुळें लोक मुलुख सोडून गेले व बहुतेक मरण पावले. वैरण न मिळून गुरा-ढोरांचा फन्ना उडाला. प्रांताचे प्रांत ओसाड पडले. मागाहून महामारी येऊन लोकांच्या विपत्तीचा कळस झाला." (मुसलमानी रियासत, पा० २९६.). कारण, त्या वेळीं अदिलशाहींत फार अव्यवस्था होती. कोणाचा जोडा कोणाच्या पायांत नव्हता. या दुष्काळाच्या प्रसंगीं मंगळवेढ्यास असलेल्या दामाजीपंत नांवाच्या सरकारी अधिकाऱ्यानें आपल्या ताब्यांतील सातशें खंडींचें सरकारी कोठार त्या प्रांतांतील सर्व जातींच्या लोकांस उघडें करून देऊन त्यांचें दुष्काळापासून रक्षण केल्याची हकीकत भक्तिविजयाच्या चाळिसाव्या अध्यायांत दिली आहे, ती आमच्या वाचकांच्या वाचनांत आलीच असेल. पेशव्यांच्या कारकिर्दींत राज्यव्यवस्था चांगली होती, प्रजेमध्यें चांगलें त्राण होतें, म्हणून मोठे दुष्काळ पडले नाहींत. मात्र इ. स. १७७०। १७८६।१७९२ आणि १८०४ या सालीं महाराष्ट्रांत खूप महागाई झाली होती. दुसऱ्या प्रसंगीं "पुणें प्रांतीं धारण दीड पायली झाली होती." तिसऱ्या वेळीं "धारण चार शराची होऊन पुणें शहरांत बरींच माणसें मेलीं" आणि इ. स. १८०४ मध्यें तर महागाईची कमालच झाली. "धारण दीड शेरावर आली आणि माणसेंही बरींच मेलीं." अशा प्रकारें या चार महर्गतेची हकीकत काव्येतिहास संग्रहांतील पत्रें यादी प्रकरणाचा लेखांक ४९२ व ४९३

मध्यें दिली आहे. मराठी राज्यांत मागें एका प्रसंगीं सांगितल्याप्रमाणें ओसाड जमीनीवर धान्याची आकारणी कधींच करीत नसत व आवर्षण वगैरे झालें म्हणजें प्रजेला सूट देत. तगाई देण्याची पद्धतही तेव्हां अमलांत होती. आणि शेतकऱ्यांस बीं घेण्याकरितां, जमीनींत सुधारणा करण्याकरितां, जळलेलीं घरें बांधण्याकरितां व गुरें घेण्याकरितां तगाई देत. वरील चार प्रसंगींही हेच उपाय अमलांत आले असावे, असें न्यायमूर्ति रानड्यांच्या "पेशवाईतील रोजनामे" या लेखावरून दिसतें.

"प्रक्षालनात्‌हि पंकस्य दूरादस्पर्शनं वरम्" अशी एक संस्कृत भाषेंत म्हण आहे. तिचा अर्थ असा कीं, चिखल अंगावर घेऊन मग धूत बसण्यापेक्षां तो अंगावर न पडेल अशीच व्यवस्था करणें चांगलें. ज्याप्रमाणें एकादा प्राणी कुजून घरांत अमुक ठिकाणीं पडला आहे हें माहीत असतां घरचा यजमान त्या प्राण्यास एकदम बाहेर फेंकून देण्याची तजवीज करण्याचें सोडून, काय उपाय केले म्हणजे ही दुर्गंधी नाहींशी होईल, याचा विचार करण्याकरितां कुटुंबाचीं माणसें एके ठिकाणीं जमा करितो व बहुमतानें त्या प्राण्यास तेथून काढून टाकण्याऐवजीं, चंदन, धूप वगैरे जाळण्याचें ठरवून त्या कामांत बरेच पैसे खर्च करितो, तसा प्रकार आमच्या सरकारच्या या दुष्काळासंबंधाचे व्यवस्थेंत झाला आहे. दुष्काळ पडूं नये म्हणून जे पूर्वोपाय करावयाला पाहिजेत ते आम्हीं वर दुष्काळाच्या कारणांचा विचार

करीत असतां सुचविलेच आहेत; परंतु सरकारचें लक्ष या उपायांकडे गेलेलें दिसत नाहीं. बंगाल्यांत इंग्रज सत्ताधीश झाल्यापासून पहिला दुष्काळ इ.स. १७६९।७० सालीं पडला, आणि त्या प्रांतांत सुमारें ⅓ लोक अन्नावांचून मेले. तेव्हांपासून आजपर्यंत सरकारी लोक ज्याला दुष्काळ ह्मणतात असे सव्वीस दुष्काळ ब्रिटिश हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत पडले. यांतील पहिल्या पांच दुष्काळांत किती प्राणहानि झाली, याची नोंद नाहीं. परंतु इ.स. १८७८ पर्यंत पडलेल्या बेविसांपैकीं बाकीच्या १७ दुष्काळांत एक कोटि सत्तावीसलक्ष लोक अन्नावांचून मेले, असें इ.स.१८८० सालच्या फयामिन कमिशनच्या रिपोर्टांत लिहिलें आहे. इंग्रज लोकांचें राज्य झाल्यापासून आह्माला जी शांतता मिळाली, आम्हांला जीं गोड वचनें देण्यांत आलीं, आणि दुष्काळाच्या प्रसंगीं आमचे प्राण वांचावे ह्मणून, ज्या खटपटी झाल्या, त्या सर्वांस न जुमानतां ह्या दुष्काळरूपी बड्या शत्रूनें गेल्या शंभर वर्षांत सर्व जगांत झालेल्या लढायांत जे लोक मेले त्याच्या तिप्पट लोक, नुसत्या हिंदुस्थानांत ठार केले.

यानंतर बरेच दुष्काळ पडल्यावर इ. स. १८३७ सालच्या दुष्काळाच्या वेळीं काम करण्यासारख्या लोकांस सरकारांतून काम देण्याचा ठराव झाला, व पुढें इ. स. १८६०।६१ सालच्या वायव्येकडील प्रांतांत व पंजाबच्या कांहीं भागांत पडलेल्या दुष्काळांत कर्नल बेअर्ड स्मिथ यांची, त्या दुष्काळाचीं कारणें, त्याचा विस्तार वगैरेचा शोध

करण्याकरितां, सरकारांतून मुद्दाम नेमणूक करण्यांत आली; व त्यांनीं आपली ती कामगिरीही बजावली. परंतु पुढें इ. स. १८६५ च्या ओरिसा प्रांतांतल्या दुष्काळानें तेथले $\frac{1}{3}$ लोक स्वाहा केले. पुढें इ. स. १८६८।६९ सालच्या दुष्काळांत लॉर्ड लॉरेन्स साहेबांनीं 'दुष्काळांत एकही मनुष्य अन्नावांचून मरतां कामा नये, जर मरेल तर त्याबद्दल जिल्हाधिकाऱ्यास जबाबदार धरलें जाईल,' असें प्रसिद्ध केलें. याचा परिणाम वर मि. नंदी यांच्या निबंधांतील एका कलेक्टराची जी गोष्ट दिली आहे तीवरून वाचकांच्या लक्षांत येईल. इ. स. १८७३।७४ च्या दुष्काळांत, दुष्काळग्रस्तांस व्यापाऱ्यांकडून, योग्य वेळीं हवें तितकें धान्य पोंहचत नाहीं; म्हणून धान्य पुरविण्याचीं सर्व जबाबदारी सरकारांनीं घेतली आणि इ. स. १८७७ च्या दक्षिणेंतील दुष्काळांत हल्लींच्या पद्धतीवर दुष्काळकामें सुरू होऊन पुढच्या वर्षीं दुष्काळग्रस्तांचें संरक्षण कशानें होईल, आणि दुष्काळ न पडण्याकरितां काय तजवीजी कराव्या, हें सुचविण्याकरितां एक कमिशन नेमण्यांत आलें. व त्यांनीं दुष्काळ कोडाची प्रथमावृत्ति काढली. पुढें इ. स. १८९७ सालच्या दुष्काळांत या कोडांतील बऱ्याच चुका लोकांनीं सरकारच्या नजरेस आणल्यामुळें पुनः एक कमिशन नेमण्यांत आलें व त्यांनीं सुधारलेला फ्यामिनकोड इ. स. १८९८ मध्यें काढला.

याप्रमाणें सरकार एका शतकापेक्षांही अधिक वर्षें अनु-

भव घेऊन दुष्काळ टाळण्याचें व दुष्काळ पडल्यावर त्यापासून प्रजेचें रक्षण करण्याचे उपाय शोधून काढित आहे. पहिलें काम फार महत्वाचें असून त्याकरितां सरकारांत विशेष तजवीजी होणें रास्त होतें; परंतु तसा प्रयत्न विशेष झालेला दिसत नाहीं. या दुसऱ्या कामांत मात्र सरकारांनीं मन घालून बरीच व्यवस्था केली आहे. तथापि कामाची इयत्ता, फाजील दंडाची पद्धत, दुष्काळ ठरविणें, टाइम्समध्यें जे. व्ही. जे. या सहीनें लिहिलेल्या लेखांत सुचविलेल्याप्रमाणें लहान प्रमाणावर ठिकठिकाणीं रिलीफ कामें काढणें, पावसाळा सुरू होतांच दुष्काळपीडितांपैकीं जे लोक प्रत्यक्ष शेतकी करणारे असतील त्यांस बीं व अवश्य असल्यास शेतकीचीं जनावरें देऊन पुनः पीक हातीं येईपर्यंत पोसणें, नामदार पारख यांनीं सुचविल्याप्रमाणें सूट देण्याच्या कामीं ऐपतदार आणि गैर ऐपतदार असा भेद न करणें व प्रेसिडेन्सी असोसिएशनच्या सूचनेप्रमाणें तहकुबी दिल्यानें पुढील सालीं शेतकऱ्यांवर दुहेरी बोजा बसतो याकरितां सुटी देणें, वगैरे बाबतींत सुधारणा झाली पाहिजे. व दुष्काळकोडाच्या नियमांप्रमाणें सर्व तजवीजी करण्याविषयीं जास्त खबरदारी घेतली पाहिजे. लोक या संबंधांत आपलें कर्तव्य बजावीत आहेत, परंतु तें असावें तसें समाधानकारक नाहीं. दयाभूतपणा आमचा स्वाभाविक गुण आहे, परंतु त्याला सद्यः स्थितीला अनुसरून थोडें व्यवस्थित स्वरूप दिलें पाहिजे. हें व्यवस्थित स्वरूप नसल्या-

मुळेंच गेल्या दुष्काळांत पुण्यास निघालेल्या ( डेक्कन ऑर्फनेज ) अनाथबालकाश्रमाचा नायनाट झाला. आणि आतां हजारों पोरक्या पोरांवर धर्मांतर करण्याची पाळी आली आहे ! यासंबंधानें पंजाबांत दयानंद आंग्लवैदिक महाविद्यालयाच्या व मुंबईंत प्रार्थनासमाजाच्या मंडळीनें केलेला प्रयत्न फार स्तुत्य आहे. मात्र ही युक्ति अमुक पंथाच्या लोकांकडून सुचविण्यांत आली आहे हाच तिच्यामध्यें कांहीं लोकांच्या मतें 'शकारी दोष' ह्मणून तिची यंदा जशी हेळसांड करण्यांत आली, तशी पुढें येऊं नये. युक्ती सुचविणारा कोणीही असला तरी ती जर आपल्या हिताची असेल तर आपण आपल्या हिताकरितां तिचा अंगिकार केला पाहिजे.

असो. याप्रमाणें दुष्काळ न पडण्याकरितां लोकांस व सरकारांस ज्या तजविजी कराव्या ह्मणून आह्मीं सुचविलें आहे, त्या अमलांत आल्यावर, बहुधा हिंदुस्थानांत दुष्काळ पडण्याची भीति नाहीं; आणि बरींच वर्षें अवर्षण होऊन कदाचित् एकादा दुष्काळ पडलाच तर त्यापासून निभावण्याकरितां राजा व प्रजा या उभयतांस वरील विवेचनांत आह्मीं सूचना केल्या आहेत, त्याप्रमाणें घडल्यास मनुष्यहानिही होण्याची भीति नाहीं. सारांश, आमच्या महा यशस्वी राणीसाहेबानीं हिंदुस्थानचा राज्यकारभार हातीं घेतेवेळीं "आमच्या रयतेची अबादानी तेंच आमचें सामर्थ्य, त्यांचा संतोष तीच आमच्या राज्याची मजबुती व त्यांची कृतज्ञता तेंच आह्मांस उत्तम फळ, असें आम्हीं समजतों" इ.जाहिर-

नाम्याच्या द्वारें प्रसिद्ध केलेलें आपलें वचन सत्य केलें, व आह्मीं प्रजाजन हिंदु, मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती एकाच नौकेमध्यें बसलों आहोंत, एकाचें जें हित तें दुसऱ्याचें हित. एकाचें जें नुकसान तेंच दुसऱ्याचें. आपण सर्व एका कुटुं-बाचीं माणसें आहोंत, आपणां सर्वांस एकमेकांच्या सुखा-दुःखाचे भागीदार झालें पाहिजे, हें मनांत बाळगून आह्मीं देशहिताकरितां कायावाचामनेंकरून झटलों व संकट-प्रसंगीं आपल्या सरकारांस व एकमेकांस अवश्य व शक्य ती मदत आपण केली, तर हल्लींचा काल असा आहे कीं, प्रत्यक्ष इंद्र जरी आमच्या वैरावर उठला तरी त्याच्यानें आमचें नुकसान होणार नाहीं; पण असा दिवस उगवेल तेव्हां खरा !

REFBK-0000249

समाप्त.

ग्रंथालय ... २४९ ... क्र. ... शाखा (एक प्रत)